मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस



सरकारने 156 फिक्स्ड डोस कॉम्बिनेशन औषधांवर बंदी

पान 8

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, शनिवार, २४ ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ६५ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६
किंमत : ३ रुपये

## प्रासंगिक

# कोकणातील धुमशान



**माणुसकीला** काळिमा फासणारी भयंकर घटना बदलापूरला नुकतीच घडल्यामुळे गेले तीन दिवस राज्यभर अशाच प्रकारच्या घटनांच्या बातम्या समोर आहेत. अशा प्रकारच्या विविध घटनांमुळे महाराष्ट्र दररोज शब्दशः जखमी झाला आहे. या भयंकर नकारात्मक वातावरणात चार दिवसांपूर्वीची एक महत्त्वाची राजकीय घडामोड काहीशी झाकोळली गेली. कोकण प्रदेश हा पहिल्यापासून बुद्धिवंतांचा, विचारवंतांचा समजला जातो. परंतु नुकतेच शिंदे सरकारमधील तळकोकणातील एका कॅबिनेट मंत्र्याने आपल्याच मित्रपक्षाच्या कोकणी नेत्याचे थोबाड फोडण्याचे जाहीर वक्तव्य केल्याचे विचित्र चित्र समोर आले आहे. त्याचे असे झाले की, मुंबई-गोवा महामार्गाच्या स्थितीवरून कोकणचे नेते, माजी मंत्री रामदास कदम यांनी जाहीररित्या आपली नाराजी व्यक्त केली. त्यांनी 'हायवे'वरुन त्यांच्या स्टाईलने सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचा राजीनामाच मागितला. खरं म्हटलं तर रायगड रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये जाणाऱ्या चाकरमान्यांना या हायवेमुळे आजतागायत विक्रमी त्रास झाला आहे. या हायवेवर बरेच लिहिले आणि बोलले गेले आहे. परंतु गेली 14 वर्ष परिस्थिती 'जैसे थे' आहे याचाच एक भाग म्हणून रामदास कदम यांनी गणेश चतुर्थीच्या तोंडावर वैतागातून चव्हाण यांच्या राजीनाम्याची मागणी केली. (वरकरणी मुंबई- गोवा हायवे हा मुद्दा वाटत असला तरी प्रत्यक्षात राजकीय कारण आहे.) पण सारासार विचार केला असता कदम याच्या मागणीत फारसे वावगे काही नव्हते. त्याचबरोबर चव्हाण यांना बोलणारे कदम त्यांच्यापेक्षा ज्येष्ठही आहेत. परंतु मंत्री रवींद्र चव्हाण यांनी यावर अनपेक्षित आक्रमक प्रत्युत्तर दिले. रामदास कदमांना 'अडाणी' म्हणून त्यांचे थोबाड फोडण्याचे वक्तव्य केले. विशेष म्हणजे कदम आणि चव्हाण यांचे दोन्ही पक्ष सत्तेत मित्रपक्ष म्हणून राज्याचा कारभार पाहत आहेत. असे असताना आपल्याच मित्रपक्षाच्या ज्येष्ठ नेत्याचे थोबाड फोडण्याचे वक्तव्य करण्याचे काहीच कारण नव्हते. पण हे वक्तव्य केले गेले. मुळात रवींद्र चव्हाण यांची राजकिय वाटचाल कोकणातील भाजपमध्ये सर्वाधिक वेगाने झाली. फडणवीस सरकारमध्ये त्यांना मंत्रिपद मिळाले होते. आता तर शिंदे सरकारमध्ये त्यांना सार्वजनिक बांधकाम खाते मिळाले आहे. ते असे मंत्री आहेत की, जे मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस या दोहोंच्या जवळचे आहेत. दोन वर्षांपूर्वी सुरत मोहिमेवरील त्यांची पडद्यामागची कामगिरी प्रभावी आणि परिणामकारक असल्याचे सांगितले जाते. पाच वर्षांपूर्वी मंत्री चव्हाण यांना डोंबिवलीतूनच भाजपच्या काहीजणांनी पुन्हा उमेदवारी देण्यास विरोध केला होता. परंतु तो विरोध डावलून फडणवीसांनी त्यांना डोंबिवलीतूनच 'सुभेदारी' दिली. त्यांचे याआधीचे सार्वजनिक जीवनातील वागणे बऱ्यापैकी संयमी होते. परंतु कदमांच्या मागणीमुळे त्यांचे चित्त एकाएकी एवढे का खवळले, ते तपासणे औत्स्युक्याचे आहे. कॅबिनेट मंत्र्यांनी अशा टीकांना संयतपणे उत्तर देणे अपेक्षित असते. परंतु चव्हाणांना ते जमले नाही. उलट कदमांनी त्यांच्या कारकिर्दीत काय काय केले ते तपासावे लागेल, असे चव्हाण बोलले. सध्याचे राजकारण प्रचंड ईर्षेचे व स्पर्धचे झाले आहे. त्यात राजकारणात कोणीच साळसूद नसतं. हा बहुचर्चित हायवे केंद्राच्या अखत्यारीत येतो का, त्यात राज्य सरकारचा कुठे व कितपत संबंध येतो, या हायवेचे ठेकेदार कसे पळून गेले (का पळवून लावले), डागडुजी कोणाकडे आहे, किती टप्प्यात काम पूर्ण होणार आहे असल्या चर्चांमध्ये सामान्य लोकांना रस नाही. राज्यासह देशभरात सगळीकडे रस्त्यांची कामे जलदगतीने होत असताना कोकणवासीयांच्या नशिबी मात्र हा वनवास का ? हा साधा प्रश्न कोकणी लोकांना पडला आहे. विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवारांनी तर या हायवेवर चित्रपट काढा असे सांगून एक प्रकारे टिंगलच उडवली. हायवेच्या या दशावतारामुळे कदमांनी आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या, त्यावर चव्हाणांनी हे 'धुमशान' केलं. खरंतर चव्हाणांचं राजकीय धुमशान गेल्या काही वर्षांपासून रत्नागिरीत सुरु असल्याचं कदमांचं म्हणणं आहे. ते या निमित्ताने 'हायवे'वर आलं. कदमांच्या आमदारपुत्राला होणाऱ्या राजकीय त्रासावरून कदमांनी टीकेचा हा मार्ग स्वीकारल्याचे दिसते. कदम पिता-पुत्र, दुसरे मंत्री उदय सामंत, व सिंधुदुर्गातील मंत्री दीपक केसरकर या सर्वांसमोर गेल्या काही वर्षांपासून रविंद्र चव्हाणांचे डावपेच पुढे येत आहेत. हे सर्वजण महायुतीतीलच आहेत. अशाप्रकारे हे कोकणी धुमशान अंतर्गतच आहे. पुन्हा त्याला राणे हा वेगळा अँगल आहेच. या सर्वांचीच परिणीती म्हणजे हा कदम-चव्हाण वाद आहे.

**- शाम देऊलकर**

# महाराष्ट्रातील यात्रेकरूंची बस नेपाळमध्ये कोसळली, 27 ठार

## भीषण अपघातामुळे हळहळ, बहुतांशजण जळगाव जिल्ह्यातील रहिवाशी



**काठमांडू**

महाराष्ट्रातील प्रवाशांना घेऊन जाणारी उत्तर प्रदेशची बस नेपाळमध्ये नदीत कोसळली. या बसमध्ये 40 प्रवासी होते. या अपघातात 27 प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. यात एक बालकही आहे. यातील 5 जणांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बस पोखराहून काठमांडूला जात होती. यावेळी ती नियंत्रणाबाहेर जाऊन नदीत पडली.

ही बस नेपाळमधील तनहुन जिल्ह्यातील आयना पहाडा येथे सकाळी 11.30 वाजता महामार्गावरून 500 फूट खाली नदीत पडली. बसमध्ये प्रवास करणारे प्रवासी महाराष्ट्रातील भुसावळचे रहिवासी होते. सर्वजण नेपाळला फिरायला गेले होते. तनहुनचे मुख्य जिल्हा अधिकारी जनार्दन गौतम यांनी सांगितले की, काही जखमींचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

नेपाळ पोलिस, सशस्त्र पोलिस दल आणि नेपाळ आर्मी शोध आणि बचाव कार्य करत आहेत. घटनास्थळी सशस्त्र पोलिस दलाच्या (एपीएफ) 45 जवानांची एक तुकडीही उपस्थित आहे. नेपाळ लष्कराचे एमआय-17 हेलिकॉप्टर काठमांडूहून वैद्यकीय पथकाला घेऊन तनहुनकडे पोहोचले.

या अपघातात बसचा चालक आणि वाहक यांचाही मृत्यू झाला. दुसऱ्या बसमध्ये प्रवास करणारे लोक नेपाळमधील मुंगलिंगमध्ये राहत असल्याचे सांगण्यात येत आहे.

***महाराष्ट्रातील 110 जण नेपाळ यात्रेला गेले होते***

*अपघातग्रस्त बस गोरखपूरच्या केसरवाणी टूर अँड ट्रॅव्हल्स एजन्सीची होती. बसचा क्रमांक UP-53 FT 7623 आहे. ही बस गोरखपूरच्या धर्मशाला बाजार भागात राहणारे सौरभ केसरवानी यांची पत्नी शालिनी केसरवानी यांच्या नावावर नोंदणीकृत आहे. सुमारे 4 महिन्यांपूर्वी नेपाळला जाण्यासाठी केसरवाणी ट्रॅव्हल्सच्या 3 बसेस महाराष्ट्रातून बुक केल्या होत्या. सुमारे 110 लोकांना घेऊन तीन बस 20 ऑगस्ट रोजी नेपाळला पोहोचल्या. या बसेस 29 ऑगस्टला परतणार होत्या.*

# महाविकास आघाडीचा महाराष्ट्र बंद मागे

## शरद पवार यांच्या आवाहनाला काँग्रेस, ठाकरेंचा पाठिंबा; उद्या तोंड बांधून करणार निदर्शने

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबई उच्च न्यायालयाने महाविकास आघाडीचा उद्याचा महाराष्ट्र बंद अवैध असल्याचा निर्वाळा दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उद्याचा बंद मागे घेण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला काँग्रेस व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या पक्षांनी उद्याचा बंद मागे घेत सकाळी 11 ते 12 या वेळेत तोंडाला



काळे फडके बांधून शांततेत निदर्शने करण्याचा निर्णय घेतला आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले की, हे आंदोलन विकृतीच्या विरोधात आहे. या आंदोलनात प्रत्येक व्यक्तीने सहभागी व्हायला पाहिजे. तसेच मविआचे नेते उद्या 11 वाजता काळया फिती बांधून आणि हातात काळा झेंडा घेऊन शिवसेना भवनाच्या बाहेर बसणार असल्याचेही ठाकरे यांनी यावेळी सांगितले आहे.

बदलापूर येथील एका शाळेत 4 वर्षांच्या 2 चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार झाला होता. या घटनेच्या निषेधार्थ काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महाविकास आघाडीने उद्या 24 ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची घोषणा केली होती. या बंदला वकील गुणरत्न सदावर्ते यांच्यासह इतर काही याचिकाकर्त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या याचिकांवर शुक्रवारी झालेल्या सुनावणीत हायकोर्टाने उद्याचा बंद बेकायदा असल्याचे स्पष्ट केले.

पान 8 वर

# सिंदखेडमध्ये सहा विद्यार्थिनींवर शिक्षकाकडूनच अत्याचार

## जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकाचे हिडीस कृत्य उघडकीस

**प्रतिनिधी**
**सिंदखेडराजा**

बदलापूरमध्ये एका शाळेत चार वर्षांच्या दोन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याच्या धक्क्यातून महाराष्ट्र सावरतो न सावरतो तोवर बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत याच घटनेची पुनरावृत्ती झाली आहे. संबंधित शाळेतील सहा विद्यार्थीनींवर शाळेतील शिक्षकानंच लैंगिक अत्याचार केल्याचं उघड झालं आहे. त्यामुळं संबंधित गावामध्ये संतापाची लाट उसळली आहे.

सिंदखेड राजा तालुक्यातील वर्दडी बु. येथिल जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकानं हा प्रकार केल्याचं उघडकीस आलं आहे. स्वतः वर्गशिक्षक असलेल्या या शिक्षकानं चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या या चिमुरड्या मुलींसोबत लैंगिक अत्याचार केल्याची माहिती स्वतः पीडित मुलींनी आपल्या पालकांना दिली आहे.



# कोरोनाकाळात ज्यांनी मृतांच्या टाळूवरचं लोणी खाल्लं, त्यांच्यापासून सावध राहा!

**प्रतिनिधी**
**नाशिक**

विरोधकांनी बदलापूर येथील दुर्दैवी घटनेचं राजकारण केल्याचा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केला. न्यायालयानंही उद्याचा बंद बेकायदेशीर ठरवून त्याला परवानगी नाकारल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं. कोरोनाकाळात ज्यांनी मृतांच्या टाळूवरचं लोणी खाल्लं, त्यांच्यापासून सावध राहा, असं म्हणत मुख्यमंत्र्यांनी नाव न घेता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना टोला लगावला.

नाशिकच्या तपोवन येथे महायुतीकडून महिला सशक्तिकरण कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी मंत्री छगन भुजबळ यांच्यासह हजारोंच्या संख्येने नाशिक जिल्ह्यातील महिला उपस्थित होत्या. यावेळी मुख्यमंत्र्यांनी महिलांसाठी सरकार राबवत असलेल्या योजनांबाबत माहिती दिली. तसंच ही योजना बंद पडेल, असं म्हणणाऱ्या विरोधकांचादेखील समाचार घेतला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, " राज्यात आतापर्यंत 1 कोटी 40 बहिणींनी लाडकी बहीण योजनेचा फॉर्म भरलाय. त्यापैकी एक कोटी 25 हजार बहिणींच्या खात्यावर पैसे जमा झाले. इतर बहिणींच्या खात्यात लवकरच पैसे जमा होणार आहेत." बहिणीच्या खात्यात 1 हजार 500 हजार रुपये जमा झाल्यामुळं विरोधकांच्या पोटात दुखतंय. मात्र बहिणी सावत्र भावाला जोडा दाखवल्याशिवाय राहणार नाहीत," असा टोला त्यांनी महाविकास आघाडीला लगावला. "हा जनतेचा पैसा आहे. ही योजना बंद होणार नाही. ही देना बँक आहे," असंही ते म्हणाले.

"आमचं सरकार संवेदनशील सरकार आहे. बदलापूर घटनेतील केस आम्ही फास्ट ट्रॅक कोर्टात चालवणार आहोत. आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी आम्ही केली आहे. कोरोनाकाळात ज्यांनी मृतांच्या टाळूवरचं लोणी खाल्लं, त्यांच्यापासून सावध राहा," असं म्हणत मुख्यमंत्र्यांनी नाव न घेता उद्धव ठाकरेंना टोला लगावला.

"सरकारनं सर्वांना मदतीचा हात दिलाय. महिलांसाठी अनेक योजना आणल्या आहेत. लाडकी बहीण योजनेत सव्वा

पान 8 वर

# 'अंधा कानून'चे डोळे फोडण्याची वेळ आलीय, सुप्रीम कोर्टाला टाळे ठोकण्याची गरज

## संजय राऊतांचा 'सुप्रीम' निशाणा

**प्रतिनिधी**
**अमळनेर**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी शिवसेनेच्या सत्तासंघर्षाच्या निकालाला होणाऱ्या विलंबावरून सर्वोच्च न्यायालयावर तिखट शब्दांत हल्ला चढवला आहे. शिवसेनेच्या 40 आमदारांच्या अपात्रतेच्या निर्णयावर सुप्रीम कोर्टाने अद्याप निर्णय दिला नाही. या प्रकरणी अंतिम सुनावणीलाही तारीख पे तारीख मिळत आहे. कोर्टातही न्याय मिळत नसेल तर सुप्रीम कोर्टालाच टाळे ठोकले पाहिजे, असे ते म्हणालेत.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांच्या उपस्थितीत शुक्रवारी जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथे शिवसंवाद मेळावा झाला. त्यात संजय राऊत यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार व सुप्रीम कोर्टावर हल्लाबोल केला. ते म्हणाले की, शिवसेनेतील फुटीनंतर 40 आमदारांच्या अपात्रतेसंबंधी सुप्रीम कोर्टात लढा सुरू आहे. या प्रकरणी अद्याप अंतिम निर्णय झाला नाही. अंतिम सुनावणीलाही कोर्टाकडून तारीख पे तारीख मिळत आहे. त्यामुळे या अंधा कानूनचे डोळे काढण्याची वेळ आली आहे.

पान 8 वर

# मनोज जरांगे आता शेतकऱ्यांसाठी मैदानात

## कर्जमाफीसाठी आंदोलन

**जालना**

मराठा आरक्षणासाठी अवघ्या महाराष्ट्रात रान पेटवणाऱ्या मनोज जरांगे पाटलांनी आता शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. मराठा आरक्षणा लढ्यानंतर आम्ही आता शेकऱ्यांच्या न्याय - हक्कांसाठी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी मी राज्यातील सर्वच 288 विधानसभा मतदारसंघात बैठका घेणार आहे, असे जरांगे यांनी शुक्रवारी बोलताना सांगितले आहे. जरांगे यांनी शुक्रवारी येथे पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी शेतकऱ्यांच्या हक्कांसाठीही लढा उभारणार असल्याचे सांगितले.

# रशियाकडून तेल घेणे बंद करा, युद्ध लगेच थांबेल!

## झेलेन्स्कींचे पंतप्रधान मोदींना आवाहन

**किव्ह**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी राजधानी किव्ह येथे युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान मोदींनी रशिया-युक्रेन युद्धातबाबत भारताची भूमिका मांडली. दरम्यान, या भेटीनंतर आता झेलेन्स्की यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. मीडियाशी बोलताना त्यांनी भारताला तटस्थ भूमिका न घेता आपल्या बाजूने येण्याचे आवाहन केले.

मीडियाशी संवाद साधताना झेलेन्स्की म्हणतात, 'पंतप्रधान मोदींसोबतची खूप चांगली झाली. युक्रेनमध्ये आल्याबद्दल मी मोदींचा खूप आभारी आहे. भारत हा जगातील अत्यंत महत्त्वाचा देश आहे आणि तो शांतता प्रस्थापित करण्यात मोठी भूमिका बजावू शकतो.आम्हाला भारतासोबतचे




संबंध दृढ करायचे आहेत. युद्धाबाबत भारताने तटस्थ भूमिका न घेता आमच्या बाजूने यावे, अशी आमची इच्छा आहे.' 'अलीकडेत पीएम मोदींनी रशियाचा दौरा केला. पुतिन आणि पीएम मोदींमध्ये कोणत्या विषयावर चर्चा झाली, हे मला माहित नाही. पण, पंतप्रधान मोदींच्या अधिकृत दौऱ्यात रशियाने युक्रेनवर हल्ला केला.

पान 8 वर

# नालासोपारा पुन्हा हादरले अल्पवयीन मुलीवर दोघांचा सामूहिक बलात्कार

**प्रतिनिधी**
**नालासोपारा**

नालासोपाऱ्यात 17 वर्षीय मुलीवर दोन जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तुळींज पोलिसांनी याप्रकरणी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.



मुंबईच्या पश्चिम उपनगरात राहणारी 17 वर्षीय पिडीत मुलीची एक मैत्रीण नालासोपाऱ्यात राहते. तिला भेटण्यासाठी ती अधून मधून नालासोपाऱ्याला यायची. मैत्रीणीच्या घराशेजारी असणाऱ्या एका फोटो स्टुडियोत काम करणाऱ्या तरुणाची तिची मागच्या आठवड्यात ओळख झाली होती. गुरुवारी 25 वर्षीय सोनू नामक तरूणाने तिला भेटण्यासाठी बोलावले. त्यानुसार पीडित नालासोपारा स्थानकात आली. यावेळी आरोपी सोबत त्याचा मित्र होता. फिरण्याच्या बहाण्याने ते तिला रिक्षातून घेऊन गेले. काही वेळाने तिला नगीनदासपाडा येथील एका निर्जनस्थळी आणले. तेथे आळीपाळीने दोघांनी तिच्यावर बलात्कार केला. यानंतर पीडीत मुलीने घरी जाऊन आपल्या पालकांना हा प्रकार सांगितला.

याप्रकरणी तुळींज पोलिसांनी दोन्ही आरोपींवर पोक्सो अंतर्गत बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपी आणि पीडित मुलीची केवळ 4-5 दिवसांची ओळख होती. तिला फिरण्याच्या बहाण्याने बोलावून तिच्यावर बलात्कार करण्यात आला आहे. याप्रकरणी आम्ही दोन्ही आरोपींना अटक केली आहे. अशी माहिती तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी दिली.

## लँक्सेस इंडियाला सुरक्षा मानकांमध्ये उत्कृष्टतेबद्दल पुरस्कार

**मुंबई :** लँक्सेस इंडियाने वर्ष २०२४ साठी दोन प्रतिष्ठित ग्लोबल एन्व्हायरोन्मेंट अँड एनर्जी फाऊंडेशन (जीईएफ) ग्लोबल अवॉर्ड्स् जिंकले आहेत, यामध्ये प्लॅटिनम श्रेणीमध्ये सेफ्टी अवॉर्ड आणि शाश्वत जल व्यवस्थापन श्रेणीमध्ये वॉटरटेक अवॉर्ड मिळाला आहे. या पुरस्कारांमधून सुरक्षितता मानक आणि शाश्वत जल व्यवस्थापन पद्धतींमधील सर्वोत्तमतेप्रती आमची कटिबद्धता दिसून येते. लँक्सेस इंडियाच्या पीटीएसईचे पूर्णवेळ संचालक व प्रमुख बलराम खोत, तसेच पीटीएई - ऑक्युपेशनल सेफ्टी, एक्सअॅक्ट, रिस्पॉन्सिबल केअर व ट्रेड कम्प्लायन्सचे वरिष्ठ व्यवस्थापक भरत मीसाला यांनी लँक्सेस इंडियाच्या वतीने नवी दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या भव्य समारोहामध्ये हे पुरस्कार स्वीकारले. यावेळी लँक्सेस इंडियाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक नमितेश रॉय चौधरी म्हणाले, "आम्हाला जीईएफ ग्लोबल अवॉर्ड्स् मिळाल्याने सन्माननीय वाटत आहे. आम्ही शाश्वत पद्धती प्रगत करण्याप्रती कटिबद्ध आहोत, ज्यामुळे आमच्या कंपनीसह आम्ही सेवा देत असलेल्या समुदायांना आणि पर्यावरणाला देखील मोठ्या प्रमाणात फायदा होईल. जीईएफ ग्लोबल सेफ्टी अवॉर्डने लँक्सेस इंडियाच्या केमिकल उद्योगामध्ये सर्वोच्च सुरक्षितता मानक राखण्यामधील उल्लेखनीय कामगिरीला सन्मानित केले.



### थोडक्यात

## कोरेगाव ग्राम विकास मंडळातर्फे विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**मुंबई:** कोरेगाव ग्राम विकास मंडळ, मुंबईच्यावतीने कोरेगावातील दहावी ,बारावी व पदवीधर विद्यार्थ्यांचा सत्कार सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री संकल्प प्रतिष्ठान व्यायाम शाळा ,लोअर परळ येथे अत्यंत उत्साहात पार पडला .सदर सोहोळ्यात 18 गुणवंत विद्यार्थ्यांना भेटवस्तू देवून गौरविण्यात आले .कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कोरेगावचेच सुपुत्र आयटी गुरू व मोटिवेशन स्पीकर प्रा .संदीप मोरे उपस्थित होते .या वेळी त्यांनी मार्गदर्शन करताना आपल्यातील स्किल ओळखून आवडीच्या क्षेत्रात प्रावीण्य कसे मिळवावे या विषयी दिशानिर्देश केले .त्यासोबत लक्ष्य समोर ठेवून अभ्यास करत उच्च पदावर कार्यरत होवून आपल्या आई वडिलांसोबत आपल्या गावाचेही नाव मोठे करावे असें मोलाचे मार्गदर्शन ही त्यांनी या वेळी केले .मंडळाचे माजी सचिव विजय राजाराम मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ,मुलांनी आपल्या आई वडिलांना कधी विसरू नये .त्यांची मेहनत व आशीर्वाद या मुळेच आपण आज़ यशस्वी झाला आहात हे कायम स्मरणात ठेवा असा उपदेश केला . व्यासपीठावर को. ग्रा .मं.चे अध्यक्ष रमेश मोरे ,कार्याध्यक्ष संजय गो .मोरे ,खजिनदार महेंद्र मोरे ,सचिव संजय मोरे ,सुरेश मोरे आदी मान्यवर उपस्थित होते मंडळाचे सदस्य प्रायोजक संजय बाळू मोरे यांच्यावतीने विद्यार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आल्या .कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मंगेश वामन मोरे ,मोरे ,रवींद्र मोरे ,नागेश मोरे ,बळीराम मोरे व रघुनाथ तांबट यांनी विशेष प्रयत्न केले तर कार्यक्रमाच उत्कृष्ट सूत्रसंचालन करुन संजय मोरे यांनी कार्यक्रमात रंगत आणली.

## वरळी येथे भव्य दहीहंडी सराव शिबिर



**मुंबई:** कामगार नेते निशिकांत शिंदे आणि आमदार सुनील शिंदे यांच्या सहकार्याने हनुमान मंदिर मैदान, जिजामाता नगर, वरळी, मुंबई येथे शनिवार दिनांक 23 ऑगस्ट रोजी संध्याकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंत भव्य दहीहंडी सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबिरामध्ये सर्व दहीहंडी पथकांना उत्कृष्ट पारितोषिक आणि सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ट गोविंदा पथकांना विशेष पारितोषिक देऊन त्यांच्या गौरव करण्यात येणार आहे. तरी या दही आणि सराव शिबिराला मोठ्या संख्येने गोविंदा पथकांनी हजेरी लावावे असे आवाहन युवा सेनेचे सिद्धेश सुनील शिंदे यांनी केले आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# सावत्र आईकडून दोन चिमुकल्यांचा अमानुष छळ
# गुप्तांगाला गरम चाकूने चटके, अमानुष मारहाण

**प्रतिनिधी**
■ **वसई**

चिमुकल्यांवरील अत्याचाराच्या घटनांनी महाराष्ट्र हादरला असताना वसईत काळजाचा थरकाप उडवणारी घटना समोर आली आहे. सावत्र आईने ७ आणि ८ वर्षांच्या चिमुकल्यांना अमानुष मारहाण केल्याचे समोर आले आहे. तिने मुलांच्या गुप्तांगानाही गरम चाकूने चटके दिले आहेत. याप्रकरणी वसईच्या वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



वसईत राहणाऱ्या नागनाथ सावरगळी (३२) यांचा पहिली पत्नी चिन्नमा सोबत घटस्फोट झाला होता. त्यानंतर नागनाथ यांनी २०२३ मध्ये नेहा सावसगळी (२७) हिच्यासोबत दुसरे लग्न केले. नागनाथ यांना पहिल्या पत्नीसपासून ७ वर्षांचा अंकुश आणि ८ वर्षांचा आयुश अशी दोन मुले आहेत. नागनाथ यांचा कुरियरचा व्यवसाय असून नेहा गृहीणी आहे. कामानिमित्त नागनाथ बाहेर असायचे. मात्र गेल्या काही दिवसांपासून त्यांना मुलांच्या वागण्यात बदल जाणवला. मुले अबोल आणि घाबरलेली दिसू लागली. विचारणा केली तेव्हा मुले काही बोलत नव्हती. नागनाथ यांना मुलांच्या शरिरावर जखमा दिसल्याने हा प्रकार त्यांच्या लक्षात आला. मग मुलांनी सावत्र आई मारत असल्याचे सांगितले. त्यांच्या गुप्तांगाला गरम चाकूचे चटके दिले. लाटण्याने त्यांना अमानुष मारहाण केली. यानंतर नागनाथ यांनी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. वालीव पोलिसांनी या प्रकरणी नेहा सावगरळी विरोधात कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ तसेच अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ त्या कलम ७५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

मुलांना चटके दिल्याची घटना जून मध्ये घडली आहे. परंतु काल मुलांच्या पित्याने तक्रार दिल्यानंतर आम्ही आम्ही गुन्हा दाखल केला असून या याप्रकरणाची आम्ही चौकशी करत आहोत, अशी माहिती वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराज रणावरे यांनी दिली. मुलांची प्रकृती आता ठिक असल्याचे त्यांनी सांगितले.

माझ्या मुलांना ती खूप दिवसांपासून मारहाण करत होती. मात्र तिने मुलांना धाकात ठेवल्याने ते काही बोलत नव्हती. ती माझ्यामुलांकडून घरातील कामे करवून घेत होती, असे मुलांचे पिता नागनाथ सावरगळी यांनी सांगितले.

## बलात्कार करुन चोवीस वर्षे फरार असलेल्या आरोपीला अटक

**प्रतिनिधी**
■ **वसई**

बलात्कार करून चोवीस वर्षे फरार असलेल्या आरोपीला अटक करण्याची कामगिरी विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली आहे.

पीडित महिला चुलत भावाच्या लग्नासाठी कोळोशी वसईला २००१ साली आल्या होत्या. पहाटे ५ जणांनी तिला शेतात नेऊन बलात्कार केला होता. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात ३७६ (२), ३२३,३४ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास करताना गुन्हे प्रकटीकरण शाखेने गुप्त बातमीदारांमार्फत माहिती काढून शांताराम वरटा याला ठाणेकरपाडा,वसई येथून सापळा रचून अटक केली.शांताराम वरील ठिकाणी अधून मधून नातेवाईकानां भेटण्यासाठी येत असल्याच्या माहितीवरून गुन्हे शाखेने ही कारवाई केली.२४ वर्ष तो स्वतःचे अस्तित्व लपवून होता.

अटक केलेल्या इतर आरोपींना दोषी ठरवून न्यायालयाने कलम ३७६ (२) (ग) मध्ये प्रत्येकी ५ वर्षे सक्त मजुरी आणि २,००० रु. दंड, कलम ३२३ मध्ये १ वर्षे साथी कैद आणि ५००रु. दंडाची शिक्षा दि ली होती.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश फडतरे,उपनिरीक्षक अविनाश हाटखिळे,भाऊ डुबे, सहायक फौजदार विजय सूर्यवंशी, हवालदार सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेळके, मोहसीन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, प्रफुल सोनार यांनी ही कामगिरी केली.



*वसई। बदलापूरमध्ये नुकताच एका नामांकित शाळेतील मुलींवर झालेल्या लैगिक अत्याचाराविरोधातील आंदोलनाचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटत आहेत. या घटनेच्या पार्शवभूमीवर वसई -विरार मधील पोलीस शाळा -कॉलेज ला भेटीगाठी देऊन विध्यार्थी व शिक्षकांना सुरक्षिततेबाबत धडे देत आहेत.गुरुवारी नायगाव पोलीस ठाण्यातील पोलिसांनी वसई पूर्वेकडील कामण आश्रमशाळा येथे 'द गुड टच तसेच सेल्फ प्रोटेक्शन 'याबाबत मार्गदर्शन केले.तसेच मुलींच्या वस्तीगृहातील शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या.यावेळी नायगाव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे, पोलीस हवालदार महेश बोडके, पोलीस हवालदार आवारे, पोलीस अंमलदार काळे, बोडके तसेच वसतिगृहातील मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.*

# नालासोपाऱ्यात यंदा हायव्होल्टेज मुकाबला !
## महायुती व महाविकास आघाडीचे उत्तर भारतीय मतांचे चक्रव्यूह बविआ भेदणार?

**प्रतिनिधी**
■ **वसई**

उत्तर भारतीय मतांचे प्राबल्य असलेल्या नालासोपारा मतदारसंघात यंदा महायुती व महाविकास आघाडीचे बविआसमोर प्रामुख्याने आव्हान असणार आहे. उत्तर भारतीय मतदारांची लक्षणीय संख्या लक्षात घेता येथे भाजप हा पक्ष उत्तर भारतीय चेहरा रणांगणात उतरविण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीकडून हा मतदारसंघ ठाकरे गटाला सोडला जाईल. ठाकरे गट येथून तगडा चेहरा मैदानात उतविण्याच्या तयारीत आहे. यंदा लोकसभेतील मताधिक्याच्या आधारे नालासोपाऱ्यात बविआसमोर महायुती व महाविकास आघाडीचे तगडे आव्हान असल्याने येथील मुकाबला हा हायव्होल्टेज रंगणार अशी शक्यता आहे.



दिवाळीनंतर महाराष्ट्राच्या विधानसभेचा बार उडत आहे. तर ऑक्टोबर महिन्यात आचारसंहिता लागू होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. याच धर्तीवर बहुजन विकास आघाडीचा बालेकिल्ला असलेल्या नालासोपारा विधानसभा मतदारसंघात यंदा आमदार क्षितीज ठाकूर यांनाच बविआकडून मैदानात उतरवले जाण्याची शक्यता असून त्यांच्यासमोर भाजपचे व ठाकरे गटाचे आव्हान असणार आहे. सन 2019 साली शिवसेनेने उत्तर भारतीय चेहरा असलेल्या प्रदीप शर्मा यांना मैदानात उतरवून बविआची डोकेदुखी वाढवली होती. मात्र बविआ अध्यक्ष आमदार हितेंद्र ठाकूर यांनी संयमीपणे ही लढत लढून आपल्या चिरंजीवाला विजयी केले. दरम्यान, आता भाजपकडून जिल्हाध्यक्ष राजन नाईक व उत्तर भारतीय चेहरा भरत राजपूत यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. यातील एक नाव हे विधानसभेसाठी जाहीर होण्याची शक्यता अधिक आहे. तसेच ठाकरे गटाकडून संघटनात्मक पातळीवर पक्षाची बाजू मजबूत करणारे तसेच पालघरमध्ये शिवसेना वाढवणारे जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांचे नाव चर्चेत आहे.तर धनंजय गावडे हे ही राजकारणात सक्रिय झाले आहेत.

शिंदे गटाचादेखील नालासोपाऱ्यावर डोळा आहे. येथील उत्तर भारतीय मतदारांची मोठी संख्या ही जमेची बाजू असल्याने बविआसमोर तगडे आव्हान उभे करण्यासाठी महायुती व महाविकास आघाडी कोणाला संधी देते, ते पाहणे रंजक ठरणार आहे.

# पालिकेची तलावांकडे पाठ...
# तलाव संवर्धनाकडे पालिकेचे दुर्लक्ष

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या उदासीन कारभारामुळे महापालिकेच्या हद्दीतील काही तलाव सुशोभिकरणाच्या प्रतिक्षेत आहेत. तर काही तलावांचे सुशोभिकरण होऊनसुद्धा ते तलाव घाणीच्या विळख्यात सापडल्याने नागरिकांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. गणेशोत्सव तोंडावर असून सुशोभिकरण झालेल्या तलावांतील गाळ व अस्वच्छता यामुळे भाविकांच्या धार्मिक भावना दुखावण्याची शक्यता आहे.




राज्य शासन व केंद्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने तलावांच्या सुशोभिकरणासाठी एक मोहिम सुरू करण्यात आली होती. त्या मोहिमेच्या धर्तीवर पालिकेने आपल्या हद्दीतील तलाव सुशोभिकरणासाठी पावले उचलली. त्यामुळे बहुतांश तलावे पालिकेने सुशोभित केली. मात्र सध्यस्थितीत यातील काही तलावे अस्वच्छतेच्या विळख्यात सापडली आहेत. वसई पूर्वेतील वालीव तलावात तर अस्वच्छतेमुळे दुर्गंधी पसरली आहे. तर कामण येथील पिरांचा तलाव अद्याप सुशोभिकरणाच्या प्रतिक्षेत आहे. कामण गावचे माजी सरपंच दिनेश म्हात्रे यांनी तर पालिकेकडे अनेकदा पिरांच्या तलावाचे सुशोभकरण व्हावे यासाठी पालिकेकडे पाठपुरावा सुरू ठेवला आहे. मात्र पालिकेने त्याकडे सर्रास काणाडोळा केला आहे. तलावाच्या सुशोभिकरणाकडे पालिकेने सातत्याने केलेली पाठ ग्रामस्थांच्या नाराजीला खतपाणी घालत आहे. तलावासाठी निधी मंजूर होऊनही तलावाचे सुशोभिकरण रखडले आहे.

अनेक तलावांची वाताहत झाली असून सध्या गणेशोत्सव विसर्जन काळात भाविकांच्या धार्मिक भावनेला ठेच पोहोचण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## शालेय बसेसची परिवहन विभागाकडून तपासणी सुरु
### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कारवाई

**प्रतिनिधी**
■ **वसई**

बदलापूर येथील शाळकरी मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचारामुळे शालेय मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळकरी मुलांना ने आण करण्यासाठी ठेवलेल्या बसेस मध्ये सुरक्षेसाठी कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत याची तपासणी मोहीम प्रादेशिक परिवहन विभागाने सुरू केली आहे.

शालेय विद्यार्थ्यांना शाळेत ने आण करण्यासाठी बस गाड्या, व्हॅन ही ठेवल्या जात आहेत. परंतु या मुलांची सुरक्षित रित्या वाहतूक होणे आवश्यक आहे. काही ठिकाणी शाळेला लावण्यात आलेल्या बसेस नियमांचे व शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने असलेल्या सूचनांचे पालन करीत नाहीत. बदलापूर येथे शाळेत शाळकरी मुलीवर अत्याचार करण्याच्या घटनेनंतर त्याचे पडसाद सर्वत्र उमटू लागले आहेत.

# रविवार हार्बर व मध्य रेल्वेवर मेगा ब्लॉक

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मध्य रेल्वेवर सकाळी ११.०५ ते दुपारी ३.०५ पर्यंत माटुंगा-मुलुंड अप आणि डाऊन जलद मार्ग येथे मेगा ब्लॉक घेण्यात आला आहे. त्यामुळे छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.२५ ते दुपारी २.४५ पर्यंत सुटणाऱ्या डाऊन जलद मार्गावरील सेवा माटुंगा आणि मुलुंड स्थानकांदरम्यान डाऊन धिम्या मार्गावर वळवण्यात येतील आणि त्यांच्या नियोजित थांब्यांवर थांबून गंतव्यस्थानावर १५ मिनिटे उशिरा पोहोचतील. ठाण्यापुढील जलद गाड्या मुलुंड येथे डाऊन जलद मार्गावर वळवण्यात येणार आहेत.



ठाणे येथून सकाळी १०.५० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत सुटणाऱ्या अप जलद मार्गावरील सेवा मुलुंड येथे अप धीम्या मार्गावर वळवण्यात येतील आणि मुलुंड आणि माटुंगा दरम्यान त्यांच्या नियोजित थांब्यावर थांबून पुढे माटुंगा स्थानकावर अप जलद मार्गावर पुन्हा वळवण्यात येतील व गंतव्यस्थानावर १५ मिनिटे उशिराने पोहोचतील.

**हार्बर वर मेगाब्लॉक**

पनवेल- वाशी अप आणि डाऊन हार्बर मार्गावर सकाळी ११.०५ ते दुपारी ४.०५ पर्यंत मेगा ब्लॉक घेण्यात आला आहे. (नेरुळ/बेलापूर-उरण पोर्ट मार्ग वगळून) पनवेल येथून सकाळी १०.३३ ते दुपारी ३.४९ वाजेपर्यंत सुटणारी छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे जाणारी अप हार्बर मार्गावरील सेवा आणि छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी ९.४५ ते दुपारी ३.१२ या वेळेत पनवेल/बेलापूरकडे जाणारी डाउन हार्बर मार्गावरील सेवा बंद राहणार आहे.

पनवेल येथून सकाळी ११.०२ ते दुपारी ३.५३ वाजेपर्यंत ठाण्याकडे जाणाऱ्या अप ट्रान्सहार्बर मार्गावरील सेवा आणि पनवेल येथून सकाळी १०.०१ ते दुपारी ३.२० वाजेपर्यंत ठाणे येथे जाणाऱ्या डाउन ट्रान्सहार्बर मार्गावरील सेवा बंद राहतील.

ब्लॉक कालावधीत छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई-वाशी सेक्शनमध्ये विशेष लोकल चालतील. ब्लॉक कालावधीत ठाणे-वाशी/नेरुळ स्थानकांदरम्यान ट्रान्सहार्बर लाईन सेवा उपलब्ध असतील. ब्लॉक कालावधीत बेलापूर/नेरुळ आणि उरण स्थानकांदरम्यान पोर्ट लाईन सेवा उपलब्ध असतील.



*मुंबई। गोरेगावमधील प्रभाग क्रमांक ५६ मधील तिरंगा बिल्डिंग च्या शिव सहयाद्री गोविंदा पथकाच्या युवा बाल गोपाळ यांना मनाई कॉंग्रेस चे सचिव मनोज यादव यांनी टी शर्ट भेट देऊन प्रोत्साहित केले*

## बीकेसी पोलीस ठाण्यास अज्ञात मृतदेहाविरुद्ध अपमृत्युची नोंद

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मिठी नदीलगत एका अज्ञात इसमाचा मृतदेह पोलिसांना सापडला आहे. याबाबत बीकेसी पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सदर इसमाचे अंदाजित वय 40 असून उंची 5 फूट 8 इंच आहे. तसेच त्या इसमाच्या अंगावर हिरव्या रंगाचे टी शर्ट व निळया रंगाची जीन्स आहे. मयत इसमचे उजव्या हातावर मुकेश असे इंग्रजी व ओमदेखील गोंदलेले आहे. मुंबईसह महाराष्ट्रातील इतर पोलीस ठाण्यातील या मृतदेहाबाबतची मिसिंग तक्रार असल्यास कळवण्यात यावे. तसेच सदर अज्ञात मृतदेहाबाबत नातेवाईक व मित्रपरिवार यांना माहिती असल्यास बीकेसी पोलीस ठाण्याचे पीएसआय राहुल चंदनशिव (8390704496) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

**जाहीर सूचना**

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की सदनिका क्र. ५/३०२, ३ रा मजला, न्यू कॅस्टिलिन हाऊस सीएचएस, बी. मार्ग, माहीम (पश्चिम), मुंबई - ४०००१६ आणि प्रत्येकी पन्नास रुपयांचे ५ पूर्ण पेड-अप शेअर्स आणि विशिष्ट क्र. १६ ते २० (दोन्ही समावेशी) अंतर्गत शेअर सर्टिफिकेट क्र. ४ आणि अधिक विशेषतः येथे लिहिलेल्या वेळापत्रकात वर्णन केले आहे. ती जागा श्री. सुधीर सरकार यांनी श्री अब्दुल रहमान शेख (उर्फ मिस्टर अब्दुल रहमान सिद्दिकी) यांच्याकडून १२ एप्रिल १९८८ च्या विक्री कराराद्वारे खरेदी केली होती.

हा करार चुकीचा/गहाळ झाला होता आणि माझ्या क्लायंटने योग्य तत्परतेने शोधून काढला नाही. की माझ्या क्लायंटने संबंधित पोलिस स्टेशनला म्हणजे माहीम पोलिस स्टेशनमध्ये एन. सी. दाखल केली आहे. की श्री. सुधीर सरकार १० मार्च २०११ रोजी मृत्यू झाला, (१) श्रीमती शिप्रा सरकार, (२) श्री अर्जुन सरकार आणि (३) श्री. सूरज सरकार हे त्यांचे एकमेव कायदेशीर वारस म्हणून मागे राहिले. त्यानंतर हयात असलेल्या कायदेशीर वारसांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्र - सह - भरपाईच्या आधारे सोसायटीने सदस्यत्व श्रीमती शिप्रा सरकार यांच्याकडे हस्तांतरित केले. माझी क्लायंट, श्रीमती शिप्रा सरकार या त्या जागेच्या हक्काच्या आणि पूर्ण मालक आहेत.

वारसा, गहाण, भेटवस्तू, विक्री, ताबा, धारणाधिकार, भाडेपट्टा आणि यासारख्या गोष्टींद्वारे किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये कोणताही हक्क, शीर्षक किंवा व्याजाचा दावा करणारी कोणतीही व्यक्ती, सरकारी प्राधिकरण आणि/किंवा वित्तीय संस्था यांनी तिला / तिला सूचित करावे. / अधोरेखित पत्त्यावर लिखित स्वरुपात पुराव्यासह त्यांच्या दाव्याचे स्वरूप येथे प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या आत अधोरेखित पत्त्यावर अयशस्वी झाल्यास असे गृहित धरले जाईल की कोणतेही दावे नाहीत आणि आढळल्यास ते माफ केले गेले / जाणूनबुजून दावा न करता सोडले आणि सोडले गेले. त्यानंतरचे कोणतेही दावे किंवा आक्षेप अवैध मानले जातील.

**परिशिष्ट**

सदनिका क्र. ५/३०२,३ रा मजला, न्यू कॅस्टिलिन हाऊस सीएचएस, बी. मार्ग, माहीम (पश्चिम), मुंबई - ४०००१६ आणि प्रत्येकी पन्नास रुपयांचे ५ पूर्ण पेड-अप शेअर्स आणि विशिष्ट क्र. १६ ते २० (दोन्ही समावेशी) अंतर्गत शेअर सर्टिफिकेट क्र. ४ दिनांकित २८ डिसेंबर १९८६.

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक : २३/०८/२०२४**
**मुंबई ४०००१६**

**सही/-**
वकील सलोनी कीर्ती जैन
युनिट क्र. २०५, उद्योग मंदीर क्र. १
पितांबर लेन, माहीम पश्चिम

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 65**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ६५**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

**मुंबई ।** अटल सेतूवर महिलेचा जीव वाचवणारा उबर चालक संजय यादव यांचा भाजप प्रदेशाध्यक्ष आशिष शेलार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. मुंबई भाजपचे उपाध्यक्ष अमरजीत मिश्रा यांच्या दीप कमल फाउंडेशन या संस्थेतर्फे पंचवीस हजार रुपयांचा धनादेशही देण्यात आला. शेलार यांनी एक कार्यक्षम नागरिक म्हणून संजयच्या पाठीवर थाप दिली. शुक्रवारी शेलार यांनी संजय यादव यांचा शाल पांघरून व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. यासोबतच शेलार यांच्या वांद्रे कार्यालयात झारखंड सेलचे मनोजसिंह ठाकूर, उत्तर भारतीय मोर्चाचे उपाध्यक्ष घनश्याम मौर्य, शंभू सिंग, राकेश सिंग आदींनीही संजय यादव यांचा सत्कार केला.



# सरकारची प्रतिमा मलीन करून राजकीय लाभ मिळवण्याचा विरोधकांचा प्रयत्न - दरेकर

■ मुंबई

मुंबई- बदलापूरला झालेली घटना अत्यंत वाईट, हृदय हेलावणारी आहे. त्याचे कुणीच समर्थन करणार नाही. परंतु त्या घटनेच्या आधारे आंदोलनात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण सारखे फलक झळकवून जो राजकीय लाभ घेण्याचा प्रयत्न, सरकारची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न झाला तो घृणास्पद आहे. अशा प्रकारचे किळसवाणे राजकारण महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत कधीच पाहायला मिळाले नाही. त्याचवेळी हे आंदोलन राज्यभर न्यायचे, सरकारची प्रतिमा मलीन करत विधानसभेला राजकीय लाभ मिळवायचा अशा प्रकारचा महाविकास आघाडीतील नेत्यांचा प्रयत्न असल्याचा गंभीर आरोप भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी केला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना दरेकर म्हणाले की, संवेदनहीनतेने महाविकास आघाडीचे नेते वागताना दिसताहेत. म्हणूनच कोर्टाने योग्य अशी चपराक महाराष्ट्र बंदच्या संदर्भात त्यांना लगावली आहे. सरकारलाही याबाबत काळजी घेऊन जनतेच्या हिताची रक्षण करण्याची भुमिका घेण्यास सांगितलेय. अशा प्रकारच्या हीनावणाऱ्या प्रसंगांना राजकीय नौटंकी करणे ही महाराष्ट्राच्या संस्कृतीला व्यथित करणारी अशी भुमिका आहे.

तसेच झालेल्या प्रकाराबाबत जनतेच्या भावना निश्चितच तीव्र आहेत. त्याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. सरकारही त्याबाबत कडक कारवाई करतेय. आरोपीला अटकही केलीय. प्रकरण फास्ट ट्रॅकवर आणतेय. कठोरात कठोर कारवाई करून लवकरच फाशीची शिक्षा कशी होईल याचा सरकार प्रयत्न करतेय. तथापी या प्रसंगाचा राजकीय फायदा उठवावा असे जनतेला कधीच वाटत नाही, ते मान्यही नाही. मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या प्रसंगाचे राजकारण करणे किळसवाणे आहे. हे जनतेचे आंदोलन नाही. राजकीय दृष्टिकोनातून सुरू असलेले आंदोलन असल्याचे ते म्हणाले.

# नेपाळ बस दुर्घटनेवर मुख्यमंत्री शिंदे यांचा केंद्रीय गृहमंत्र्यांशी संवाद

- वायुसेनेच्या विमानाने शनिवारी मृतदेह महाराष्ट्रात आणणार
- समन्वयासाठी नोडल अधिकारी नियुक्त

प्रतिनिधी
■ मुंबई

नेपाळमध्ये झालेल्या बस दुर्घटनेत जळगाव जिल्ह्यातील २४ जणांच्या मृत्यू प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त करीत कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त केली आहे. याअपघातातील मृतदेह तातडीने महाराष्ट्रात आणण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय वरीष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला. याप्रकरणी केंद्राकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी मुख्यमंत्र्यांना दिले होते. मुख्यमंत्र्यांच्या विनंतीला तात्काळ प्रतिसाद देत वायुसेनेच्या विमानाने उद्या शनिवारी २४ जणांचे मृतदेह नाशिक येथे आणण्यात येणार आहेत. तेथून कुटुंबियांकडे ते पोहोचविण्यात येणार आहेत.

जळगाव जिल्ह्यातील भाविकांच्या बसला नेपाळमध्ये दुर्घटना झाल्याने २४ जणांचा मृत्यू झाल्याची बातमी कळताच मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी राज्यातील मदत व पुनर्वसन विभागातील अधिकारी, केंद्रीय अधिकारी यांच्याशी सातत्याने संवाद साधत मदतीच्या कामाची माहिती घेतली.

मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री शाह यांच्याशी संवाद साधून भाविकांचे मृतदेह महाराष्ट्रात तातडीने आणण्याकरिता विनंती केली होती. याप्रकरणी राज्याला सर्वतोपरी मदत करू. त्यासाठी समन्वयासाठी विशेष अधिकारी नियुक्त केल्याचेही केंद्रीय गृहमंत्र्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या मागणीला तात्काळ प्रतिसाद वायुसेनेचे विशेष विमान मृतदेह आणण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उद्या हे मृतदेह नेपाळवरून उत्तर प्रदेशातील गोरखपुर येथे आणण्यात येतील. तेथून वायुसेनेच्या विमानाने नाशिक येथे ते आणले जातील. त्यानंतर कुटुंबियांकडे मृतदेह सोपविण्यात येणार आहेत.

# अनिल अंबानींवर 5 वर्षांसाठी शेअर बाजारात बंदी




प्रतिनिधी
■ मुंबई

निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी बाजार नियामक सेबीने उद्योगपती अनिल अंबानी यांच्यावर शेअर बाजारातून 5 वर्षांसाठी बंदी घातली आहे. अंबानींना 25 कोटींचा दंडही ठोठावण्यात आला आहे. कोणत्याही लिस्टेड कंपनीत संचालक असण्यावरही बंदी आहे.

त्यांच्याशिवाय, रिलायन्स होम फायनान्सच्या माजी प्रमुख अधिकाऱ्यांसह इतर 24 संस्थांवर बंदी घालण्यात आली आहे. त्यांच्यावर 6 महिन्यांची बंदी आणि 6 लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. सेबीने याबाबत 222 पानांचा आदेश जारी केला आहे. अनिल अंबानी यांनी आरएचएफएल अधिकाऱ्यांच्या मदतीने निधीचा गैरवापर केल्याचे सेबीच्या तपासात समोर आले आहे.

## सेबीच्या आदेशाशी संबंधित 3 गोष्टी

- आरएचएफएलच्या बोर्डाने अंबानींनी निधी काढून घेण्यास विरोध केला, परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.
- या फसवणुकीत आरएचएफएलला तितकेच दोषी मानले जाणार नाही, कारण त्यात फक्त काही लोक सहभागी होते.
- उर्वरित संस्थांनी एकतर बेकायदेशीरपणे कर्ज घेतले किंवा RHFL कडून निधी बेकायदेशीरपणे वळवण्याची सोय केली.

***शेअर 14% पर्यंत घसरले***
*सेबीच्या बंदीनंतर अनिल अंबानींच्या रिलायन्स इन्फ्रा, रिलायन्स होम फायनान्स आणि रिलायन्स पॉवर या कंपन्या घसरत आहेत. रिलायन्स इन्फ्रा सर्वात जास्त 14%, रिलायन्स होम फायनान्स 5.12% आणि रिलायन्स पॉवर 5.01% ने घसरला आहे.*

# मुंबई महानगरपालिकेत अभियांत्रिकी संवर्गाची सुमारे 1800 पदे विविध प्रशासकीय कारणांनी रिक्त पदे भरण्यासाठी लढा उभारणार - बाबा कदम

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील नागरिकांना दैनंदिन नागरी सेवा देण्यात, महत्वाची भूमिका आहे त्या मुंबई महानगरपालिकेतील अभियांत्रिकी संवर्गाची सुमारे १८०० पदे आज विविध प्रशासकीय कारणांनी रिक्त आहेत. कनिष्ठ अभियंता ( स्थापत्य / यांत्रिकी व विद्युत) या संवर्गातील देखील सुमारे ८०० जागा रिक्त आहेत. पैकी २०% रिक्त जागा खात्यांतर्गत भरती प्रक्रियेच्या माध्यमातून महापालिकेत कार्यरत कामगार / कर्मचाऱ्यांमधून भरण्याचे धोरण सन २००३ पासून उपयोगात आणले जाते. पण त्या जागा भरल्या गेल्या नाहीत. आज महापालिकेतील याच संवर्गातील रिक्त पदे आणि त्याचा विभागीय स्तरावरील दैनंदिन कामकाजावर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता, ही पदे तात्काळ भरणे आवश्यक आहे. अशी मागणी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेने पालिका प्रशासनाकडे केली आहे.

जेणेकरून कार्यरत कर्मचाऱ्यांच्या अनुभवाचा उपयोग करून घेऊन, नागरी सेवा देण्यात होणारी दिरंगाई आणि ताण कमी होईल. असे ही युनियनने म्हटले आहे.

महापालिकेतील गुणवत्ता धारक आणि कुशल कामगार / कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन आणि विकासात्मक संधी देण्याचा उदार उद्देश ठेऊन, या २० % जागा गुणवत्तेवर आधारित धोरणानुसार सन २००९ पासून अंतर्गत भरतीसाठी परिपत्रक निर्गमित करून, अर्जदार कामगारांची निवड यादी निश्चित करून नियुक्ती करणे अशाप्रकारे अगदी सन २०१९ पर्यंत भरल्या गेलेल्या आहेत. युनियन अर्हताधारक कामगार / कर्मचारी याकरिता संबंधित प्रशासनाकडे सतत पाठपुरावा करीत आहेत. परंतु प्रशासन आडमुठेपणा घेऊन, प्रचलित धोरण बदलून, या २०% राखीव जागा भरतीच्या धोरणाला मूठमाती देण्याचा प्रयत्न करीत आहे. या संघर्षात आता या नैराश्य आणि अन्यायग्रस्त कामगार / कर्मचारी यांच्या लढ्यात मुनिसिपल कामगार कर्मचारी सेना उतरली आहे. संघटनेचे अध्यक्ष बाबा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सरचिटणीस संजय वाघ यांनी सदर प्रलंबित भरती प्रचलित पद्धतीने तत्काळ करण्यासाठी ०२.०८.२०२४ रोजी अति. आयुक्त (पू. उप.) यांच्या दालनात बैठक घेतली. सदर बैठकीत सकारात्मक चर्चा घडवून, या भरती प्रक्रियेतील अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न अति. आयुक्त ( पू. उप.) यांनी केला. परंतु प्रशासकीय बाबी लक्षात घेता, हा प्रलंबित प्रश्न केवळ मनपा आयुक्त सोडवू शकतील, यास्तव त्यांच्या सोबत चर्चा करावी असा निष्कर्ष काढून संपली. काही स्वार्थी कर्मचाऱ्यांनी राजकीय हस्तक्षेप करून, या संपूर्ण प्रक्रियेला बाधा आणला आहे, असे देखील सूत्रांकडून समजते. यास्तव, संघटनेने याबाबत मनपा आयुक्त यांना तत्काळ या विषयावर चर्चा करण्यासाठी विनंती पत्र सादर केलेले आहे.

# मुंबईत पाच दिवस पोलीस बंदोबस्त

■ मुंबई

बदलापुरमध्ये दोन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने २४ ऑगस्ट रोजी दिलेली महाराष्ट्र बंदची हाक, चेहलम, कृष्णजन्म व गोपाळकालाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत पाच दिवस पाच दिवस कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. बंदोबस्तासाठी अतिरिक्त पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात येणार असून कोणताही अुचित प्रकार घडू नये यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई सुरू करण्यात आली आहे. विरोधकांनी बंदची हाक दिल्यानंतर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी स्थानिक पातळीवर बंदोबस्त ठेवण्याचे आदेश राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांना देण्यात आली आहे.

# 'महाराष्ट्र बंद'मधून राजकीय पोळी भाजण्याची केविलवाणी धडपड

## शिवसेना प्रवक्ते राजू वाघमारे यांची टीका

प्रतिनिधी
■ मुंबई

बदलापूरातील आंदोलन हे राजकीय हेतूने प्रेरित होते. याच घटनेचा वापर करत महाराष्ट्र बंदची घोषणा करुन राजकीय पोळी भाजण्याची केविलवाणी धडपड आहे, अशी टीका शिवसेना सहमुख्य प्रवक्ते राजू वाघमारे यांनी काल केली.

चिमुरड्यांवरील अत्याचाराविरोधात आंदोलन भडकवून त्याचा वापर महाविकास आघाडी सत्तेवर येण्यासाठी करत आहे. प्रगतीशील महाराष्ट्राला बदनाम करण्याचे विरोधकांचे षडयंत्र जनता येत्या निवडणुकीत हाणून पाडेल, असे डॉ. वाघमारे म्हणाले.

कोर्टाने संप करू नये, असे आदेश दिल्याने महाविकास आघाडीची लाज वाचली कारण जनतेला कळून चुकलेले की विरोधक राजकीय स्वार्थासाठी हे करत आहेत. त्यातही शरद पवारांनी बंद मागे घेऊन उद्धवजींना बंद मागे घ्यायला लावला म्हणजे आता उबाठा पक्ष शरद पवार चालवत आहे का? हा प्रश्न महाराष्ट्राला पडला आहे, असे डॉ. वाघमारे म्हणाले.

बदलापूर आंदोलनात अचानक बाहेरचे लोक कसे सहभागी झाले. या आंदोलनात लाडकी बहिण योजेनेचे बॅनर कसे आले याचा पोलीस तपास करत आहेत. बाल अत्याचाराच्या दुर्देवी घटनेचे स्वार्थासाठी विरोधक राजकारण करत असतील तर त्यांची शाहु फुले आंबेडकरांच्या महाराष्ट्रात राहण्याची लायकी नाही, असा घणाघात डॉ. वाघमारे यांनी केला.




**मुंबई ।** उमरखाडी येथे शिवसेना मुंबादेवी विधानसभा संघटक रुपेश पाटील, महिला संघटक प्रिया पाटील यांच्या वतीने चोर गोविंदाचे आयोजन करण्यात आलं होते. या कार्यक्रमाला मुंबईचे पालकमंत्री, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी हजेरी लावली.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.

**शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी करार/कंत्राटी पद्धतीने मुलाखतीद्वारे भरणेबाबत**

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव | महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, गोरेगांव (पू), मुंबई - ४०० ०६५ |
| २ | पदनाम व पदसंख्या | मुख्य कार्यकारी अधिकारी (सांस्कृतिक समन्वय आणि विशेष प्रकल्प) - १ पद |
| ३ | पदाचे स्वरुप व कालावधी | कंत्राटी/करार पद्धतीने ११ महिने |
| ४ | सविस्तर जाहिरात व अर्ज उपलब्धतेचे ठिकाण | www.filmcitymumbai.org |
| ५ | अर्ज पाठविण्याचे ठिकाण | filmcitycao@gmail.com |
| ६ | अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक | दि. २६.०८.२०२४ ते दि. ०३.०९.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ७ | निवड पद्धत | मुलाखतीद्वारे |

अर्जाचा नमुना, पदाची अर्हता, अनुभव, अटी, शर्ती यांचा तपशील **www.filmcitymumbai.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातच अर्ज सादर करावा, अन्यथा आपल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक, म.चि.रं. व सां.वि.म.मर्यादित

# बदलापुरवासियांवरील गुन्हे रद्द करा



प्रतिनिधी
■ मुंबई

बदलापूर मधील अत्यंत लहानग्या मुलींवरील अत्याचाराची घटना महाराष्ट्राला मान खाली घालायला लावणारी आहे.मानवतेला काळीमा फासणाऱ्या या घटनेच्या निषेधार्थ उत्स्फूर्त आंदोलन करणाऱ्या बदलापूरवासियांवर दाखल झालेले गुन्हे रद्द करावेत.बदलापूर मधील त्या आंदोलकांना अटक करू नये अशी आपली मागणी असून त्यासाठी आपण लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत अशी माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी दिली.

बदलापूर प्रकरणातील पीडित लहानग्या मुलींच्या कुटुंबाला मुख्यमंत्र्यांनी विशेष सहाय्य म्हणून आर्थिक मदत दिली पाहिजे अशी मुख्यमंत्र्यांकडे आपण मागणी करणार आहोत असे ना.रामदास आठवले म्हणाले. आज बदलापूरला भेट देऊन येथील नगरपरिषद कार्यालयात बदलापूर प्रकरणाबाबत सर्व पोलीस आणि प्रशासन अधिकाऱ्यांची बैठक ना.रामदास आठवले यांनी घेतली.यावेळी पोलीस उपायुक्त डॉ सुधाकर पठारे; तहसीलदार अमित पुरी; बदलापूर नगर परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी मारुती गायकवाड आदी अधिकारी पोलीस प्रशासन अधिकारी उपस्थित होते.

बदलापूर मधील आदर्श विद्यालयात ही दुर्घटना घडली त्या शाळेचे व्यवस्थापन बरखास्त करण्यात आले असून प्रशासक नियुक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी आयपीएस अधिकारी आरती सिंग यांच्या नेतृत्वात एस आय टी ची स्थापना करण्यात आली आहे.या प्रकरणातील आरोपी ला फाशीची शिक्षा झाली पाहिजे यासाठी खटला जलद गती न्यायालयात चालविण्यात येणार असून विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकरणाची मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकार ने गांभीर्याने दखल घेतली आहे.आरोपीला फाशी शी कठोर शिक्षा होण्यासाठी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची नियुक्ती केली आहे.

विरोधी पक्षाने या प्रकरणी राजकारण करू नये.हे अत्यंत निषेधार्ह मानवतेला काळीमा फासणारे प्रकरण आहे .उज्ज्वल निकम हे अनुभवी वकील असल्यानेच त्यांना विशेष सरकारी वकील म्हणून या प्रकरणी नियुक्ती केली असल्याची माहिती ना.रामदास आठवले यांनी दिली. आरोपी शिंदे हा मूळ गुलबर्गा कर्नाटक चा रहिवासी असून 1 ऑगस्ट पडून तो कामावर आला होता.लहान मुलींच्या सांभाळा साठी महिला सेवकच शाळेत नियुक्त केले पाहिजेत त्यासाठी पुरुष मदतनीस ठेवणे अत्यंत चुकीचे आहे असे ना. रामदास आठवले म्हणाले.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे सुरेश बार्शींग, अण्णा रोकडे, दयाळ बहादु, बाळाराम गायकवाड,सिद्राम ओव्हाळ,भास्कर वाघमारे, भगवान भालेराव, संजय गायकवाड, प्रल्हाद जाधव,रामा कांबळे, संजय गायकवाड,बाळ भालेराव, बबन केदारे, प्रल्हाद मगरे आदी अनेक रिपाइं पदाधिकारी उपस्थित होते.

**पनवेल महानगरपालिका**
ता.पनवेल, जि.रायगड - ४१० २०६
**ई-निविदा सुचना**
**मलनि:स्सारण विभाग**

दुरध्वनी कार्यालय ०२२ - २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२ - २७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.३८१/३८२/२०२४ दिनांक :- २३/०८/२०२४

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्यावतीने ई - निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब - १ नमुन्यातील खालील कामाची निविदा मागविण्यात आली आहे.

| अनु क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST वगळून) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | PMC/ Sewerage /२७/ २०२४-२५. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील काळुंद्रे येथील २ एम.एल.डी. क्षमतेचे मलनि:स्सारण प्रक्रिया केंद्राचे तीन (३) वर्षाकरीत परिचलन, देखभाल व दुरुस्ती करणे बाबत. | 2,11,88,488.00 | 1,50,000/- | 2000/-+ 360(@18% GST) = 2,360/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनेवल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.३८१/३८२/२०२४
दिनांक :- २३/०८/२०२४
जा.क्र. पमपा/ मल.वि./२२२३/प्र.क्र.१९/१०२९/२०२४
दिनांक :- २३/०८/२०२४

सही /-
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका

**नवी मुंबई महानगरपालिका**
**आरोग्य विभाग**
**निविदा सूचना क्र.-नमुंमपा/आरोग्य/ 25 /2024**

**कामाचे नांव :-** नमुंमपा कार्यक्षेत्रामध्ये डायलेसीस सुविधा बाहययंत्रणेव्दारे पुरविणेबाबत.
**अंदाजपत्रकीय रक्कम रु. :- 15,93,51,169/-**
**कामाचा कालावधी :- 10 वर्षे**

**सदर निविदेबाबत विस्तृत माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in. यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.**

ऑनलाईन निविदा तयार करावयाची अंतिम दिनांक 09.09.2024. (2:30 pm वाजे पर्यंत आहे).

सही/-
**(डॉ. प्रशांत जवादे)**
**वैद्यकिय आरोग्य अधिकारी**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/269/2024

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई**

जा.क्र. झोपुप्रा/सनिस/कार्यासन-१/टे.सी.४/सन २०२४ /SRA/CO/OW/२०२४/४४९५३, दिनांक: २१/०८/२०२४
**सहकार कक्ष, झोपुप्रा, बृहन्मुंबई**

**-: सर्वसाधारण सभेची नोटिस :-**

**बोरभाट पाडा एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, एफ.पी.नं.१७९, टी.पी.एस.- III, व्हिलेज एक्सर, ता. बोरीवली, कस्तुरपार्क, शिंपोली रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२** या संस्थेच्या संदर्भात मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांचेकडील दिनांक २२.०७.२०२४ रोजीचे कायदा कलम १३(२) आदेशान्वये पुनर्वसन योजनेचे विकासक मेसर्स श्रीनिवास डेव्हलपर्स यांची नियुक्ती रद्द करण्यांत आलेली आहे. त्याअनुषंगाने सदरहू संस्थेने योजनेसाठी नविन विकासकाची नियुक्ती प्राधिकरणाकडील प्राधिकृत अधिकारी यांच्या उपस्थितीत करणेबाबत विनंती केलेली होती. त्याअनुषंगाने या कार्यालयाकडून दिनांक ०१.०८.२०२४ रोजी मा. सचिव, झो.पु.प्रा. व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांना टिप्पणी सादर करण्यांत आलेली असून सदर टिप्पणीवर दिलेल्या मंजूरीस अनुसरुन प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १६९ मधील तरतुदीनुसार सदरहू संस्थेच्या पुनर्वसन योजनेसाठी नविन विकासक नियुक्त करणेसाठी निम्न स्वाक्षरीकार यांची मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे), झो.पु.प्रा., बृहन्मुंबई यांचेकडील दिनांक २१.०८.२०२४ रोजीच्या आदेशान्वये प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १६९, दिनांक ३१.१२.२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन सर्वसाधारण सभा **गुरुवार, दिनांक ०५/०९/२०२४ रोजी ठिक सकाळी १०:०० वाजता, स्थळ : समता क्रीडा भवन हॉल, साईनगर, एम.जी.क्रॉस रोड नं.१, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०६७** येथे खालील विषयावर सभा आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस संस्थेच्या मंजूर परिशिष्ट-२ व पुरवणी परिशिष्ट-२ मधील पात्र झोपडीधारकांनीच उपस्थित रहावे. अन्य व्यक्तीस सभेस उपस्थित राहता येणार नाही. कृपया याबाबत नोंद घ्यावी.

**-:सभेचा विषय:-**

- **संस्थेसाठी नविन विकासक व वास्तुविशारद यांची नियुक्ती करणे.**

स्वाक्षरी/-
(आर.एन.हळदे)
प्राधिकृत अधिकारी तथा
सहकारी अधिकारी श्रेणी-१, झो.पु.प्रा.,बृहन्मंबई.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २१/०८/२०२४


टिप:
१ सभेस उपस्थित पात्र झोपडीधारकांची बायोमेट्रीक पध्दतीने नोंद घेण्यात येणार असून सदर बायोमेट्रीक पध्दतीने घेण्यात येणारी नोंद सकाळी १०.०० ते ११.३० पर्यत असेल. तद्नंतर सभेस सुरूवात करण्यात येईल.
२. सदर सभेच्या वेळी नवीन विकासक व वास्तुविशारद यांच्या नियुक्तीसाठी त्याच वेळी उपस्थित झोपडीधारकांकडून अर्ज मागविण्यात येतील. एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास प्राप्त अर्जांमधून गुप्त मतदान (Ballot Paper) पध्दतीने नवीन विकासक व वास्तुविशारद यांची निवड करण्यात येईल. तसेच संबंधित विकासकाचे व वास्तुविशारद यांचे नांव सूचविल्यास सदर विकासक व वास्तुविशारद यांचे काम करण्यास सहमती असल्याबाबत संमतीपत्र सभेच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.
३. सभेस परिशिष्ट-२ मधील पात्र झोपडीधारकांनी स्वतःची ओळख होईल अशा मूळ ओळखपत्रासह (पॅन कार्ड, आधार कार्ड, निवडणूक कार्ड इ.) विहीत वेळेत उपस्थित राहावे. अन्य व्यक्तीस उपस्थित राहता येणार नाही. मुळ झोपडीधारक मयत असल्यास त्याचे मृत्युपत्रासह त्याचे पती/पत्नी मूळ ओळखपत्रासह उपस्थित राहू शकतात.
४. गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी सभा घेण्यात येईल. सदर सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.
५. सदरहू सभेची नोटीस संस्थेच्या संबंधित झोपडीधारकांना पोहोच करण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेची राहिल.
६. सभेच्या कामकाजाचे प्राधिकरणामार्फत चित्रीकरण (Video) करण्यात येणार आहे.

प्रति:
१) श्री./श्रीमती ...................................................... मंजूर परि-२ मधील अ.क्र. ..........................
पत्ता : बोरभाट पाडा एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, एफ.पी.नं.१७९, टी.पी.एस.- III, व्हिलेज एक्सर, ता. बोरीवली, कस्तुरपार्क, शिंपोली रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२.
२) संस्थेचे नोटिस बोर्ड, बोरभाट पाडा एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, एफ.पी.नं.१७९, टी.पी.एस.- III, व्हिलेज एक्सर, ता. बोरीवली, कस्तुरपार्क, शिंपोली रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (पूर्व व पश्चिम उपनगरे), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.

**प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**
**दूरध्वनी क्र. २६५६ ५८०० / २६५९ ०४०५ / १८७९ ● फॅक्स क्र. ९१-२२-२६५९ ०४५७**
**संकेतस्थळ: www.sra.gov.in ● ई-मेल: info@sra.gov.in**
SRA/PRO/96/2024

अत्यंत कठीण काळातही आनंद मिळू शकतो, फक्त तो कसा मिळवावा हे संबधिताला समजलं पाहिजे.



- जे. के. रोलिंग
प्रसिद्ध लेखिका


वृत्तमानस

मुंबई, शनिवार, २४ ऑगस्ट २०२४


# कृषी नियोजन कधी सुधरवणार?

आपल्याकडील शेती ही बहुतांशी पावसावर अवलंबून आहे आणि पावसाचे प्रमाण हे अनियमित, अनिश्चित असल्यामुळे पीक उत्पादन हे निश्चित स्वरूपाचे नसते. त्यामुळे पिकांची उत्पादकता कमी राहते व त्यात अस्थिरता आढळून येते. याकरिता जेवढे उपलब्ध पाणी आहे, त्याचा चांगल्या प्रकारे उपयोग करण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने पाण्याचे व्यवस्थापन व पीक पद्धतीचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे. आपल्याकडे जलसंपत्ती मर्यादित आहे. त्यामुळे उपलब्ध असलेली जलसंपत्ती जास्तीत जास्त कार्यक्षमतेने वापरणे महत्त्वाचे आहे. यासाठी पिकांचे फेरनियोजन करण्याची गरज आहे. पिकांचे नियोजन हे मुख्यतः उपलब्ध पाणीसाठा, पिकांना भविष्यात मिळणारा भाव, किमान आधारभूत किंमत यावर अवलंबून असते. कोरडवाहू शेतकऱ्यांचा विचार केल्यास त्यांनी सोयाबीन, मूग, उडीद, तूर, हरभरा अशा पिकांचे नियोजन केल्यास त्यांना चांगला आर्थिक फायदा मिळू शकतो. मागील पाच दशकांतील कालावधीमध्ये तृणधान्य पिकांखालील क्षेत्रामध्ये घट झालेली आहे. तृणधान्य पिकांपैकी गहू, खरीप ज्वारी, रब्बी ज्वारी व भरडधान्य या पिकांखालील क्षेत्रामध्ये विशेषतः अधिक घट झालेली आहे. गहू व ज्वारी या मुख्य अन्नधान्याच्या पीक क्षेत्रामध्ये घट होत असून, ती चिंतेची बाब आहे. आज लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढत आहे त्या प्रमाणात लोकसंख्येला पुरेल एवढे तृणधान्य निर्माण करणे गरजेचे आहे. त्यासाठी पीक आराखड्यात योग्य ते बदल करून त्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. आपल्या राज्यातील जमीन वापराच्या आकडेवारीनुसार गेल्या दोन दशकांमध्ये पिकांखालील निव्वळ क्षेत्रात ३० लाख हेक्टरने घट झाली असून, त्याकडे राज्यकर्त्यांनी गांभीर्याने पाहिले पाहिजे. राज्यात सर्वाधिक लोक हे शेती आणि शेतीपूरक व्यवसायाशी जोडलेले आहेत. त्यामुळे अनेकांच्या उदरनिर्वाहाचे साधन शेतीच आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून वाढते औद्योगिकीकरण, नवे उद्योग, नवे प्रकल्प, रस्ते, सिंचन प्रकल्प तसेच मानवी वसाहतींसाठी बिगर शेतीकरणाचे प्रमाण झपाट्याने वाढत चालले आहे. त्यामुळे शेती क्षेत्रामध्ये घट होत चालली असल्याचे वास्तव आहे. विभक्त कुटुंब पद्धतीत वडिलोपार्जित जमिनीमध्ये हिस्से पडून शेतजमिनीचे वाटप झाल्यानेही शेती विभागली गेली आहे. जमिनीच्या छोट्या तुकड्यावर उदरनिर्वाह होत नसल्याने अनेक कुटुंबांनी गावाकडील पारंपरिक शेती व्यवसाय सोडून अन्य व्यवसाय किंवा नोकरीसाठी मोठी शहरे गाठली आहेत. त्यामुळे शहरातील लोकसंख्या वाढली आहे, तर गावे ओस पडू लागली आहेत. विविध कारणांमुळे शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या शेती क्षेत्रात झपाट्याने घट होत चालली आहे. त्यामुळे राज्यात अल्पभूधारकांचीही संख्या वाढत चालली आहे, तर काही भागात भूमिहीन होण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. शेतात मोबदला कमी मिळत असल्याने मजुरांची उणीव, पावसाची अनियमितता, वाढणारी महागाई, त्यात बाजारात शेतमालाला योग्य दर मिळत नसल्याने शेती व्यवसाय आर्थिक अडचणीत सापडला आहे. दिवसेंदिवस लागवडीखालील क्षेत्र कमी होऊन शेती व्यवसाय हळूहळू कमी होत आहे. जमीन विक्री करून मोठ्या प्रमाणात पैसा मिळत असल्याने आणि नव्या पिढीतील सदस्यांची शेती व्यवसायाबद्दल अनास्था निर्माण झाली आहे. अनेक कुटुंबातील सदस्य नोकरी-व्यवसायात गुंतल्याने जमिनी पडीक राहण्याचे प्रमाण जास्त आहे. महागाईमुळे शेतीचा खर्च परवडत नाही. खते, बियाणे, ट्रॅक्टर यांची भाववाढ झाली आहे. शेतीचा खर्च आणि त्यातून होणारे उत्पन्न याचा ताळमेळ जुळत नसल्याने अनेक शेतकरी आपल्या जमिनी विकत आहेत. पिकाखालील क्षेत्र कमी होत असतानाच राज्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. २०१५-१६च्या कृषी गणनेनुसार महाराष्ट्रातील खातेदार शेतकऱ्यांची संख्या १ कोटी ५२ लाख ८५४ इतकी आहे. यातील तब्बल १ कोटी २१ लाख ५५ हजार शेतकरी हे अत्यल्प आणि अल्पभूधारक आहेत. एक हेक्टरपेक्षा कमी म्हणजे अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण ५१.१३ टक्के, १ ते २ हेक्टरपर्यंत अल्पभूधारक शेतकऱ्यांचे २८.३८ टक्के, २ ते ४ हेक्टरपर्यंत अर्ध मध्यम भूधारक शेतकऱ्यांचे १५.२२ टक्के, ४ ते १० हेक्टरपर्यंत मध्यम भूधारकांचे ४.८० टक्के तर १० हेक्टरपेक्षा शेतजमीन असलेल्या बहुभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण ०.४५ टक्के आहे. २०१५- १६ नंतर आजपर्यंत कृषी गणना जाहीर झालेली नाही, पण राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय तसेच सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने २०१९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या वाढल्याचेच दिसून आले असून, हा अहवाल धोक्याचा इशारा देणारा आहे. २०२२-२३ च्या जमीन वापर आकडेवारीनुसार राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी पिकांखालील निव्वळ क्षेत्र५३.६ टक्के आहे. २००४-०५च्या आकडेवारीनुसार निव्वळ पेरणी क्षेत्र ५६.८६ टक्के होते. म्हणजे गेल्या दोन दशकांमध्ये पिकांखालील क्षेत्रात तब्बल ३० लाख हेक्टरने घट झाली आहे. २००४-०५ मध्ये राज्यात नापीक व मशागतीस अयोग्य आणि मशागतयोग्य पडीक क्षेत्र ८.५९ टक्के, इतर पडीक क्षेत्र ८.२० टक्के, गायराने, चराऊ कुरणे व किरकोळ झाडाझुडपांखालील क्षेत्र ४.८८ टक्के तर बिगर शेती वापराखाली आणलेले क्षेत्र ४.५३ टक्के होते. २०२२-२३च्या स्थितीनुसार लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन १२ टक्के, लागवड न केलेली इतर जमीन आठ टक्के, पडीक जमीन नऊ टक्के इतकी आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने ऊस व कापूस या पिकांचा नगदी पिकांमध्ये समावेश होतो. मागील पाच दशकात ऊस व कापूस या पिकांच्या क्षेत्रामध्ये भरीव वाढ झालेली आहे. मात्र या दोन्ही पिकांचा कालावधी दीर्घ असल्याने त्यांची पाण्याची गरज जास्त आहे. पाणी वापराचा व प्रति युनिट निव्वळ उत्पन्नाचा विचार केल्यास ऊसापेक्षा अन्नधान्य पिकांमध्ये पाण्याची कार्यक्षमता जास्त आहे. सिंचन सुविधेच्या मर्यादा लक्षात घेता ऊस पिकाखालील जास्तीत जास्त क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणून उर्वरित पाण्याचा इतर पिकांसाठी वापर करण्याबाबत शेतकऱ्यांना प्रेरित केले पाहिजे. तसेच कापूस पिकाखालील क्षेत्रही सुक्ष्म सिंचनाखाली आणण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. नियोजनाद्वारे प्रति हेक्टरी उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न गरजेचे आहे. कोरडवाहू क्षेत्र जास्त असल्याने कमी उत्पादन खर्चाचे त्यादृष्टीने मराठवाडा व विदर्भात ज्वारी खालील क्षेत्र वाढविण्यावर भर देण्यात येईल. सिंचनाची उपलब्धता असलेल्या क्षेत्रावर गहू पिकास प्रोत्साहन दिले पाहिजे. शेतकऱ्यांच्या जमीन धारण क्षेत्राचे प्रमाण कमी होत असताना भूमिपुत्रांना देशोधडीला लावणाऱ्या समस्येच्या मुळाशी मुख्यतः जमीन तुकडीकरणाची प्रक्रियाच जबाबदार ठरली आहे. शेतकऱ्यांना हवामान बदल आणि सुपीक जमिनीचा कमी होणारा कस यामुळे नेहमीच आव्हानांचा सामोरे जावे लागते. नवीन उत्पादन तंत्र, आधुनिक अवजारे, बी-बियाणे, कीटकनाशके व जलसिंचन यासारख्या बाबींचा योग्य वापर करण्याइतपत जमीन नसलेल्या शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. उत्पादनवाढीच्या मर्यादेमुळे शेती आर्थिकदृष्ट्या संकटात सापडते, त्याचे दूरगामी परिणाम दिसून आले आहेत. नैसर्गिक आणि इतर कारणांमुळे कर्जबाजारीपणा वाढला आहे. अनेक अल्पभूधारक शेतकरी भूमिहीन झाले आहेत. एकूणच पिकाचे घटते क्षेत्र हे आपल्या शेतीप्रधान देशासाठी फारसे आश्वासक नसल्याने त्याकडे शासनकर्त्यांनी राजकारणाच्या पलीकडे जाऊन गांभीर्याने पाहिले पाहिजे.

# महाराष्ट्रात 25 लाख ‘लखपती दिदी’ बनविण्याचे उद्दिष्ट पूर्णत्वास नेणार

जळगाव येथे रविवार दिनांक १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता राज्यातील 'लखपती दीदी सम्मेलन' तसेच समुदाय संसाधन व्यक्तींचा सन्मान सोहळा होणार आहे.या दिवशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातील स्वयंसहाय्यता गटांना २५०० कोटी रूपयांचा फिरता निधी व ५००० कोटींचे बँक अर्थसहाय्य हा कार्यक्रम होणार आहे.ग्रामीण विकास मंत्रालय,भारत सरकार, ग्रामविकास व पंचायतराज विभाग महाराष्ट्र शासन उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियानाअंतर्गत हा कार्यक्रम होणार आहे त्यानिमित्ताने... उमेद- अर्थातच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हे ग्राम विकास व पंचायतराज विभाग अंतर्गत महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर बनवून त्यांना स्वत: ची ओळख निर्माण करून देणारे, तसेच नवे क्षितिज नवा विश्वास निर्माण करून देणारे ग्रामीण महिलांच्या हक्काचे व्यासपीठ होय ! प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार देशभरातील करोडो लखपती दीदी निर्माण करण्याचे उद्धीष्ट साध्य करण्याच्या ध्येयाकडे एक पाऊल म्हणून महाराष्ट्रात २५ लाख लखपती दीदी बनण्याचे कार्य पूर्णत्वास जात आहे.

लखपती दीदींचे वार्षिक उत्पन्न किमान एक लाखापेक्षा जास्त होण्यासाठी त्यांना दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यवसाय संधी निर्माण करून दिल्या जाणार आहेत. अभियानातील महिलांना बॅंकचे व्यवहार शिकविले जातात त्यांना आर्थिक साक्षर केले जाते. कृषीविषयक माहितीसाठी अभियानात कृषिसखी आहेत, बँके विषयक मदतीसाठी बँक सखी, अश्या विविध क्षेत्रात प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्ती अभियानात आहेत. तसेच मोठ्या प्रमाणावर कर्ज उपलब्धीसाठी अनेक राष्ट्रीयीकृत बँकाकडून कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते. उमेद अभियानात २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात एकूण ८ हजार ९७४ कोटी रुपये कर्ज वितरण करण्यात आले असून आज पर्यंतच्या इतिहासातील हे सर्वात मोठे कर्ज म्हणून देखील गणले गेले आहे. ग्रामीण भारतातील गरीबीचे निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात सन २०११ मध्ये केली.

अभियानामध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीम प्रवण कुटुंबांना समृध्द, आत्मसन्मानाने व सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठी त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्वावर आधारित स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करुन त्यांचे अधिकार व हक्क, विविध वित्तीय सेवा, तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणाची



निर्मिती करण्यासाठी उमेद मार्फ़त प्रयत्न करण्यात येत आहेत. उमेद अभियानाच्या या महिला सक्षमीकरणाच्या चळवळीमध्ये आज महाराष्ट्रातील ३४ जिल्हे ३५१ तालुक्यातील जवळपास ६६ लाख कटुंब सहभागी आहेत. अभियानात आतापर्यंत ६ लाख ४० हजार महिला स्वयं सहाय्यता समूह स्थापन झालेले आहेत यातील १ लाख २५ हजारापेक्षा जास्त गट हे मागील दोन वर्षात स्थापन झालेले आहेत. ३१,८१२ ग्रामसंघ, १,८७५ प्रभागसंघ, १० हजार ८३ उत्पादक गट आणि ४१० पेक्षाही जास्त शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन झालेल्या आहेत. या संस्थांच्या दैंनदिन सुलभीकरणासाठी गावस्तरावर प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्तींची फळी निर्माण करण्यात आलेली आहे

**गिरीश महाजन**
**मंत्री, ग्राम विकास व पर्यटन**

उमेद अभियान मार्फत महिलांनी रोजगार कसा करावा ? कोणता करावा, याचे प्रशिक्षण आरसेटी मधून आणि कृषी विज्ञान केंद्र व यासारख्याच विविध तज्ज्ञ संस्थामार्फत प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी ग्रामस्तरापासून राज्यस्तरापर्यंत प्रशिक्षण कार्यशाळा व प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. RSETI चे प्रत्येक जिल्ह्यात असणाऱ्या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे कौशल्य वाढविण्याचे कार्य अविरतपणे सुरु आहे. राज्यात १३ जाख पेक्षा अधिक महिला लखपती दिदी बनल्या आहेत. व्यवसाय वृद्धीसाठी उमेद अभियानामार्फत विविध प्रकारचे प्रदर्शनी स्थानिक पातळीवर भरवून उद्योगांना हक्काची बाजारपेठ तयार करून दिली जाते. तसेच विविध स्तरावर महालक्ष्मी सरस सारखे प्रदर्शन भरवून ग्रामीण महिलांच्या उद्योगांना जागतिक बाजारपेठ निर्माण करून दिली जाते. त्याचप्रमाणे ग्रामीण महिलांची उत्पादने ग्राहकांना आपल्या घरापर्यंत उपलब्ध व्हावीत यासाठी umedmart.com हे ई- कॉमर्स पोर्टल सुद्धा सुरु करण्यात आले आहे. उमेद अभियानाची ग्रामीण महिलांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याची चळवळ आता जोर धरत आहे आणि हे बदल दृश्य स्वरूपात दिसत आहेत.

ज्या ग्रामीण भागातील महिला केवळ घर, चूल, मूल यापुरत्या मर्यादित होत्या अश्या असंख्य महिला आज अनेक मोठ्या व्यासपीठावर बेधडकपणे आपली मते मांडताना दिसत आहेत. तसेच अनेक महिला या स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभा राहून गावाच्या आर्थिक विकासात सुद्धा योगदान देताना दिसत आहेत. डोंगराळ भाग असो कि अतिदुर्गम भाग अश्या प्रत्येक ठिकाणी आज उमेद अभियानाची महिला स्वतःच्या कर्तृत्वाचा ठसा निर्माण करत आहे. उमेद अभियानाच्या महिला आता मसाले, पापड, लोणचे यांच्या सह अनेक खाद्य पदार्थांची निर्मिती करीत आहेत. याशिवाय हस्तकला, कपडे, शोभेच्या वस्तू, शिल्पकलेच्या वस्तू, खेळणी, मातीची भांडी यासारखे अनेक उत्पादने महिला घेत आहेत. राज्यात आज घडीला ग्रामीण महिलांचे शेती आधारित ३८ लाखापेक्षा जास्त उद्योग व्यवसाय सुरु आहेत आणि बिगर कृषी आधारित सुद्धा ७ लाख ५६ हजार व्यवसाय सुरु आहेत. येणाऱ्या काळात आमच्या ग्रामीण भागातील महिलाच संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक असणार आहेत. प्रत्येक गावातील कुटंबाचा सर्वांगीण विकास साधावा त्याचबरोबर दारिद्र्य निर्मुलनासाठी शासन अनेक योजना राबवत आहे. यासाठी ग्रामीण भागाची प्रगती दारिद्र्य निर्मुलानातून झाल्याशिवाय अशक्य असल्याचे लक्षात आल्यामुळेच केंद्रसराकारने देशभर दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण अजिविका मिशन हा ध्वजांकित कार्यक्रम सुरु केलेला आहे.महाराष्ट्रात सुद्धा हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान नावाने राबविला जात आहे. उमेद अभियान नावाने गावागावात या कार्यक्रमाची ओळख आहे. या अभियानाने व्यापक चळवळीचे स्वरूप धारण केलेले आहे.प्रगतीचा आणि स्वावलंबनाचा मार्ग स्विकारून,रोजगार अन स्वयं रोजगाराच्या नव्या वाटा शोधून उत्तुंग भरारी घेण्यासाठी ग्रामीण महिला सुद्धा आता सर्व क्षेत्रात अग्रेसर दिसत आहेत. महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण महिलांच्या आयुष्यात सुख, समाधान आणि नवचैतन्य असण्यामागचे मुख्य कारण उमेद अभियान बनले आहे.

# शुभदा शितोळेंचे निलंबन : मंत्र्यांची 'थाप' होती काय?

बदलापूर येथील शाळकरी मुलींवरील लैंगिक अत्याचारांच्या प्रकरणात स्थानिक महिला वरिष्ठ पोलीस निरीक्षक शुभदा शितोळे यांनी दाखवलेली संवेदनशून्यता अक्षम्य आहे. त्यावरून खरे तर, सरळ बडतर्फ करून त्यांना घरी बसवण्याची गरज होती. पण शितोळे यांना निलंबित करण्यात आल्याचे एका मंत्र्याने जाहीर केल्यानंतरही त्या पोलीस निरीक्षक महिलेची बदलापूरहून मुंबईला बदली झाल्याच्या बातम्या आज प्रसिद्ध झाल्या आहेत. शितोळे यांना खरोखर निलंबित केलेय की, त्यांची फक्त उचलबांगडी केली आहे? गृह खात्याने बदलीला कारवाईच्या, शिक्षेच्या प्रकारात कधीपासून समाविष्ट केले आहे? त्यांना निलंबित केल्याची मंत्र्यांनी केलेली घोषणा ही जनक्षोभावर पाणी फिरण्यासाठी केलेली निव्वळ थाप होती काय?

हे एकूणच प्रकरण म्हणजे उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृह खात्याच्या अनागोंदी आणि निरंकुश कारभारावरचे



भाष्य म्हटले पाहिजे.

स्वतः महिला असूनही बदलापूरच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाने दाखवलेला बेदरकारपणा पाहून जुन्नर तालुक्यात २०१९ मध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या बलात्काराचे एक प्रकरण इथे हटकून आठवले आहे. त्या प्रकरणाचे बदलापूर प्रकरणाशी साम्य म्हणजे तेथील पोलीस उप अधीक्षक महिलेनेही टोकाची संवेदनशून्यता दाखवली होती! तिने पोलीस अधीक्षकांनी आदेश देऊनही तब्बल तीन आठवडे त्या प्रकरणाकडे कानाडोळा केला होता !

**दिवाकर शेजवळ,**
**ज्येष्ठ पत्रकार**

मी स्वतः त्या प्रकरणाचा पाठपुरावा केल्यानंतर तत्कालीन पोलीस महासंचालक सुबोध जयस्वाल यांनी त्या महिला ' डीवायएसपी ' ला त्या प्रकरणाच्या तपासातून तडकाफडकी हटवण्याची कारवाई केली होती!

तुम्ही पोलीस अधीक्षकांना जाऊन भेटलात ना?, त्यांनी दिले का तुम्हाला पोलीस संरक्षण? तुमच्या पीडित मुलीला यापुढे खासगी गाडीतून शाळेत नेऊन सोडा किंवा शाळेजवळ घर विकत घेऊन तिकडे राहायला जा!

आरोपीच्या मित्रांची नावे आम्हाला सांगत बसू नका,त्यांना आम्ही गावात बंदी घालायची काय?

असे सवाल पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील त्या पोलीस उप अधीक्षक महिलेने पीडित मुलीच्या पालकांना त्यावेळी केले होते.

स्थानिक पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षकाने तर, महिला पोलीस अधीक्षकांवर कडी केली होती. त्याने तर तत्कालीन पुणे जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतरही घटनास्थळी १८ दिवसांनी भेट दिली होती!

अशी दडपादडपी, पीडितांची गळचेपी केवळ फिल्मी पडद्यावर ' दामिनी ' चीच होते अशातला भाग नाही. किंबहुना जे समाजात घडत असते, त्याचेच प्रतिबिंब सिनेमात पडत असते.

काहीही तक्रार घेवून गेलेल्या सामान्य माणसावर पोलीस आधी डाफरले नाहीत, असे पोलीस ठाण्यात हल्ली क्वचितच अनुभवायला मिळते.

## पत्र मानस

### मॉडेल म्हणून श्री गणेशाचा वापर नको !

नामंकित कंपन्या आपली उत्पादने खपवण्यासाठी साधारणतः प्रसिद्ध चित्रपट अभिनेता-अभिनेत्री किंवा खेळाडू यांना घेऊन आपल्या उत्पादनांची जाहिरात बनवतात आणि तिचे टीव्ही, वृत्तपत्रे किंवा अन्य प्रसारमाध्यमांतून प्रसारण करतात, त्यासाठी त्यांना लक्षावधी रुपये खर्चही करावे करतात. गणेशोत्सव जवळ आला की मात्र काहीजण थेट श्री गणेशालाच मॉडेल बनवून आपल्या उत्पादनांची जाहिरात करत असल्याचे गेल्या काही वर्षांमध्ये लक्षात आले आहे. गणेशोत्सवादरम्यान टीव्ही, वृत्तपत्रे, रस्त्यांवरील होर्डिंग्स यांवर झळकणाऱ्या उत्पादनांच्या आणि आस्थापनांच्या जाहिरातींमध्ये श्री गणेशाच्या चित्रांचा सर्रासपणे वापर केला जातो. या दिवसांमध्ये वातावरण गणेशमय असल्याने तसे होणे स्वाभाविक आहे; मात्र काही आस्थापने आपली उत्पादने खपवण्यासाठी श्री गणेशाच्या चित्रांचा आणि ॲनिमेटेड चलचित्रांचा एखाद्या मॉडेलप्रमाणे वापर करताना दिसतात. श्री गणेशाच्या हातामध्ये सदर उत्पादने देऊन किंवा श्री गणेश त्या उत्पादनाच्या चित्राकडे बोट दर्शवून ते घेण्यास प्रवृत्त करत असल्याचे दाखवले जाते. काही जाहिरातींमध्ये तर श्री गणेशाच्या तोंडी ते उत्पादन घेण्याविषयीचे संवाद टाकले जातात. श्री गणेश हे समस्त भक्तांचे श्रद्धास्थान आहे, कोणा आस्थापनांचे उत्पादन खपवणारे मॉडेल नव्हे, आपल्या लाभासाठी श्री गणेशाचा अशा प्रकारे वापर करणे ही एकप्रकारे गणरायाची अवहेलनाच आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या जाहिराती कुठे आढळल्यास गणेश भक्तांनी या आस्थापनांना जाब विचारायला हवा.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

### सण, उत्सवांचे - विकृत स्वरूप

सण आणि उत्सव' हे कुठल्याही समाजाचे प्रतिबिंब असतात. ते साजरे करण्यामागील मूळ धर्मशास्त्र समाजाला न शिकवल्याने त्यामध्ये आज अनेक अपप्रकार वाढले आहेत. त्यामुळे ते साजरे करताना सहस्त्र तरुणांचा वेळ वाया जाण्याबरोबरच वारेमाप पैसाही खर्च होत आहे. सणांचे मूळ स्वरूप पालटून त्यांचे अयोग्य असे व्यवसायीकरण आणि राजकीयकरण झाले आहे. परंपरा आणि संस्कृती यांच्या नावाखाली अत्यंत हिडीस आणि विकृत प्रथा रुजू होऊ लागली आहे. उदाहरणार्थ, जास्तीत जास्त उंचावर दहीहंडी बांधून सर्वांचे जीवन धोक्यात घालून, त्यासाठी भरपूर पैशांचे अमिष दाखवून ती फोडण्यास प्रवृत्त करणे. तसेच सार्वजनिक गणेशोत्सवात सेवेच्या नावाखाली रात्री दारू पिऊन धिंगाणा घालणे, जुगार खेळणे. गणपती विसर्जन करताना सात्विक कृती न करता डीजेच्या तालावर हिडीस हावभाव करत नृत्य करणे. स्त्रियांची छेडछाड करणे. भाव-भक्ती वाढेल असे सांस्कृतिक कार्यक्रम न ठेवता सिनेमा,वाद्यवृंद अशा असात्त्विक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ही "विकृती" अशीच चालू राहिली, तर कालांतराने त्यावरच 'प्रथा आणि परंपरां'चे शिक्कामोर्तब होईल. देवतांची योग्य प्रकारे आराधना करणे, त्यासाठी समाजाला भक्तिमार्गाकडे वळवणे आणि समाजाचे संघटन करण्यासाठी "धर्मशिक्षण" देणे अतिशय आवश्यक आहे. तसेच अयोग्य प्रथा आणि परंपरांमुळे होणारी 'धर्महानी' लक्षात आणून देऊन अनेक उपक्रमांद्वारे समाजाचे विविध स्तरावर प्रबोधन करणे आवश्यक आहे. लोकमान्य टिळकांनी प्रबुद्ध (विद्वान) आणि प्रगल्भ समाज निर्माण करण्यासाठी 'गणेशोत्सव आणि शिवजयंती' या उत्सवांचे सार्वत्रिकरण केले. "प्रगल्भ" नेतृत्वाच्या अभावी रस्ते अडवून आणि पूर्वजांनी घालून दिलेले सर्व नियम धाब्यावर बसवून साजरे होणारे आजचे 'सण, उत्सव, समारंभ आपल्या संस्कृतीचा ऱ्हासच दाखवत नाहीत काय ?

**- स्मिता धुरी, मीरा रोड**

### खड्डेमुक्त रस्त्यासाठी आदेश हवा

भारतातील रस्ते बाबतीतील परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. महाराष्ट्रातील परिस्थिती ही काही वेगळी नाही. एकीकडे भारत विकसित राष्ट्र म्हणून प्रगती करीत असताना दुसरीकडे माञ जमीन रस्ता वाहतूक व्यवस्थेचा दर्जा घसरला जात आहे. देशाची आर्थिक राजधानीत म्हणजे मुंबईत रस्त्याला जागोजागी लहान मोठे खड्डे पडलेले आहेत. विशेष म्हणजे याच रस्त्यावरून मंत्री जातात आणि न्यायाधीश देखील तरी रस्त्याच्या कामात कुठेही सुधारणा झाल्याचे दिसत नाही. आता तर मागील दोन वर्षे झाली मुंबई महापालिकेला नगरसेवक मिळालेले नाही म्हणजे लोकांना जाब विचारण्याची सोय देखील राहिली नाही. आता पावसाळा संपत आला आहे म्हणजे विविध सण व उत्सवाचे आगमन होईल. यामध्ये प्रमुख सार्वजनिक व महत्त्वाचा राष्ट्रीय सण म्हणजेच श्री गणरायाचे आगमन लवकरच होणार आहे. मुंबईच्या रस्त्यावर अनेकदा अपघात होत असतात आणि त्यासाठी वाहन चालकालाच जवाबदार ठरविले जाते. पण रस्त्यावरील असंख्य खड्ड्यामुळेच अपघात होतात हे वास्तव माञ मान्य करायला पालिका प्रशासन कदापि तयार नाही. मुंबईकरांचा रस्त्यावरून प्रवास लवकरच सुखकर आणि सुरक्षित होणार आहे कारण श्री गणरायाचे आगमनाची तयारी साठी पालिका आयुक्ताने सूचना आणि आदेश दिले आहेत. त्यामुळे काही दिवस का होईना मुंबईच्या रस्त्याची दुरुस्ती होणार आहे. कारण खड्डेमुक्त रस्त्यासाठी आयुक्ताचा जो आदेश हवा होता तो आता आलेला आहे असे वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### न मागता झेड प्लस कशाला?

राष्ट्रवादी कॉंग्रेस (तुतारी) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार याना केंद्राने झेड प्लस सुरक्षा दिल्यानतर आमदार नितेश राणे आणि त्याचे बंधू निलेश राणे यानी जहरी टीका केली.वास्तविक शरद पवारानी झेड प्लस सुरक्षा मागितली नसतानाही केंद्राने ती दिली यामागे काहीतरी कारण असेल पण ज्याअर्थी शरद पवारानी झेड प्लस सुरक्षेवर केलेली टिप्पणी हेच सांगते की न मागता केंद्राने ही सुरक्षा दिलेली आहे.सुरक्षा व्यवस्थेवर टीका करताना राणे बंधूनी याची खातरजमा केली असती तर योग्य झाले असते.या सरकारची मात्र कमाल आहे ज्याना झेड प्लसची आवश्यकता आहे त्याना ती सुरक्षा देत नाही तर काहीना दिलेली काढुन घेण्यात येते.काय म्हणावे या सरकारला

**- अरुण पां.खटावकर, लालबाग**

## आदिवासी भवन व क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांचे स्मारक बांधण्याची मागणी

**पनवेल :** नवीन पनवेल तालुक्यात आदिवासी भवन व क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांचे स्मारक बांधण्याची मागणी आदिवासी ठाकुर समाज संघटना -पनवेल यांच्यावतीने करण्यात आली आहे. पनवेलमध्ये आदिवासी भवन व्हावे यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शासकीय दरबारी व राजकीय दरबारी पत्र व्यवहाराला सुरुवात करण्यात आली. 9 ऑगस्टच्या आदिवासी दिनाच्या दिवशी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे आदिवासी भवनची मागणी आदिवासी ठाकूर समाज संघटनेचे अध्यक्ष धर्मा बाळू वाघ यांनी केली होती. त्याचा पाठपुरावा मागणी पत्र देण्यासाठी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे करण्यात आली. आमदार प्रशांत ठाकूर यांना मागणी पत्राद्वारे निवेदन देण्यात आले. व आदिवासी भवनाची मागणी करण्यात आली.



### म ह त्वा चे

## पाळीव श्वान मालकाची वडील-मुलाला धमकी

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेत पंडित दिनदयाळ रस्त्यावरील सम्राट चौकात एका पाळीव श्वानाच्या मालकाने बाजारात खरेदीसाठी आलेल्या एका वडील आणि त्याच्या चार वर्षांच्या मुलाला जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. तसेच, रागाच्या भरात सम्राट चौकातील भटक्या कुत्र्यांना हातामधील काठीने निर्दयपणे मारहाण केली आहे. मंगळवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला आहे.रामदास घोलप असे पाळीव श्वान मालकाचे नाव आहे. मनोज मधुकर सत्वे (३६) असे तक्रारदाराचे नाव आहे. ते डोंबिवली पश्चिमेतील आनंदनगरमधील रेतीबंदर रस्त्यावरील एका सोसायटीत कुटुंबीयांसह राहतात. विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रारदार सत्वे यांनी रामदास घोलप यांच्या विरुद्ध तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार मनोज सत्वे हे आपल्या चार वर्षांच्या मुलासह मंगळवारी सकाळी पंडित दिनदयाळ रस्त्यावरील सम्राट चौक भागात बाजारात फळे खरेदीसाठी आले होते. एका विक्रेत्याकडून मनोज सत्वे फळे खरेदी करत होते. त्यावेळी आरोपी रामदास घोलप हे त्या भागात आपला पाळीव श्वान फिरण्यासाठी घेऊन आले होते. त्यांच्या हातात श्वानाला धाक दाखविण्यासाठी काठी होती.

## आश्रमातील अडीच वर्षीय मुलीला चटके

**भिवंडी :** भिवंडी येथील अनाथ आश्रमात एका अडीच वर्षांच्या मुलीला चटके देण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात अनाथ आश्रमाचा संचालक दत्ता गायसमुद्रे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. पिडीत मुलीचे आई-वडिल भिक्षेकरू आहे. तीन महिन्यांपूर्वी मुलीच्या आजीने तिला धामणकर नाका येथील शोभा अनाथ आश्रम आणले होते. तेव्हापासून ती मुलगी या आश्रमात वास्तव्यास होती. काही दिवसांपूर्वी तिच्या शरीरावर काही जखमा आढळून आल्या होत्या.

## लाच प्रकरणी खाजगी इसमाला घेतले ताब्यात

**पनवेल :** रेशनिंग कार्डवरील उत्पनाची नोंद कमी करण्यासाठी साडेचार हजारांच्या लाचेची मागणी करून रक्कम स्वीकारल्या प्रकरणी नवी मुंबई लाच लुचपत विभागाने खाजगी इसम आनंद गुरव याला ताब्यात घेतले. त्याच्यावर 22 ऑगस्ट रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुरव हा भाजपचा शक्ती केंद्रप्रमुख असल्याचे बोलले जात आहे. यातील तक्रारदार यांच्या वडिलांच्या नावे असलेले रेशनिंग कार्डवर यापूर्वी असलेल्या 80 हजार रुपये उत्पन्नाची नोंद कमी करून त्याऐवजी चाळीस हजार रुपये उत्पन्नाची नोंद करण्याबाबत तहसील कार्यालय पनवेल येथील खाजगी इसम आनंद गुरव याने साहेबांसाठी साडेचार हजार रुपये इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केली. त्या प्रकरणी 21 ऑगस्ट रोजी नवी मुंबई लाच लुचपत विभागाकडे तक्रार देण्यात आली. त्यानुसार 22 ऑगस्ट रोजी लाचेच्या मागणीची सत्यता पडताळणी दरम्यान साडेचार हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारणार असल्याचे निष्पन्न झाले. सापळा कारवाई दरम्यान आनंद शामराव गुरव याने तहसील कार्यालय पनवेल कार्यालयाच्या समोरील रस्त्यावर तक्रारदार यांच्याकडून साडेचार हजार रुपये रक्कम स्वीकारली.

# बदलापूर प्रकरण दाबण्यासाठी महिला पोलिस अधिकाऱ्यांनी घेतल्या गुप्त बैठका

### पीडित मुलीच्या पालकांचा गंभीर आरोप

प्रतिनिधी
■ बदलापूर

बदलापूर येथील प्रकरण बाहेर येऊ नये यासाठी एका महिला पोलिसांनी शाळा व्यवस्थापना सोबत गुप्त बैठक केल्याचा आरोप पीडित कुटुंबीयांनी केला आहे. बदलापूरचे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याचे पीडित मुलीच्या पालकांनी म्हटले आहे. आता ही महिला अधिकारी कोण? हे मात्र अद्याप समजू शकले नाही. मात्र पीडित कुटुंबियांच्या या आरोपामुळे या प्रकरणातील साशंकता आणखी वाढली आहे.

बदलापूर मध्ये एका शाळेत अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आला होता. त्यानंतर बदलापूर मध्ये मोठ्या प्रमाणात जनतेचा उद्रेक दिसून आला. बदलापूर मध्ये रेल रोको देखील करण्यात आला. तब्बल नऊ तास चाललेल्या या आंदोलनामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आता या प्रकरणात पोलिस प्रशासन आणि शाळा प्रशासनावर देखील अनेक गंभीर आरोप होत आहेत. पीडित मुलीच्या कुटुंबीयांनी देखील पोलिस आणि शाळा व्यवस्थापनापणावर गुप्त बैठक केल्याचा आरोप केला आहे.

बदलापूर येथील नामांकित शाळेत जाणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आला होता. शाळेतील सफाई कर्मचारी अक्षय शिंदे यांने हे घृणास्पत कृत्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. 13 ऑगस्ट रोजी घडलेल्या या घटनेनंतरही शाळा व्यवस्थापन तसेच पोलिस प्रशासनाने दखल न घेतल्याने नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. 20 ऑगस्ट रोजी बदलापूर येथील नागरिकांचा यामुळे उद्रेक झाला. तब्बल नऊ तास रेल्वेरोको आंदोलन करत बदलापूर येथील नागरिकांनी या घटनेचा निषेध केला होता.

कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार एका मुलीच्या पालकांनी मुलीला रुग्णालयात नेले असता तिच्या प्रायव्हेट पार्टला दुखापत झाली असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी रुग्णालयातील अहवाल घेऊन शाळेकडे या संबंधित तक्रार केली. मात्र सायकल मुळे जखम झाली असावी किंवा शाळेबाहेर काही घडले असावे, असा दावा करत शाळा प्रशासनाने अहवाल फेटाळून लावला होता. पोलिसांनी देखील या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली होती. अखेर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप केल्यानंतर या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला, अशी माहिती पीडित कुटुंबीयांनी दिली आहे.

### *बदलापूरचे नाव 'बलात्कार'पूर करायचं ठरवलयं का?*



*सुसंस्कृत बदलापूरचे नाव आता सत्ताधारी आणि पोलिसांनी "बलात्कारपूर" करायला घेतले आहे की काय, असा संशय निर्माण होऊ लागला आहे, असे म्हणत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला आहे. बदलापुरातील दोन अत्याचारांच्या घटनांवर ते बोलत होते. दरम्यान आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले की, नेपाळहून बदलापुरात आलेल्या एक् नेपाळी कुटुंबातील अकरा वर्षाच्या चिमुरडीवर इमारतीचे काम करणाऱ्या ठेकेदाराने आईबापाला ठार मारण्याची धमकी देत अत्याचार केला. तिचा गर्भपात केला, त्या कुटुंबाला धमकी देत त्यांचे घर पाडले यामुळे आपल्या राज्याची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावरही बदनाम झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे, असे म्हणत त्यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. सुसंस्कृत बदलापूरचे नाव आता सत्ताधारी आणि पोलिसांनी "बलात्कारपूर" करायला घेतले आहे की काय, असा संशय निर्माण होऊ लागला आहे. बदलापुरात शाळेत दोन चिमुरड्यांवर लैंगिक अत्याचार झाल्याचे उघडकीस आलेले असतानाच आपल्या राज्याची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावरही बदनाम झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.*

# अनैतिक संबंधातून पत्नीच्या प्रियकराकडून पतीची हत्या

### मृतदेह सुटकेसमध्ये भरून फेकला खाडीत




प्रतिनिधी
■ ठाणे

नारपोली पोलिसांनी शिताफीनं तपास करून हत्येचा उलगडा केला. आरोपी प्रियकराला उत्तरप्रदेशमधील लखनौमध्ये सापळा रचून बेड्या ठोकल्या आहेत. तर हत्येच्या कटात सामील पत्नीलाही लखनौमधून ताब्यात घेतलं आहे. अनुभव रामप्रकाश पांडे ( वय २३) असे अटक केलेल्या पत्नीच्या प्रियकराचं नाव आहे. तर बलराम उर्फ शेखर लक्ष्मण मिश्रा (२७) असे हत्या झालेल्या पतीचं नाव आहे.

अन् अनैतिक संबध प्रस्थापित झाले- पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बलराम उर्फ शेखर आणि त्याची २५ वर्षीय पत्नी मूळची उत्तर प्रदेशातील सुलतानपूर येथील कुहिडदिया गावाचे मूळचे रहिवाशी आहेत. लग्नानंतर दोघेही भिवंडी तालुक्यातील कशेळी रेतीबंदर रोडवरील दुर्गेश पार्क जवळील ओम साई अपार्टमेंटच्या तिसऱ्या मजल्यावरील ३०६ नंबरच्या सदनिकेत राहत होते. त्यातच आरोपी अनुभव पांडे हादेखील याच ओम साई अपार्टमेंटच्या एका सदनिकेत भाडेकरू म्हणून राहत होता. तसेच बलराम उर्फ शेखर आणि आरोपी दोघेही उत्तरप्रदेशमधील रहिवाशी असल्याने ओळख होऊन मैत्री झाली होती. त्यामुळं दोघांचे घरी येणे-जाणे होत होते. मृताची पत्नी आणि आरोपीमध्ये प्रेमाचं सूत जुळून अनैतिक संबध प्रस्थापित झाले. नातेवाईकानं दिली होती बेपत्ता झाल्याची तक्रार-पती हा अनैतिक संबधात अडथळा ठरत असल्यानं आरोपीनं मृताच्या पत्नीशी संगनमत करून पती बलराम उर्फ शेखरच्या हत्येचा कट रचला होता. ठरल्याप्रमाणे ७ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास बलरामची त्याच्या राहत्या घरातच धारदार शस्त्राने हत्या केली. त्याचा मृतदेह सुटकेसमध्ये भरून कशेळी भागात असलेल्या खाडी पात्रात फेकून दिला. दुसऱ्या दिवशी बलराम दिसत नसल्याचे पाहून त्याच्या एका नातेवाईकानं नारपोली पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती. या तक्रारीचे आणि नातेवाईकाने दिलेल्या माहितीचे गांभीर्य ओळखून पोलीस पथकानं तपास सुरू केला.

सीसीटीव्ही फुटेजमुळ आरोपी पोलिसांच्या जाळ्यात पोलीस तपासात कशेळी भागातील घटनस्थळाच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच आरोपी आणि मृताची पत्नी दिसून येत नसल्यानं पोलिसांनी त्या दिशेनं तपास सुरू केला. पोलिसांना एका सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी अनुभव आणि मृताची पत्नी दोघे जाताना दिसले.

# नेरुळमधून दोघे बेपत्ता, इस्टेट एजंटचा मृतदेह सापडला

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबईच्या नेरूळ येथून बेपत्ता झालेल्या झालेल्या दोघांपैकी एकाचा मृतदेह सापडल्यामुळे खळबळ उडाली आहे. इस्टेट एजंटचा पेण-खोपोली मार्गावर मृतदेह आढळून आला. तर दुसरा अजूनही बेपत्ता आहे. दोघेही बेपत्ता झाल्याची पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.

नवी मुंबईतून बेपत्ता असलेला इस्टेट एजंट सुमित जैन याचा मृतदेह पेण-खोपोली मार्गावर सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. गुरुवारी सुमित जैन याची कार मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर सापडली होती.या कारवर फायरिंग झाली होती. त्यामुळे बेपत्ता सुमित जैनचा तपास पोलिसांनी अधिक वेगाने सुरु केला. तर पेण-खोपोली मार्गावर गागोदे गावाच्या हद्दीतील जंगल भागात सुमित जैन यांचा मृतदेह सापडला. सुमित जैन याच्यासोबत अमीर खान नावाची व्यक्ती देखील होती. अमीर खान बेपत्ता असल्याची तक्रार नेरूळ पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. सुमित जैन यांचा मृतदेह सापडला.

# नवी मुंबईतील स्वच्छताकर्मींनी घेतला नाट्यप्रयोगाचा अनुभव

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

'स्वच्छ सर्वेक्षण 2024' अंतर्गत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध नविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असताना या कामात स्वच्छताकर्मींचे महत्वाचे योगदान लक्षात घेऊन त्यांच्या सेवाभावी कामाप्रती आदरभाव व्यक्त करीत विष्णुदास भावे नाटयगृह येथे 'अंधे जहां के अंधे रास्ते' हा विशेष नाटयप्रयोग विष्णुदास भावे नाट्यगृहात खास स्वच्छताकर्मींसाठी आयोजित करण्यात आला होता. स्वच्छताकर्मींच्या जीवनानुभवावर आधारित हे नाटक बघताना उपस्थित स्वच्छताकर्मी भारावून गेले.



अस्तित्व संस्था, ठाणे संचालित उन्मुक्त कलाविष्कार नाटय समुहाच्या वतीने सादर करण्यात आलेले राज्य नाटय स्पर्धेतील हे विजेते नाटक स्वच्छता मित्र व सफाईमित्र यांच्या जीवनपटाचा वेध घेणारे आहे. त्यामुळे या नाटकाचा प्रयोग अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या पुढाकारातून, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छताकर्मींसाठी आयोजित करण्यात आला होता. 25 कलावंतांच्या संचात सादर झालेल्या या दमदार नाटयाविष्काराने स्वच्छताकर्मींच्या जगण्यावर प्रकाशझोत टाकला.

# पालिकेतर्फे मलनि:सारण केंद्रावरील सफाई कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळा

प्रतिनिधी
■ भाईंदर



शहर कोणतेही असो त्यात असलेल्या नागरीवस्तीमुळे केर कचरा/ मल कचरा होत असतो आणि तो कचरा साफ करण्यासाठी सरसावून पुढे होतात ते सफाई कर्मचारी. म्हणूनच सफाई कर्मचारी हे समाजाचे अविभाज्य घटक असून त्यांच्या सफाई कार्यातून समाजाचे आरोग्य उत्तम राहण्यास विशेष मदत होते. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांच्या निर्देशानुसार सफाई कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. याच अंतर्गत केंद्रीय समाज कल्याण आणि न्याय मंत्रालय तसेच राष्ट्रीय सफाई कर्मचारी आर्थिक विकास महामंडळ (NSKFDC) यांनी कॅम फाऊंडेशनच्या माध्यमातून मलनि:सारण केंद्रावरील (एसटीपी) कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली होती. सफाई कर्मचाऱ्यांनी कामाच्या ठिकाणी काम करत असताना घ्यावयाची काळजी, सुरक्षा, आजार, लक्षणे व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता शरद नानेगावकर तसेच उपअभियंता अरविंद पाटील यांच्या उपस्थितीत मलनि:सारण केंद्रकारील (एसटीपी) कर्मचारी तसेच सफाई कर्मचाऱ्यांनी लावलेली उपस्थिती हि खरच लक्षणीय होती.

मिरा भाईंदर महानगर पालिकेने आयोजित केलेल्या या कार्यशाळेमुळे सफाई कर्मचाऱ्यांच्या ज्ञानात भर पडून उद्याच्या होणाऱ्या प्रत्येक सफाई कार्यात हेच सफाई कर्मचारी निरोगी आणि सक्षमपणे करण्यास पुन्हा एकदा सज्ज होतील आणि सफाई करण्यासोबत स्वत:च्या आरोग्याचे आणि रोजच्या जीवनशैलीचे योग्य ती काळजी घेऊन आपले निरोगी आयुष्य सुखमय करतील यात तिळमात्र शंका नाही.

# दक्षता पथक मार्फत अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर आणि वाहनांवर कारवाई

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नेरुळ विभागाअंतर्गत नेरुळ स्टेशन व सेक्टर-20 येथील गुडविल कॉर्नर येथे पदपथावर अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्या तसेच बेवारसपणे वाहन पार्किंग करणारे तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या पंधरा हातगाडी, तीन टेम्पो व एक रिक्षा इत्यादींवर



मोहिमेअंतर्गत अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांवर दि.22/08/2024 रोजी नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यालयातील केंद्रीय अतिक्रमण् दक्षता पथक मार्फत पदपथावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांवर हटविण्याची व सामान जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. जप्त केलेले सामान दि.22/08/2024 रोजी कोपरखैरणे क्षेपणभुमी येथे जमा करण्यात आलेले आहे. सदर कारवाईसाठी अतिक्रमण विभागातील अधिकारी व कर्मचारी, तेरा मजूर, तीन टोईंग, तीन पिकअप, एक आयशेर, अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक उपस्थित होते. यापूढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# ठाण्यात होणार 'वारी समतेची, वारी मानवतेची'

### कोर्टनाका सर्कलजवळ होणार अश्वरिंगण सोहळा

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाणे ओबीसी एकीकरण समिती आणि मराठा सेवा संघाच्या वतीने यंदाही वारी समतेची आणि वारी मानवतेच्या माध्यमातून यंदाही ठाणेकरांना समतेची वारी अनुभवता येणार आहे. येत्या रविवारी ठाण्यातील कोर्टनाका परिसरात होणाऱ्या या वारीत अश्वरिंगण सोहळा वारकऱ्यांचे आकर्षण ठरणार आहे. या वारीचे आयोजक ठाणे ओबीसी एकीकरण समितीचे अध्यक्ष प्रफुल्ल वाघोळे म्हणाले काही कारणास्तव नागरिकांना आषाढी वारीत सहभागी होता येत नाही. त्यामुळे त्यांना वारी अनुभवता यावी म्हणून छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर आणि संत तुकाराम महाराजांच्या शिकवणीवर या वारीचे आयोजन करण्यात आले. या वारीच्या माध्यमातून समतामुलक् विचारांचा जागर घालण्यात येणार आहे. या वारीची सुरुवात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास अभिवादन करून होणार आहे. या वारीच्या निमित्ताने संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज हभप भानुदास मोरे देहूकर यांचे किर्तन होणार आहे.

# बेलापूरमध्ये मंगळवेढा मुंबई मित्रमंडळाची कार्यकारिणी बैठक संपन्न



प्रतिनिधी
■ नवी मुंबई

सीबीडी बेलापूर (नवी मुंबई) येथील हॉटेल सी प्राईड येथे मंगळवेढा मुंबई मित्रमंडळाच्या कार्यकारिणीची बैठक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात यशस्वीरित्या पार पडली.

या बैठकीसाठी मंडळाचे सल्लागार व पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधानदादा आवताडे उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष दत्ता घाडगे यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले. संस्थापक अध्यक्ष डॉ. सर्जेराव सावंत यांनी मंडळाच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीचे यजमान व हॉटेल सी प्राईडचे मालक सदानंद हजारे यांनीही आपले विचार मांडले. उद्योगपती व सोलापूर जिल्हा मित्रमंडळाचे अध्यक्ष राजेंद्र हजारे यांनी मंडळाविषयी माहिती सांगितली.

मंगळवेढ्याचे उद्योगपती व पुणे मित्रमंडळाचे संस्थापक अध्यक्ष आझाद दारूवाले यांनी आपले विचार व्यक्त केले. अन्य सदस्यांनीही आपले विचार मांडले व विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्याध्यक्ष आनंद पाटील यांनी केले. आभार सचिव महादेव बनसोडे यांनी मानले. शेवटी सहभोजनाने बैठकीची सांगता झाली.

# पालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या 14 गावांना मिळणार 'आपला दवाखाना'

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील १४ गावे नवी मुंबई महापालिकेत पुन्हा समाविष्ट करण्यात आली असून आता गावांना मूलभूत आणि प्राथमिक सुविधा महापालिकेतर्फे देण्यात येणार आहेत. विकास समितीचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील आणि समितीचे सर्व पदाधिकारी यांनी आयुक्तांची भेट घेऊन गावे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केल्यानंतर १४ गावांत प्राथमिक आणि मूलभूत सुविधा सुरू करण्याची मागणी केली होती. ग्रामस्थांची ही मागणी लवकरच पूर्ण करण्याचे आश्वासन दिले असून अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले आहेत.



गावात मूलभूत सुविधांचा वानवा आहे. आरोग्य, पाणी, रस्ते, शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे १४ गावांचा नवी मुंबई महापालिकेत पुन्हा समावेश व्हावा यासाठी ग्रामस्थ आणि १४ संघर्ष समिती मागील अनेक वर्षे मागणी करत होते, अखेर ही गावे महापालिकेत समाविष्ट झाली असून याठिकाणी आता मूलभूत, पायाभूत सुविधा देणे गरजेचे आहे. नवी मुंबई महापालिकेत १४ गावे समाविष्ट असताना गावांचा मूलभूत विकास झाला होता. मात्र नवी मुंबई महापालिकेतून वगळताच गावे मूलभूत, पायाभूत सुविधांपासून वंचित राहिली. त्या गावात आरोग्य सुविधा नाही, पायाभूत सुविधा, रस्ते, शाळा, पाण्याची समस्या आहे. त्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिकेने या ठिकाणी नवीन परिमंडळ देखील स्थापन केले आहे. १४ गावांत आपला दवाखाना, पाच आरोग्य केंद्रे, स्वछता, फवारणी, शाळेतील विध्यार्थ्यांना गणवेश पुरवठा, बस सेवा या तात्काळ सुरू कराव्यात अशी मागणी करण्यात आली. यावर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी अधिकाऱ्यांना तात्काळ काम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली आहे.

महापालिकेतून बाहेर पडताच नागाव येथील प्रथम नागरी आरोग्य केंद्र अडगळीत पडले असून आजमितीला या आरोग्य केंद्राचे पडीक इमारतीत रुपांतर झाले आहे.

# 'महाराष्ट्र बंद'ला 'धर्मराज्य'चा पाठींबा

प्रतिनिधी
■ ठाणे

"भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी पक्ष" अशी सर्वमान्य ओळख असलेल्या 'धर्मराज्य पक्षा'ने महाराष्ट्र विकास आघाडीने घोषित केलेल्या, आज दि. २४ ऑगस्ट-२०२४ रोजीच्या 'महाराष्ट्र बंद'ला आपला जाहीर पाठींबा दिला असून, लोकशाही आणि सनदशीरमार्गाने पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी बंदमध्ये सहभागी होतील अशी माहिती 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, आपल्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

दरम्यान, बदलापूरमधील 'आदर्श विद्यामंदिर' या शाळेतील दोन चिमुरड्या बालिकांवरील लैंगिक अत्याचाराची घटना उघडकीस आल्यानंतर, बदलापूरकर नागरिकांनी उत्स्फुर्तपणे रस्त्यावर उतरुन, तीव्र आंदोलन पुकारले होते. या घटनेचे पडसाद फक्त बदलापूरमध्येच नव्हे; तर, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात उमटल्यानंतर, सत्ताधाऱ्यांविरोधात जनक्षोभ उसळला आहे. शिवाय, ही घृणास्पद घटना घडल्यानंतर शाळा प्रशासनाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न पोलिसांकडून झालाच, त्याचबरोबर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यासाठी गेलेल्या पीडित बालिकेच्या पालकांना तब्बल १२ तास पोलीस ठाण्यात ताटकळत ठेवण्याचा अमानवी प्रकार, वरिष्ठ पोलीस निरीक्षिका शुभदा पाटोळे यांनी, राजकीय दबावापोटी केल्याने, नागरिकांच्या भावनांचा उद्रेक झाला. अखेर, निलंबनाच्या नावाखाली या भ्रष्ट महिला अधिकारीची आधी ठाणे नियंत्रण कक्ष आणि त्यानंतर मुंबईत बदली केल्याचे पुढे आल्याने, राज्य सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत असल्याचे स्पष्ट झाले आहे. याच पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, याप्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारुन राजीनामा द्यावा अशीही मागणी आता सर्वत्र जोर धरु लागलेली आहे.

## हवामान खात्याच्या येलो अलर्टमुळे गुजरातच्या 100 नौका देवगड बंदरात

**देवगड :** हवामान खात्याने राज्यातील काही भागांमध्ये येलो अलर्ट जारी केला असून कमी दाबाचे क्षेत्र अरबी समुद्रामध्ये निर्माण झाले आहे. वादळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने गुजरात येथील सुमारे १०० मच्छीमारी नौका सुरक्षेच्या दृष्टीने देवगड बंदरात आश्रयासाठी दाखल झाल्या आहेत. प्रादेशिक हवामान विभागाच्या संदेशा नुसार दि. २३ ते २७ऑगस्ट या कालावधीत समुद्रात वादळ सदृश्य परिस्थिती असल्यामुळे ताशी सुमारे ४० ते ४५ किलोमीटर वेगाने वारे वाहणार असून या वाऱ्यांचा वेग ताशी ६५ किलोमीटर होण्याची शक्यता असल्यामुळे मच्छीमारी नौका, यांत्रिक नौका छोटे मच्छीमार यांनी समुद्रात जावू नये तसेच सुरक्षित ठिकाणी आपल्या नौका नांगरून ठेवाव्यात. असे आवाहनही मत्स्यव्यवसाय खात्याच्या वतीने करण्यात आले आहे.



## म ह त्त्वा चे

### बिबट्याच्या हल्ल्यात 16 वर्षीय युवकाचा मृत्यू

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील दिंडोरीच्या वनारेवाडी परिसरात रात्री युवकावर बिबट्याचा हल्ला झालाय. या हल्ल्यात विठ्ठल पोद्दार या १६ वर्षीय युवकाचा मृत्यू झालाय. बिबट्याच्या हल्ल्यानंतर परिसरात भीतीचं वातावरण आहे.बिबट्याच्या हल्ल्यानंतर वनविभागाचे अधिकारी कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. बिबट्याचा शोध सुरू आहे. बिबट्याच्या हल्ल्यात तरूणाचा मृत्यू नाशिकमध्ये बिबट्याचा पुन्हा मुक्त संचार असल्याचं काल २२ ऑगस्ट रोजी समोर आलंय. नाशिक शहरातील रविशंकर मार्गावर असलेल्या कुर्डूकर नगर परिसरात बिबट्याचा वावर असल्याचं समोर आलंय. अशोका रॉयल बिल्डिंगच्या मागे असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ बिबट्या मुक्त संचार करताना आढळून आलाय. बिबट्याचा मुक्त संचाराचा व्हिडिओ सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालाय. बिबट्याला वनविभागाने तात्काळ पिंजरा लावून जेरबंद करावा, अशी मागणी नागरिक करत आहेत. बिबट्याचा मुक्त वावर असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. नाशिक शहरामध्ये मागील अनेक दिवसांपासून बिबट्याची दहशत कायम असल्याचं पाहायला मिळतंय.

### गाढवाची तस्करी करणारी टोळी ताब्यात

**बीड :** गाढवांची तस्करी करणारी आंध्र प्रदेशमधील टोळी माजलगाव पोलिसांनी गजाआड केली आहे. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या या टोळीकडून १४ गाढवांची सुटका करण्यात आली असून आता ताब्यात घेतलेल्या सहा आरोपींकडे चौकशी सुरू आहे. गाढवांची चोरी करून त्याची तस्करी केली जात असल्याची माहिती माजलगाव पोलिसांना रात्री मिळाली होती. त्यानुसार माजलगाव शहरातील धारूर रोडवर संशयित टेम्पोला पोलिसांनी थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र तो टेम्पो चालक सुसाट वेगात निघून गेला. यानंतर या टेम्पोचा पाठलाग करत माजलगाव पोलीस सेलू तालुक्यातील चाट बोरगाव इथपर्यंत गेले आणि त्या ठिकाणी हा टेम्पो पकडण्यात पोलिसांना यश आले. सदर टेम्पोची तपासणी केली असता यात १४ गाढव आढळून आले. या सर्व गाढवांची सुटका करण्यात आली असून ६ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### देवदर्शनाला गेलेल्या तिघांना कंटेनरने चिरडलं

**पुणे :** देवदर्शनासाठी निघालेल्या मित्रांवर काळाने घाला घातला आहे. कंटेनरने तिघांना चिरडत कारला जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. दौंड तालुक्यातील पुणे-सोलापूर महामार्गावर हा भीषण अपघात झाला आहे. दुरुस्तीसाठी थांबलेल्या स्विफ्ट कारला कंटेनरने पाठीमागून जोरदार धडक दिली. हा अपघात सीसीटीव्हीमध्ये कैद झाला असून थरकाप उडवणारा व्हिडिओ समोर आला आहे. दौंड तालुक्यातील पुणे-सोलापूर महामार्गावर हा भीषण अपघात झाला. दौंड तालुक्यातील वाखरी या गावात ही घटना घडली.

## आदित्य ठाकरेंवर 'एनसीपीसीआर'च्या तीन केसेस!

# लहान मुलांना छळल्याचा आरोप

**प्रतिनिधी**
**■ कणकवली**

आदित्य ठाकरेंवर राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग (NCPCR) च्या तीन केसेस दाखल आहेत, असा गौप्यस्फोट भाजप नेते नितेश राणेंनी केला आहे. तसेच याबाबत उद्धव ठाकरेंनी खुलासा न केल्यास मातोश्रीवर मोर्चा आणण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.



नितेश राणे म्हणाले की, "एनसीपीसीआर हा लहान मुलांच्या संरक्षणासाठी बनवलेला आयोग आहे. एनसीपीसीआरने आदित्य ठाकरेंविरोधात लहान मुलांना छळण्याबाबत तीन तक्रारी दिल्या आहेत की, नाही? याचा खुलासा उद्धव ठाकरेंनी करावा. आदित्य ठाकरे आणि लहान मुलांचा काय संबंध आहे? उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना आदित्य ठाकरे आणि लहान मुलांसदर्भातील तीन केसेस त्यांनी दाबल्या. याचं कारण काय?" असा सवाल त्यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, "बदलापूरमध्ये घडलेल्या निर्घृण घटनेबाबत आमचं सरकार कुठलीही दयामाया न दाखवता आरोपीला फाशी व्हावी, यावर ठाम आहे. पण उद्धव ठाकरेंचं सरकार असताना त्यांच्या मुलाने लहान मुलांसदर्भात केलेल्या घाणेरड्या कृत्यांबाबत जर त्यांनी माहिती दिली नाहीत तर मी पत्रकार परिषद घेऊन एनसीपीआरच्या तिन्ही तक्रारींबाबत माहिती देईल."

"उद्धव ठाकरे चिमुकल्या मुलीच्या बलात्काराच्या घटनेचं राजकारण करत आहे. तुमच्या घरातल्या मुलाला आधी आवरा अन्यथा लहान मुलं आणि त्यांच्या पालकांचा मोठा मोर्चा मातोश्रीवर आणेन. तसेच आम्हाला आदित्य ठाकरेंपासून संरक्षण देण्याची मागणी करेन. त्यामुळे दुसऱ्यांवर आरोप करण्याआधी उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांनी आपल्या घरातल्या मुलाला आवरावं," असेही ते म्हणाले.

"संजय राऊत भांडूपमध्ये ज्या वॉर्डमध्ये राहतात तिथला नगरसेवक भाजपचा आहे आणि ते दुसऱ्यांवर टीका करतात. महिलांवर अत्याचार, पोलिसांवर दबाव यावर बोलण्याची त्यांची नैतिकता नाही. संजय राऊत डॉ. पाटकर महिलांना छळत आहेत.

# राज ठाकरेंकडून सातवा उमेदवार जाहीर

**प्रतिनिधी**
**■ यवतमाळ**



राज्यामध्ये कायद्याचा वचक राहिलेला नाही. त्यामुळे अशा घटना घडत असल्याचे म्हणत राज ठाकरे यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. यामध्ये पोलिसांचा अजिबात दोष नाही. कारण त्यांच्यावर राज्यकर्त्यांचा दबाव असतो. त्यांना दबाव सहन करावा लागतो. मात्र, अशा नराधमांना छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या महाशक्तीची गरज असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. महाराजांनी राझ्यांच्या पाटलांचे हात पाय कापून जसा चौरंग केला होता, तसेच केले पाहिजे, असे देखील स्पष्ट मत राज ठाकरे यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे सध्या विदर्भाच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांनी आज यवतमाळ येथे आयोजित सभेमध्ये मार्गदर्शन केले. राज्याची सत्ता एकदा माझ्या हातात द्या, मग कसा सरळ करतो, असे म्हणत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर देखील निशाणा साधला. पोलिसांच्या मागे चौकशी लावली जाते आणि निलंबनाची कारवाई केली जाते. मात्र, जी लोक सत्तेत बसले आहेत. त्यांची कधीही चौकशी होत नाही, असा आरोप राज ठाकरे यांनी केला आहे. अनेकांना वाटते की राज ठाकरे सहज बोलतात. मात्र, मी सहज कुठलीही गोष्ट बोलत नसतो. एकदा राज ठाकरेच्या हातात राज्याची सत्ता देऊन पहा, राज्य कसा हाताळले जाते हे मी तुम्हाला दाखवून देईल. कायद्याची भीती काय असते हे तुम्हाला दाखवून देईल, परत महिलांकडे कोणीही वक्र दृष्टीने पाहणार नाही, असा विश्वास राज ठाकरे यांनी व्यक्त केला.

## बदलापूर नराधमांचा 'चौरंग' करण्याचा इशारा

राज ठाकरे यांनी आपल्या विदर्भ दौऱ्यात देखील उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. या आधी देखील त्यांनी चंद्रपूर आणि राजुरा या दोन विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या नावाची घोषणा केली होती. आज पुन्हा एकदा त्यांनी वणी विधानसभा मतदारसंघातून राजू उंबरकर यांना उमेदवारी घोषित केली आहे. याआधी त्यांनी चंद्रपूर मधून मनदीप रोडे तर राजुरा विधानसभा मतदारसंघातून सचिन भोयर यांना उमेदवारी जाहीर केली होती.

# गॅस गळतीमुळे सिलेंडरचा स्फोट; 9 जणांसह गोठ्यातील जनावरे होरपळली

**प्रतिनिधी**
**■ अहमदनगर**

घरगुती गॅस सिलिंडर लीक होऊन सिलेंडरचा स्फोट झाला. यात घरातील नऊ जणांसह जनावरे होरपळल्याची घटना राहाता तालुक्यातील एकरुखे गावात सकाळच्या सुमारास घडली आहे. जखमी व्यक्तींवर लोणी येथील प्रवरा रुग्णालयात उपचार सुरू असून जखमींमध्ये महिला, पुरुष आणि लहान बालकांचाही समावेश आहे.



अहमदनगर जिल्ह्यातील एकरुखे गावातील वायकर वस्तीवर राहणारे भाऊसाहेब वायकर यांच्या घरातील गॅस सिलेंडर संपले होते. यामुळे नवीन गॅस सिलेंडर लावत असताना यातून मोठ्या प्रमाणात गॅस गळती होऊ लागली. सुरक्षेच्या कारणास्तव त्यांनी गॅस सिलेंडर घराबाहेर आणले. मात्र बाजूच्या घराबाहेर पाणी तापवण्यासाठी सुरू असलेल्या चुलीतील जाळाचा आणि गॅसचा संपर्क आल्याने मोठा स्फोट झाला. हा स्पोट इतका भयंकर होता की परिसरात जाळाचा मोठा भडका उडाला.


गॅस सिलेंडरच्या बदल्यात घरातील महिला, पुरुष आणि लहान मुलांसह नऊ भाजले गेले. तसेच गोठ्यातील चार ते पाच जनावरे होरपळी आहेत. आजूबाजूच्या नागरिकांनी जखमींना लागलीच उपचारासाठी लोणी येथील प्रवरा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून जनावरांवरही उपचार सुरू आहेत. गॅस गळतीमुळे झालेल्या स्पोटाने परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे.

# जरांगेंनी राजकीय भूमिका स्पष्ट करताच आम्ही संपर्क करु

## शिवसंग्रामकडून युतीचे संकेत

**प्रतिनिधी**
**■ बीड**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली असून जोरदार तयारी सुरू केली आहे. कोणत्या ठिकाणी कोणत्या उमेदवाराला उभं करायचं याची चाचपणी सुरू झाली आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी देखील विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती देखील सुरू केल्या आहेत. अशामध्ये जरांगे पाटील यांनी राजकीय भूमिका स्पष्ट करताच आम्ही त्यांच्याशी संपर्क करू, असे संकत शिवसंग्रामच्या अध्यक्षा ज्योती मेटे यांनी दिले आहेत.



शिवसंग्रामच्या अध्यक्षा ज्योती मेटे यांनी सांगितले की, 'शिवसंग्रामच्या माध्यमातून आम्ही राज्यातील ५ विधानसभा मतदारसंघात तयारी करत आहोत. याबरोबरच शिवसंग्रामचे नेते स्वर्गीय विनायक मेटे यांनी मराठा आरक्षणावर लढा उभारला तशाच पद्धतीने मनोज जरांगे पाटील हे देखील लढा देत आहेत. त्यांनी त्यांची राजकीय भूमिका स्पष्ट केल्यानंतर आम्ही त्यांच्याशी संपर्क साधणार आहोत. शिवसंग्राम बीड विधानसभेसाठी तयारी करत आहे. हे त्यांच्या निदर्शनास आलेच असेल त्यामुळे या संदर्भात देखील त्यांच्याशी चर्चा करून आगामी वाटचाल निश्चित करण्यात येणार आहे.'

ज्योती मेटे यांनी पुढे सांगितले की, 'मराठा आरक्षण प्रश्नावर शिवसंग्रामची भूमिका प्रारंभापासून स्पष्ट राहिलेली आहे. स्वर्गीय विनायक मेटे यांनी देखील या विषयावर लढा उभारलेला आहे. तोच लढा आम्ही देखील पुढे लढत आहोत. सरकारने जानेवारीमध्ये मराठा आरक्षणाविषयी अधिसूचना काढली होती. त्याला निश्चित अशी कालमर्यादा देखील होती. परंतू या कालमर्यादेत सरकारने नेमकं काय केलं? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे आरक्षणाविषयी संभ्रम सर्वांमध्येच आहे. हा संभ्रम दूर करण्यासाठी सर्व समाज घटकांना सोबत घेत, तसेच कायदे तज्ज्ञांच्या उपस्थितीत सखोल चर्चा होणे गरजेचे आहे.'

# अमरावतीत डेंग्यूसोबत कोरोनाही वाढतोय

## दीड महिन्यात ३७ कोरोना पॉझिटिव्ह




**प्रतिनिधी**
**■ अमरावती**

अमरावती जिल्ह्यात वातावरण बदलामुळे विविध आजारांचा विळखा वाढल्याचे पाहायला मिळत आहे. जिल्ह्यात डेंग्यूचा फैलाव वाढला असताना कोरोनाचे रुग्ण आढळून येत असल्याने चिंता वाढली आहे. मागील दीड महिन्यात जिल्ह्यात ३८ कोरोना पॉसिटीव्ह रुग्ण आढळून आले आहेत.

पावसाळा सुरु झाल्यापासून अमरावती शहरासह जिल्ह्यात साथरोगांचा फैलास मोठ्या प्रमाणात होत आहे. प्रामुख्याने डेंग्यू व चिकुनगुनियाच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे पाहण्यास मिळत आहे. अमरावती जिल्ह्यात मागील १४ दिवसात ८८ डेंग्यूचे रुग्ण, तर ५८ चिकनगुणियाचे रुग्ण आढळून आले आहेत. तर डेंग्यू सदृश्य आजाराची लक्षण असलेली शेकडो रुग्ण खंगली रुग्णालयांमध्ये उपचार घेत आहेत. यामुळे आरोग्य विभाग सतर्क झाला आहे.

अमरावती जिल्ह्यात डेंग्यू व चिकुनगुनियाचे रुग्ण आढळून येत असण्यासोबतच कोरोनाचे रुग्ण आढळून येत आहेत. यामुळे अमरावती जिल्ह्यात धोक्याची घंटा निर्माण झाली आहे. सध्या जिल्ह्यात ३७ कोरोना रुग्णापैकी २५ रुग्ण हे महानगरपालिका क्षेत्रातील तर १२ रुग्ण ग्रामीण भागातील आहे. यामुळे नागरिकांना कोणतेही लक्षण असल्यास त्यांनी तातडीने तपासणी करावी असं आवाहन करण्यात आले आहे.

# कणकवलीत 7 फ्लॅटवर चोरट्यांनी डल्ला मारत 14 तोळे सोने केले लंपास

**■ कणकवली**

कणकवली येथील सात फ्लॅट चोरट्यांनी फोडून सोन्याचे दागिने व रोख रकमेवर डल्ला मारत १४ तोळे सोने लंपास केल्याचे सकाळी उघडकीस आले. पोलिसांनी श्वानपथकासह घटनास्थळी धाव घेतली.

कणकवली तालुक्यातील जानवली येथील दीक्षा अपार्टमेंट आणि पीजी ग्रुप या दोन इमारतींमध्ये शुक्रवारी पहाटेच्या सुमारास चोरीची घटना उघडकीस आली आहे. दोन्ही इमारतींमध्ये एकूण सात फ्लॅट चोरांनी फोडले. यात सोन्याचे दागिने आणि रोख रकमेवर चोरट्यांनी डल्ला मारला. रिमझिम पावसाचा फायदा चोरट्याने उठवला. घटनेची माहिती समजताच शुक्रवारी सकाळी कणकवली पोलिसांनी तपास करण्यास सुरुवात केली असून नजीकच्या ब्रह्माकुमारी अपार्टमेंटमध्ये असलेल्या सीसीटीव्हीवरून मध्यरात्रीच्या समारास दोन चोरटे या रस्त्यावरून जात असल्याचे पोलिसांना आढळून आले.

# बँकेत चेंगराचेगरी, 2 महिलांना भोवळ

## KYC साठी २ किलोमीटरपर्यंत रांगा

**प्रतिनिधी**
**■ नंदूरबार**

लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यभरातील महिलांच्या खात्यामध्ये पैसे आले आहेत. हे पैसे काढण्यासाठी आणि केवायसी करण्यासाठी महिलांनी बँकांमध्ये मोठी गर्दी केली आहे. अशामध्ये नंदूरबारमधील स्टेट बँकेमध्ये महिलांनी मोठी गर्दी केली असून याठिकाणी चेंगराचेगरी झाल्याची घटना समोर आली आहे. या चेंगराचेंगरीमध्ये दोन महिलांना भोवळ आली. सध्या या बँकेत आणि बँकेबाहेर महिलांची मोठी गर्दी झाली असून लांबपर्यंत रांगा लावण्यात आल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नंदूरबार जिल्ह्यातील धडगाव स्टेट बँक शाखेत चेंगराचेंगरीची घटना घडली आहे. या चेंगराचेंगरीत २ महिलांना भोवळ आली. ई केवायसीसाठी आदिवासी महिलांनी सकाळपासून बँकांसमोर तुफान गर्दी केली आहे. गर्दीमध्ये दोन महिलांचे प्रकृतिक खराब झाल्याने त्यांना ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

बँकेत महिला आणि पुरुषांची स्वतंत्र रांग नसल्याने अनेक महिलांसोबत छेडखानी झाल्याचा प्रकार देखील समोर आला आहे. मात्र छेडखानी संदर्भात कोणत्याही महिलेने पोलिसात अद्यापही तक्रार दाखल केली नाही. ई केवायसी करण्यासाठी भर पावसात बँकेसमोर एक ते दोन किलोमीटर पर्यंत महिलांनी रांगा लावल्या आहेत.

# लातूरच्या अल्पवयीन मुलीस जन्मदात्या आईनेच विकून लग्न लावले

**प्रतिनिधी**
**■ सोलापूर**

एका अल्पवयीन मागास मुलीला तिच्या इच्छेविरुद्ध जन्मदात्रीनेच साडेतीन लाख रुपयांस विकून एका तरुणाशी लग्न लावून दिल्याचा धक्कादायक प्रकार सोलापुरात उजेडात आला आहे. याप्रकरणी पीडित मुलीने मामाच्या मदतीने पोलिसांत धाव घेऊन कैफियत मांडली. त्यानुसार पोलिसांनी पीडितेच्या आईसह नवरा, सासरा व इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सोलापुरातील फौजदार चावडी पोलीस ठाण्यात शून्य क्रमांकाने दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, अनुसूचित जातीची पीडित मुलगी (वय १५ वर्षे १० महिने) मूळची लातूर येथील राहणारी असून, तिचे वडील रंगकाम करून कुटुंब चालवितात. मागील काही दिवसांपासून आई तिच्या लग्नासाठी स्थळ शोधत होती.

शेजारच्या महिलेने पीडित मुलीसाठी स्थळ आणले. त्यानुसार पीडित मुलीला घेऊन आई व शेजारच्या महिलेसह अन्य मंडळी सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात आली. तेथे घाई गडबडीत मुलीचा साखरपुडा उरकण्यात आला. नंतर तीनच दिवसांनी तिचे लग्नही लावून देण्यात आले. तत्पूर्वी, पीडित मुलीने आताच लग्न करायची इच्छा नसल्याने मामाशी गुपचूप मोबाइलद्वारे संपर्क साधून आपबीती सांगितली. त्याच वेळी आईने पीडित मुलीला फोन करून, मी तुझ्या नवऱ्याकडून पैसे घेऊन तुझे लग्न लावून दिले आहे, असे कळविले. त्यानंतर पीडित मुलीने नवऱ्याला विचारणा केली असता त्याने, तू हलक्या जातीची असल्यामुळे तुझ्या आईला साडेतीन लाख रुपये देऊन मी तुला विकत घेतले आहे. तू तुझ्या लायकीप्रमाणे आमच्याकडे गुपचूप राहा, असा दम भरला. लग्नाच्या रात्री घरात नवऱ्याने पीडित मुलीचा विनयभंग केला.आरोपींविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, बाललैंगिक शोषण प्रतिबंधक कायद्यानुसार हा गुन्हा फौजदार चावडी पोलिसांनी नोंदवून कुर्डूवाडी पोलीस ठाण्यास वर्ग केला आहे.

# अकोल्यात बालिकेवर मामाकडून अत्याचार

**प्रतिनिधी**
**■ अकोला**

जिल्ह्यात अल्पवयीन मुलींवर आणि महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण दिवसागणिक वाढत आहे. समाजातून अशा घटनांबद्दल तीव्र रोष व्यक्त होत आहेत. याच श्रृंखलेतील अकोला जिल्ह्यातील काझीखेड येथे गुरू शिष्याला काळिमा फासणारी घटना ताजी असताना अकोल्यात पुन्हा एका अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना उघडकीस आली. नात्यात भाची असलेल्या अल्पवयीन मुलीवर वर्षभर मामाने अत्याचार केल्याचे समोर आले. आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे.

तेल्हारा तालुक्यातील १० वर्षीय मुलगी अकोल्यातील हिंगणा तामसवाडी येथे आपल्या नातेवाईकाकडे राहायला होती. त्याची चिमुकलीवर आधीपासूनच वाईट नजर होती. वर्षभरापूर्वी घरात कोणी नसताना यश युवराज गवई याने पीडित मुलीवर जबरदस्ती करीत शारीरिक संबंध प्रस्थापित केले होते. याबाबत कोणालाही सांगितल्यास तुझी बदनामी करेल अशी धमकी त्याने दिली. यानंतरही त्याने वारंवार पीडितेवर अत्याचार केले.

रोजच्या अत्याचाराला कंटाळलेल्या मुलीने अखेर आपबिती आपल्या वडिलांना सांगितली. मुलीच्या भेटीला वडील आले असता, वडिलांसमोर पीडित मुलीने ३० ऑगस्ट २०२३ पासून ते कालपर्यंत तिच्यावर झालेल्या अत्याचाराचा पाढा वाचला. संपूर्ण घटनाक्रम सांगितल्या नंतर वडिलांनी थेट पोलीस स्टेशन गाठून आरोपीचे कृत्य उघडकीस आणले. पीडित मुलीच्या वडिलांनी आरोपी विरुद्ध तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तत्परतेने २० वर्षीय आरोपीला अटक केली. पोलिसांनी बीएनएस आणि पोक्सो कायदा अंतर्गत आरोपीवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले असून, या प्रकरणाचा अधिक तपास अकोट फाईल पोलीस करीत आहेत, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुळकर्णी यांनी दिली.

आरोपी अटकयाप्रकरणी २३ ऑगस्ट २०२४ रोजी पीडीतचे वडील (फिर्यादी) यांनी पोलीस स्टेशनला पिडीतेसह येवुन रिपोर्ट दिला. पिडीता हिने माहीती दिली की, तिचे नात्यातील तिचे वडीलांचा मामे भाऊ यश युवराज गवई (वय २० वर्षे) याने पिडीत हिला धमकावून तिचे सोबत वारंवार लैंगिक अत्याचार केला.

अशा प्रकारे पिडीताने तिचे वडीलांना दिलेल्या माहीती वरून फिर्यादी यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिल्यावरून पोलीस स्टेशन अकोट फाईल गुन्हा नोंद करण्यात आला आहे

# 25 वर्षीय मनोरुग्ण महिलेवर बलात्कार

**प्रतिनिधी**
**■ चंद्रपूर**

बदलापूर येथील शाळेत बालिकांवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकाराने राज्यभरात संतापाची लाट उसळलेली असतानाच, आता राज्यातील इतर अनेक भागातून देखील सातत्याने अशाच घटना पुढे येऊ लागल्या आहेत. त्यात आता चंद्रपूरच्या नागभीड येथे 25 वर्षीय मनोरुग्ण महिलेवर बलात्कार झाल्याची संतापजनक घटना पुढे आली आहे.

नागभीड शहरातील नव्या बस स्टँडच्या निर्जन प्रसाधनगृहात हा प्रकार घडल्याची माहिती पुढे आली आहे. 12 ऑगस्टच्या रात्रीच्या सुमारास ही घटना घडलेली असून घटनेतील आरोपीच्या सहकाऱ्यांनी चक्क व्हिडीओ देखील चित्रित केला आहे. हा व्हिडिओ आज समाजमाध्यमावर व्हायरल झाल्याने हे प्रकरण पुढे आले आहे. त्यामुळे सुसंस्कृत आणि पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात नेमकं चाललंय तरी काय? असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जाऊ लागलाय.

या संतापजनक प्रकारानंतर भाजप कार्यकर्त्यांसह शहरातील शेकडो नागरिकांनी या प्रकाराविरोधात पोलिसात धाव घेतली आहे. तर यातील आरोपिंना कठोर शिक्षेची मागणी करत पोलिसांनी त्याला तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे.

# दापोली-दाभोळ मार्गावर एसटी-दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी

**प्रतिनिधी**
**■ दापोली**

दापोली – दाभोळ मार्गावर उंबर्ले रोहीदासवाडी स्टॉप जवळ दापोलीकडून दाभोळकडे जाणारी एसटी ( एम.एच.०७ सी ७४०४) व दाभोळकडून दापोलीकडे येणाऱ्या दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचाजागीच मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. जखमीवर दापोली उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.




दापोली- दाभोळ एसटी बस शुक्रवार २३ ऑगस्टला सकाळी ११ वाजता सुटून दाभोळकडे रवाना झाली होती. साडेअकराचे सुमारास ती उंबर्ले येथील बोरघरे यांच्या बागेसमोर आली असता दाभोळ कडून येणारी दुचाकी यांच्यात समोरासमोर धडक बसली. यामध्ये दुचाकीस्वार तैहसिन नियामुद्दीन मात्रोजी (वय ३५, रा. वणकर मोहल्ला, दाभोळ) याचा जागीच मृत्यू झाला तर दुचाकीवर मागे बसलेल्या शमशुद्दीन इस्माईल दांडेकर रा. दाभोळ याला गंभीर दुखापत झाली आहे. त्याला पुढील उपचारासाठी शासकीय उपजिल्हा रुग्णालय दापोली येथे दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी पोलीस, एसटी आगाराचे अधिकारी दाखल झाले असून पोलीस पंचनाम्याचे काम उशिरा पर्यंत सुरु होते.

## बेस्टच्या सेवानिवृत्त कामगारांना आवाहन

**मुंबई :** ज्या सेवानिवृत्त कर्मचा-यांचे ३०% प्रदान करणे बाकी आहे अशा कर्मचा-यांची यादी बेस्ट उपक्रमाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यात आली आहे. अशा कर्मचा-यांनी त्यांच्या प्रलंबित देयकांबाबत बेस्ट उपक्रमाकडे त्वरित संपर्क साधावा असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या १० मे, २०२४ रोजीच्या आदेशानुसार, पात्र असलेले बेस्ट उपक्रमातील सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीच्या रकमेपैकी ३० टक्के एवढी रक्कम प्रदान करण्याबाबत सूचित करण्यात येते की, सदर रक्कम प्रदान करण्याकरिताची कार्यपध्दती आणि देय रकमेबाबतचे तपशील बेस्ट उपक्रमाच्या www.bestundertaking.com या संकेत स्थळावर देण्यात आले आहेत. याची संबंधित कर्मचा-यांनी कृपया नोंद घ्यावी.ज्या सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या रकमेच्या ३० टक्के एवढी रक्कम यापूर्वीच प्राप्त झाली आहे. अशा कर्मचा-यांनी प्रदानाबाबतची कृपया फक्त नोंद घ्यावी. असेही बेस्ट ने म्हटले आहे.

## 'अपना बाजार'तर्फे रविवारी रक्तदान शिबिर

■ मुंबई

सहकार क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असलेल्या अपना बाजार तर्फे येत्या रविवारी २५ ऑगस्ट रोजी, सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

चौथा मजला, अपना बाजार, गोविंदजी केणी मार्ग, नायगांव, दादर पूर्व, येथे हे शिबिर होणार आहे. अपना बाजारचे सभासद, ग्राहक, हितचिंतक, समाजवादी चळवळीतील कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष अनिल गंगर व उपकार्याध्यक्ष श्रीपाद फाटक यांनी केले आहे.

# मुंबई हाफ मॅरेथॉन 2024...

प्रतिनिधी
■ मुंबई

- वीस हजारहून अधिक धावपटू सहभागी
- सहा हजारहून अधिक महिलांचा विक्रमी प्रतिसाद
- रविवारी सचिन तेंडुलकरच्या हस्ते शर्यतीस प्रारंभ



विविध क्षेत्रातील आणि सर्व वयोगटातील वीस हजारहून अधिक धावपटू या रविवारी (दिनांक २५ ऑगस्ट) रोजी होणाऱ्या एजेस फेडरल लाइफ इन्शुरन्स मुंबई हाफ मॅरेथॉन २०२४ मध्ये भाग घेणार आहेत. त्यामध्ये ६२०० पेक्षा महिलांचा विक्रमी प्रतिसाद लाभला आहे. एजेस फेडरल लाइफ इन्शुरन्सचा दीर्घकाळ ब्रँड ॲम्बेसेडर असलेला क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, जिओ गार्डन, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथून पहाटे ५ वाजता प्रमुख शर्यतींना झेंडा दाखवतील.

शर्यतीमधील दहा किलोमीटर अंतराच्या गटात आठ हजारपेक्षा जास्त खेळाडू सहभागी झाले आहेत तर २१ किलोमीटर अंतराच्या अर्ध मॅरेथॉन मध्ये ४ हजारहून अधिक धावपटू आपले नशीब आजमावणार आहेत. सहभाग दिसेल. त्यामध्ये राज्यातील आणि इतर ठिकाणच्या काही नामवंत खेळाडूंचा समावेश आहे. पाच किलोमीटर शर्यतीत पाच हजार हून अधिक तर तीन किलोमीटर शर्यतीत तीन हजार हून अधिक खेळाडूंना आकर्षित केले आहे.

'रन टुडे, फिनिश फिअरलेस' या शर्यतीची थीम अधोरेखित करताना, सचिन म्हणाला, "भारतीय म्हणून, आपल्या सर्वांना खेळ आवडतात, परंतु आपण काय केले पाहिजे ते म्हणजे निरोगी जीवनाचा एक मार्ग म्हणून खेळ स्वीकारणे, त्याच्या मानसिक आणि शारीरिक फायद्यासाठी विविध खेळ खेळणे आणि त्यात भाग घेणे आवश्यक आहे. भारतातील प्रमुख शहरांमध्ये आयोजित केलेल्या मॅरेथॉनसह आमच्या भागीदारीद्वारे, आम्ही ही दृष्टी प्रत्यक्षात आणण्यासाठी काम करत आहोत. एजेस फेडरल लाइफ इन्शुरन्स मुंबई हाफ-मॅरेथॉनमधील सहभागामध्ये सातत्याने होत असलेली वाढ पाहणे खरोखरच आनंददायी आहे आणि अधिकाधिक लोक त्यांच्या आरोग्य आणि आरोग्याला प्राधान्य देत आहेत हे पाहणे खरोखरच उत्साहवर्धक आहे."

एजेस फेडरल लाइफ इन्शुरन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अरविंद शाही यांनी महिला सहभागींच्या संख्येत वाढ झाल्याबद्दल आनंद व्यक्त करीत सांगितले. "गेल्या वर्षी ५६०० महिला सहभागी झाल्या होत्या आणि यावर्षी ६२०० महिला भाग घेत आहेत. ते एकूण सहभागींपैकी ३१% आहेत. हे दर्शविते की आम्ही तरुण आणि वृद्धांना धावण्याची प्रेरणा देण्याचे आमचे ध्येय साध्य केले आहे. आम्हाला अभिमान वाटतो की आम्ही देशात फिटनेस चळवळ सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे."

एनीबी (NEB) स्पोर्ट्स द्वारे आयोजित, AFLI मुंबई हाफ मॅरेथॉन शर्यतीची पर्यावरण संवेदनशीलता आणि सर्वसमावेशकता यासारखी सकारात्मक वैशिष्ट्ये आहेत. विविध कॉर्पोरेट आणि क्लब संघांव्यतिरिक्त, संरक्षण कर्मचाऱ्यांची लक्षणीय उपस्थिती असेल, भारतीय नौदलाचे १५०० धावपटू सहभागी झाले आहेत.

मागील आवृत्त्यांमध्ये सुरू करण्यात आलेले हरित उपक्रम सुरूच राहतील. प्लॅस्टिकचा कमीत कमी वापर केला जाईल आणि सहभागी खेळाडूंना पर्यावरणपूरक सरावांची जाणीव करून दिली जाईल. पुन्हा एकदा, मार्गदर्शक इंडिया रनर्सच्या सहाय्याने दृष्टिहीन धावपटूंचा संघ मैदानात उतरेल, तर शारीरिकदृष्ट्या अक्षम आणि व्हीलचेअर खेळाडू आणि इतर विशेष-अपंग सहभागी झाले आहेत. मित्रायण एनजीओ मधील १५०हून अधिक मुले देखील प्रथमच या कार्यक्रमात सहभागी होतील.

# शाकिब अल हसनवर खुनाचा गुन्हा दाखल

**कपड्याच्या दुकानात काम करणाऱ्या व्यक्तीचा खून केल्याचा आरोप**



■ ढाका

बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू शकिब अल हसन याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना, अभिनेते फिरदौस अहमद आणि ओबेदुल कादर आणि अन्य 154 जणही या प्रकरणात आरोपी आहेत. याशिवाय 400 हून अधिक अनोळखी लोकांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या शाकिब अल हसन पाकिस्तान दौऱ्यावर आहे. तो बांगलादेशच्या कसोटी संघाचा एक भाग आहे आणि सध्या रावळपिंडी येथे मालिकेतील पहिला कसोटी सामना खेळत आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, या सर्वांवर कपड्याच्या दुकानात काम करणाऱ्या रुबेल नावाच्या व्यक्तीची हत्या केल्याचा आरोप आहे. 5 ऑगस्ट रोजी रुबेलने एडबोरमधील रिंगरोडवरील निषेध मोर्चात भाग घेतला. रॅलीदरम्यान, नियोजित कटाचा भाग म्हणून कोणीतरी जमावावर गोळीबार केला. या गोळीबारात रुबेलच्या छातीत आणि पाठीत गोळी लागली. त्यामुळे 7 ऑगस्ट रोजी रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

शाकिब आणि फिरदौस या वर्षी जानेवारीत अवामी लीगच्या तिकिटावर खासदार म्हणून निवडून आले होते. मात्र, पंतप्रधान शेख हसीना यांची सत्ता गेल्यानंतर त्यांची खासदारकीही हिसकावण्यात आली.

बांगलादेशचा हा स्टार अष्टपैलू खेळाडू मैदानावर आणि मैदानाबाहेर वादांमुळे चर्चेत राहतो. या वर्षी एप्रिलमध्ये त्याची ग्राउंड स्टाफसोबत बाचाबाची झाली होती. त्याचा फोन हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला आणि मारहाण करण्याची धमकीही दिली. याशिवाय तो मैदानावर विरोधी संघातील खेळाडू आणि पंचांशीही अनेकदा भांडला आहे.

37 वर्षीय अनुभवी खेळाडू शाकिबने बांगलादेशकडून आतापर्यंत 67 कसोटी, 247 एकदिवसीय आणि 129 टी-20 सामने खेळले आहेत. या कालावधीत शाकिबने कसोटीत 4505 धावा केल्या आहेत आणि 237 बळी घेतले आहेत. तर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शाकिबच्या नावावर 7570 धावा आणि 317 विकेट आहेत. तर आंतरराष्ट्रीय T20 मध्ये त्याने 2551 धावा आणि 149 विकेट घेतल्या आहेत.

# विनेशच्या गावातील मुलीने जिंकलं सुवर्णपदक

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली



भारताच्या आदिती कुमारी (४३ किलो), नेहा सांगवान (५७ किलो), पुलकित (६५ किलो) आणि मानसी लाथर (७३ किलो) या मुलींनी कनिष्ठ (१७ वर्षांखालील) जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत गुरुवारी सुवर्णपदकांची कमाई केली.

प्रथम आदितीने ४३ किलो वजनी गटात अप्रतिम कामगिरी करताना ग्रीसच्या मारिया लुईझा गकिकाचा ७-० असा सहज पराभव केला. ५७ किलो वजनी गटात नेहाने जपानच्या सो सुईसुईला पराभूत करत सोनेरी यश संपादन केले. त्यानंतर ६५ किलो वजनी गटात पुलकितने चुरशीच्या लढतीत तटस्थ खेळाडू म्हणून खेळणाऱ्या दारिया फ्रोलोवाचा ६-३ असा पराभव केला. मग मानसीने हॅना पिर्सकायाला चितपट केल्याने भारताला सुवर्णपदकाचा चौकार साकारता आला.

तसेच श्रुतिका पाटील (४६ किलो) आणि काजल (६९ किलो) यांनी अंतिम फेरी गाठताना आणखी दोन सुवर्णपदकांच्या आशा कायम राखल्या आहेत. राज बाला (४० किलो) कांस्यपदकाच्या लढतीत खेळणार असून मुस्कान (५३ किलो) आणि रजनिता (६१ किलो) यांनी रेपिचेज फेरी गाठल्याने त्यांनाही पदक मिळवण्याची संधी आहे.

पॅरिस ऑलिम्पिकमधून भारताची कुस्तीपटू विनेश फोगट तिच्या बलाली गावात पोहोचली तेव्हा तिने एक इच्छा व्यक्त केली होती. ती म्हणाली होती की बलालीमधून आणखी महिला कुस्तीपटू उदयास याव्यात ज्या आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचा गौरव करतील. तिच्या वक्तव्यानंतर काही दिवसांनी बलाली येथील १७ वर्षीय नेहाने १७ वर्षांखालील जागतिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले.

नेहाने महावीर फोगट यांच्या अकादमीतून प्रशिक्षणही घेतले आहे. हरियाणाची राज्य चॅम्पियन झाल्यावर तिने प्रशिक्षक बदलले. ती सध्या कृष्णन आखाड्यात साजन सिंग मंडोला यांच्याकडे प्रशिक्षण घेते.

नेहाने सांगितले की, 'माझ्यासाठी ही खूप मोठी गोष्ट आहे. हा विजय विनेश दीदी आणि महिला कुस्तीपटूंसाठी आहे. विनेश दीदी आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्थान आहेत. हे विजेतेपद बलाली गावातील महिला कुस्तीपटूंना प्रेरणा देईल. विनेशबद्दल नेहा म्हणाली, 'विनेश दीदीने जे यश मिळवले आहे, ते आमच्या गावातील इतर कोणीही मिळवले नाही. आमच्यासाठी ते सुवर्णपदक त्याचं होतं. आम्ही त्यांना तेच सांगितले. त्यांच्यासारखं आम्ही थोडंसं काही करू शकलो तर ती खूप मोठी गोष्ट असेल.

नेहाचे वडील अमित कुमार म्हणाले की, विनेश फोगटच्या बलालीमधील भाषणानंतर काही दिवसातच त्यांच्या मुलीने देशासाठी पदक जिंकले. अमित यांनी सांगितले की, जेव्हा विनेश बलालीमध्ये गेल्या आठवड्यात परतली तेव्हा ते आणि त्यांची मुलगी स्टार कुस्तीपटूला भेटले. अमित सांगवान म्हणाले, 'नेहा दुपारभर नोटांचा हार घेऊन विनेशची वाट पाहत होती. स्टेजवर गेल्यावर विनेशने तिला सांगितले की, तिचे स्वप्न फक्त नेहासारख्या मुलींनीच पूर्ण करायचे आहे. नेहाच्या यशाने विनेशला खूप आनंद झाला आहे. बलाली गावासाठी ही एक खास संधी आहे.

## सीवरेज लाईनचे प्रमाणीकरण सर्वेक्षण केले जाईल

वृत्तसंस्था
■ मुंबई

मुंबई महानगरपालिकेने मुंबईत पसरलेल्या सीवरेज लाईनचे पुनर्मूल्यांकन सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईत 2050 किमी सीवरेज लाईन आहेत. रस्त्यांच्या दुतर्फा आणि मध्यभागी या ओळी करण्यात आल्या आहेत. तुटलेल्या सीवरेज लाईनमुळे गळतीची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे बीएमसीने सीवरेज लाइनचे पुनर्प्रमाणीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर जीर्ण पाईप बदलण्यासह सीवरेज लाईनचा नवा नकाशा तयार करण्यात येणार आहे.

महापालिकेच्या मलनिस्सारण विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, मुंबईत सीवरेज लाइनवर 75000 मॅनहोल आणि 4000 व्हेंट शाफ्ट आहेत. BMC ने 2014-15 मध्ये ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टमवर आधारित 2 ठिकाणी बेस स्टेशन आणि GISS रोव्हर्स 28 ठिकाणी सुरू केले.

जीआयएस सर्वेक्षणादरम्यान महापालिकेला गटार लाइनची रुंदी, खोली, लेआउट याबाबत अचूक माहिती मिळाली. या तंत्रज्ञानाचा वापर करून पाइपलाइन टाकताना झालेल्या अनेक चुकाही उघड झाल्या आहेत. अधिकाऱ्याने सांगितले की, जीआयएस सर्वेक्षणातील 65,000 मॅनहोलपैकी 13,000 समांतर नव्हते. उंच इमारती आणि मोठमोठी झाडे यामुळे ते त्यांच्या जागेवरून हलले होते. त्यामुळे अनेक ठिकाणी गटार लाइनमध्ये गळतीही झाली. त्यामुळे पुन्हा एकदा जीपीएस आणि एकूण स्थानक सर्वेक्षणाची गरज भासू लागली आहे.

अधिकाऱ्याने सांगितले की, सीवरेज लाईनच्या पुनर्प्रमाणीकरणासाठी निविदा काढण्यात आली होती. त्यात चार कंपन्यांनी सहभाग घेतला. ज्यामध्ये हे कंत्राट सर्वात कमी बोली लावणाऱ्या मेसर्स पायोनियर फाउंडेशन इंजिनियर्स लिमिटेडला देण्यात आले आहे. या कामासाठी एकूण 7 कोटी 35 लाख 77 हजार 835 रुपये खर्च येणार आहे.

# विद्यार्थिनींच्या सुरक्षा उपाययोजनांच्या सक्षमीकरणासाठी समिती

## शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांची माहिती

प्रतिनिधी
■ मुंबई



विद्यार्थिनींसोबत घडणाऱ्या दुर्दैवी घटना रोखण्यासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. याचाच एक भाग म्हणून शालेय शिक्षण आणि महिला व बालविकास विभागाच्या एकत्रित प्रयत्नांतून या उपाययोजनांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. यासाठी महिला व बालविकास आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येत असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

शालेय शिक्षण मंत्री श्री. केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. महिला व बालविकास मंत्री कु.अदिती तटकरे, शालेय शिक्षण प्रधान सचिव आय.ए.कुंदन, एकात्मिक बाल विकास प्रकल्प आयुक्त कैलास पगारे यावेळी उपस्थित होते. महिला व बालविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.अनुप यादव, शालेय शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, एससीईआरटी चे संचालक राहूल रेखावार दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

शालेय शिक्षण मंत्री श्री. केसरकर म्हणाले, या समितीने नागरिक, शिक्षण आणि विद्यार्थिनींच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या सूचना असल्यास त्या ऐकून तातडीने अधिक उपाययोजना सुचवाव्यात. सर्व शाळा आयुक्तालयाशी जोडाव्यात. प्रत्येक शाळेला किमान एक इंटरॲक्टीव्ह टीव्ही देऊन त्या माध्यमातून विद्यार्थिनींना प्रशिक्षण द्यावे. आनंददायी शनिवार उपक्रमामध्ये या प्रशिक्षणाचा समावेश करण्यात यावा. चांगला आणि वाईट स्पर्श ओळखायला शिकवावे. यासाठी माता बालक संघाचीही मदत घ्यावी.

महिला व बालविकास मंत्री कु.तटकरे म्हणाल्या, अल्पवयीन विद्यार्थिनींसोबत घडणाऱ्या घटना अतिशय दुर्दैवी आहेत. मोठ्या विद्यार्थिनींना दिले जाणारे प्रशिक्षण अल्पवयीन विद्यार्थिनींना समजणे कठीण जाईल, यासाठी ॲनिमेटेड फिल्मच्या माध्यमातून त्यांना शिकविण्यात यावे. गुड आणि बॅड टच बाबत अभ्यासक्रमात समावेश करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, श्रीमती. रश्मी प्रफुल्ल पाटील हिच्या मालकीचे भाईंदर (पूर्व) बी. पी. रोड वरील भरत स्मृती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेमध्ये २ क्रमांकाचे दुकान आहे. सदर दुकान त्यांना दि.२५ फेब्रुवारी २०२१ च्या बक्षीसपत्राने बक्षीस देण्यात आले आहे. सदर दुकान हे तिच्या मालकीचे आणि कब्जे वहिवाटीचे आहे. सदर दुकानासाठी भरत स्मृती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेचे सभासदत्व मिळण्यासाठी तिने संस्थेकडे अर्ज केला आहे व सदर अर्ज संस्थेच्या विचाराधीन आहे.

तरी श्रीमती. रश्मी प्रफुल्ल पाटील यांना वरील दुकानासाठी भरत स्मृती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित संस्थेने सभासदत्व देण्यास कुणाचीही हरकत असल्यास तसेच सदर दुकानावर कुणाचाही हक्क, हितसंबध, कर्ज, गहाणवट वैगेरे असल्यास त्यांनी त्याबाबत १४ दिवसाचे आत लेखी, योग्य त्या कागदपत्रासह ऑफिस क्र.२, पहिला मजला, न्यू शांती गंगा अपार्टमेंट, स्टेशन रोड, भाईंदर (पू), ता. व जिल्हा ठाणे, ४०११०५ येथे कळवावे. दिलेल्या मुदतीत कळविण्यात न आल्यास श्रीमती. रश्मी प्रफुल्ल पाटील यांना वरील संस्थेचे सभासदत्व देण्यास कुणाचीही हरकत नाही व असलास ती सोडून देण्यात आली आहे. असे समजून भरत स्मृती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित त्यानुसार कळविण्यात येईल व संस्था श्रीमती. रश्मी प्रफुल्ल पाटील यांना सभासदत्व देईल याची नोंद घ्यावी.

कळावे,

**जॉन एम रॉड्रीक्स**
**वकील**
**मो. नं. - ९८९२४०१३४९**



**मध्य रेल्वे**

**अधिसूचना**

मुंबई विभाग, मध्य रेल्वेमधील सेवांच्या अत्यावश्यक परिस्थितीत मासिक मोबदला आधारावर सेवानिवृत्त रेल्वे कर्मचाऱ्यांची पुनर्नियुक्ती. 13/09/2024 रोजी किंवा त्यापूर्वी विविध श्रेणींसाठी (एकूण 4 रिक्त पदे) मुंबई विभाग, मध्य रेल्वेमध्ये मासिक मोबदला आधारावर मुंबई विभागातील सेवानिवृत्त रेल्वे कर्मचाऱ्यांकडून तसेच मध्य रेल्वेच्या सर्व विभागांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. 22/08/2024 रोजी पुनर्निबंधासाठी कमाल वयोमर्यादा 65 वर्षे आहे. अधिक माहितीसाठी आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी आमच्या संकेतस्थळ www.cr.indianrailways.gov.in > about us > Division > Mumbai > Personnel > Re-engagement of Retired Railway Staff on Mumbai Division (Total 4 Vacancies) and www.cr.indianrailways.gov.in > News & Recruitment > Recruitment > Notification. पहा.

351

रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है



**पश्चिम रेल्वे**

**ओएचई फेरफार काम**

वरी. डीईई/टीआरडी/बीएल ई-निविदा सूचना क्र. ईएल-टीआरडी-डब्ल्यू-११८-२४-२५-८ दिनांकित १६.०८.२०२४ मागवित आहेत. कामाचे नाव: मुंबई विभागाच्या विरार – सुरत अनुभागामधील पालघर स्थानक येथे अमृत भारत स्थानक योजना (फेज-१) अंतर्गत स्थानकाच्या सुधारणा कामासंदर्भात ओएचई फेरफार काम. जाहिरात मूल्य: रु. १,३१,६७,७५४/- इसारा रक्कम: रु. २,१५,८००/- सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: २०.०९.२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २०.०९.२०२४ रोजी १५.३० वा. अधिक तपशिलासाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. प्रत्यक्ष आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

0464

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly



**पश्चिम रेल्वे**

**शुद्धिपत्रक**
**इंस्टोलेशन आणि देखभाल सेवा**

जगजीवन राम हॉस्पिटल (जेआरएच), मुंबई सेन्ट्रल, मुंबई, पश्चिम रेल्वे पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) पद्धतीवर जेआरएच मध्ये रेडियोलॉजिकल सर्व्हिसेसचे इंस्टोलेशनकरीता इच्छुक पक्षकारांकडून प्रस्ताव मागवित आहेत. शुद्धिपत्रकासह निविदेचा तपशिल आणि त्यांची कागदपत्रे https://www.ireps.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहेत आणि इच्छुक पक्षकार त्यांचे प्रस्ताव संकेतस्थळावर ऑन लाईन सादर करू शकतात. निविदा सूचना क्र.: जेआरएच-पीपीपी-सीटीएमआरआय-१२८-३ दिनांक: ०१/०८/२०२४ शुद्धिपत्रक १ दिनांक : २१/०८/२०२४. कामाचे नाव/ महत्वाचे/ विशेष अटी आणि शर्ती: अ) रेडिओलॉजिकल सेवा स्थापित करणे आणि देखरेख करणे, ऑपरेट करणे आणि प्रदान करणे- सीटी स्कॅन १२८ स्लाइस, एमआरआय ३ टेस्ला आणि यूएसजी मशीनचे तांत्रिक तपशील संबंधित पॅरा येथे निविदा दस्तऐवजात दिलेले आहेत. बी) सर्व मानवी संसाधने आणि इतर रसद व्यवस्थापित करा. सी) त्या भागात आवश्यक वातानुकूलित यंत्रणा बसवा आणि देखरेख करा. डी) पाणी आणि विजेचा खर्च सेवा प्रदात्याने उचलावा. ई) मशिन्स बसवण्यासाठी पुरेशी जागा असलेली इमारत रेल्वेद्वारे प्रदान केली जाईल परंतु अंतर्गत फेरबदल/फेरफार/नूतनीकरण खाजगी पक्षाकडून करावे लागेल. एफ) पूर्ण होण्याचा कालावधी - १० वर्षे जी) रेल्वे रूग्णांसाठीचे दर सध्याच्या सीजीएचएस-मुंबई दरांनुसार असतील. एच) सीजीएचएस द्वारे निर्दिष्ट न केलेल्या तपासणीसाठी, अशा चाचण्यांसाठी प्रचलित बाजार दरांच्या ५०% दर असतील. आय) रेल्वे रूग्णांना प्राधान्याने सेवा देण्यात यावी. जे) बाहेरील लोकांसाठी (रेल्वे नसलेल्या रुग्णांसाठी), खाजगी पक्ष चाचण्यांसाठी बाजार दर आकारू शकतात. के) निविदा प्रक्रियेदरम्यान बोलीदार निवडण्यासाठी प्रीमियम हा निर्णायक घटक असेल. आय) खाजगी भागीदारासाठी सर्व वैधानिक नियमांचे आणि जमिनीच्या सर्व लागू कायद्यांचे पालन करणे अनिवार्य असेल. एम) परफॉर्मन्स बँक गॅरंटी (पीबीजी) - रु. निविदा दस्तऐवजात नमूद केल्यानुसार अटी व शर्तींसह ३० लाख. कामाचे अंदाजे मूल्य: रु. ३ कोटी प्रती वर्ष (सर्व समाविष्ट) इरठे: रु. ३,००,०००/- पूर्तता कालावधी: १० वर्षे शेरा: १ किमान आधार मूल्य/ प्रीमियम: रु. ५.४० लाख प्रती वर्ष २. समाप्ती दिनांक/ वेळ: १२/०९/२०२४ रोजी ११:०० वा. टिप: कृपया निविदा कागदपत्रे, शुद्धिपत्रक अधिक तपशिलासाठी कृपया आमच्या https://www.ireps.gov.in वरून डाऊनलोड करता येतील.

0476

आम्हाला फॉलो करा : facebook.com/WesternRly आम्हाला लाईक करा : twitter.com/WesternRly



**पश्चिम रेल्वे**

**विविध कामे**

विभागिय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे मुंबई सेन्ट्रल, मुंबई – ४०००0८ खालील कामांसाठी ई-निविदा मागवित आहेत:

| अनु. क्र. | निविदा सूचना क्र. आणि दिनांक | काम आणि ठिकाण | कामाचे अंदाजे मूल्य (रु. मध्ये) | इरठे (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | बीसीटी/२४-२५/१४२ दि. २०/०८/२०२४ | उकाई सोनगड-जळगाव (अनुभाग): एसएसई (डब्ल्यू) नावापुर आणि नंदुरबार ह्यांच्या अधिकारक्षेत्राच्या अंतर्गत २ वर्षांसाठी पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी वार्षिक देखभाल कंत्राट | १९,१८,७१५.०४ | ३८४००.०० |
| २ | बीसीटी/२४-२५/१४३ दि. २०/०८/२०२४ | उकाई सोनगड-जळगाव (अनुभाग): डीईएन/ ई/ एमएमसीटी ह्यांच्या अधिकारक्षेत्राच्या अंतर्गत २ वर्षांसाठी ओव्हरहेड आणि भूमिगत पाणी साठवण टाक्यांची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण. | ४,९२,५६०.०० | ९९००.०० |
| ३ | बीसीटी/२४-२५/१४४ दि. २०/०८/२०२४ | चवळखेडे: अप आणि डाऊन मेन लाईन दरम्यान डीएन लूपचे कॉमन लूप मध्ये परिवर्तन करण्यासाठी दोन्ही बाजूना इमर्जन्सी क्रॉस ओव्हरची तरतूद. | ९५,०९,८७८.०३ | १९०२००.०० |

उपरोक्त नमूद निविदांसाठी सादरीकरण दिनांक आणि वेळ: १३०/९/२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत उघडण्याचा दिनांक आणि वेळ: १३/०९/२०२४ रोजी १५.३० वा. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. प्रत्यक्ष प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

0466

आम्हाला फॉलो करा : facebook.com/WesternRly आम्हाला लाईक करा : twitter.com/WesternRly



**पश्चिम रेल्वे**

**मुंबई विभागातील जाहिरात कंत्राटांसाठी ई-लिलाव आमंत्रित करणारी सूचना**

**काम - मुंबई विभागात विविध एनएफआर प्रसिद्धी माध्यमांद्वारा जाहिरातींचे प्रदर्शन**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक, वाणिज्य विभाग, एनएफआर सेक्शन, मुंबई सेन्ट्रल, मुंबई-४०० ००८ ई-लिलावासाठी बोलीदारांना आमंत्रित करीत आहेत. खालीलप्रमाणे जाहिरात कंत्राटांकरिता संचालित करावयाच्या ई-लिलावाचे तपशील खाली देण्यात आले आहेत:

| लिलाव वस्तुसूची क्र. | लिलावाचा प्रारंभ (सर्व लॉट्स) |
|---|---|
| एमएमसीटी-एडीव्हीटीएम-२४-१४ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता |

| अ. क्र. | लॉट नंबर | ठिकाण / क्षेत्र | दिवस | ई-लिलाव समाप्तीची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | एमएसएस-बीसीटी-पीएलजी-मेडएसटीएन-४४-२४-१ (मिसे-स्टॅटिक-सर्व्हिसेस-मेडिकल फॅसिलिटीज ॲट स्टेशन) | ०५ वर्षे कालावधीसाठी पालघर रेल्वे स्थानकात इमर्जन्सी मेडिकल रूममार्फत चोवीस तास वैद्यकीय सुविधा पुरविणे. | १८२६ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०२.३० वाजता |

| लिलाव वस्तुसूची क्र. | लिलावाचा प्रारंभ (सर्व लॉट्स) |
|---|---|
| एमएमसीटी-एडीव्हीटी-२४-३३ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता |

| अ. क्र. | लॉट नंबर | ठिकाण / क्षेत्र | दिवस | ई-लिलाव समाप्तीची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | एडीव्हीटी-बीसीटी-एमईएल-ओएसडी-३५५-२४-१ (स्थानक प्रीमाइसवर जाहिरात (डिजिटल)) | ०५ वर्षे कालावधीसाठी मरिन लाइन्स येथे स्थानक भवनावर एलईडी स्क्रीनकरिता अधिकांश जाहिरात हक्क. | १८२६ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०३.३० वाजता |
| २ | एडीव्हीटी-बीसीटी-सीसीजी-ओएसएन-३२९-२४-२ (स्थानक प्रीमाइसवर जाहिरात (नॉन-डिजिटल)) | ३ वर्षे कालावधीसाठी चर्चगेट स्थानकातील तिकीट विक्री क्षेत्रातील अधिकांश जाहिरात हक्क. | १०९५ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०३.४० वाजता |
| ३ | एडीव्हीटी-बीसीटी-पीबीएचडी-ओएसएन-२९९-२४-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | ३ वर्षे कालावधीसाठी प्रभादेवी (पीबीएचडी) स्थानकातील अधिकांश जाहिरात हक्क. | १०९५ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०३.५० वाजता |
| ४ | एडीव्हीटी-बीसीटी-यूओआय-ओएसएन-१८२-२४-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | ३ वर्षे कालावधीसाठी उमरोली (यूओआय) स्थानकातील अधिकांश जाहिरात हक्क. | १०९५ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता |
| ५ | एडीव्हीटी-बीसीटी-पीएल-ओएसएन-२९८-२४-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | तीन वर्षे कालावधीसाठी लोअर परळ (पीएल) स्थानकातील अधिकांश जाहिरात हक्क. | १०९५ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०४.१० वाजता |
| ६ | एडीव्हीटी-बीसीटी-एमएक्स-ओएसएन-२९७-२४-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | तीन वर्षे कालावधीसाठी महालक्ष्मी (एमएक्स) स्थानकातील अधिकांश जाहिरात हक्क. | १०९५ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०४.२० वाजता |
| ७ | एडीव्हीटी-बीसीटी-एसटीसी-ओएसएन-३४०-२४-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | तीन वर्षे कालावधीसाठी सांताक्रूझ (एसटीसी) स्थानकातील अधिकांश जाहिरात हक्क. | १०९५ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०४.३० वाजता |
| ८ | एडीव्हीटी-बीसीटी-जेओएस-ओएसएन-२२९-२४-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | तीन वर्षे कालावधीसाठी जोगेश्वरी (जेओएस) स्थानकातील पादचारी पुलांवर एकूण २३१५ चौरस फूट डिस्प्ले एरियाकरिता पुढील प्रकारांमार्फत जाहिरात प्रदर्शनासाठी अधिकांश जाहिरात हक्क: (ए) बोर्ड्स: परिमाण ८० नग व जाहिरात क्षेत्र १९२० चौ.फूट; आणि (बी) ग्लोसाइन्स: परिमाण ६० नग व जाहिरात क्षेत्र ३६० चौ.फूट; (सी) डिजिटल स्क्रीन: ०१ नग आणि जाहिरात क्षेत्र ३५ चौ.फूट. | १०९५ | ०३.०९.२०२४ रोजी दुपारी ०४.४० वाजता |

| लिलाव वस्तुसूची क्र. | लिलावाचा प्रारंभ (सर्व लॉट्स) |
|---|---|
| एमएमसीटी-एडीव्हीटी-२४-३४ | ०४.०९.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता |

| अ. क्र. | लॉट नंबर | ठिकाण / क्षेत्र | दिवस | ई-लिलाव समाप्तीची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | एडीव्हीटी-बीसीटी-डीआयसी-ओएसएन-२३०-२३-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | दहिसर (डीआयसी) स्थानकातील पादचारी पूल व सबवे येथील अधिकांश जाहिरात हक्क. | १०९५ | ०४.०९.२०२४ रोजी दुपारी ०३.३० वाजता |
| २ | एडीव्हीटी-बीसीटी-एमएमडी-ओएसएन-३४४-२४-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | तीन वर्षे कालावधीसाठी मालाड (एमडीडी) स्थानक येथील अधिकांश जाहिरात हक्क. | १०९५ | ०४.०९.२०२४ रोजी दुपारी ०३.४० वाजता |
| ३ | एडीव्हीटी-बीसीटी-एनएसपी-ओएसएन-३२८-२४-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | ३ वर्षे कालावधीसाठी नालासोपारा (एनएसपी) स्थानकातील अधिकांश जाहिरात हक्क. | १०९५ | ०४.०९.२०२४ रोजी दुपारी ०३.५० वाजता |
| ४ | एडीव्हीटी-बीसीटी-केआयएलई-ओएसएन-१८८-२३-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | ३ वर्षे कालावधीसाठी कांदिवली (केआयएलई) स्थानकातील पादचारी पुलांवरील अधिकांश जाहिरात हक्क. | १०९५ | ०४.०९.२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता |
| ५ | एडीव्हीटी-बीसीटी-व्हीएलपी-ओएसएन-१७४-२४-१ (स्थानक प्रीमाइसवरील जाहिरात (नॉन-डिजिटल)) | विले पार्ले (व्हीएलपी) स्थानकातील फलाटांवर एकूण डिस्प्ले एरिया २४०० चौरस फूटकरिता पुढील प्रकारामार्फत अधिकांश जाहिरात हक्क: बोर्ड्स: परिमाण १०० नग. डिस्प्ले एरिया २४०० चौ.फूट. | १०९५ | ०४.०९.२०२४ रोजी दुपारी ०४.१० वाजता |

**नोंद:** संभाव्य बोलीदारांना विनंती करण्यात येते की, आयआरईपीएस वेबसाइट (**www.ireps.gov.in**) वरील ई-ऑक्शन लीजिंग मॉड्यूलला भेट द्यावी. लॉटनिहाय तपशील येथे उल्लेखित वस्तुसूचीखाली उपलब्ध आहेत.

0465

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

## ब्रिटीश एन्फ्लुएन्सरची भारतावर अणुहल्ला करण्याची इच्छा

**लंडन :** ब्रिटीश एन्फ्लुएन्सर असलेल्या माइल्स रूटलेजने सोशल मीडिया पोस्टमध्ये भारतावर अण्वस्त्र हल्ला करण्याची धमकी दिली होती. माइल्सने बुधवारी (21 ऑगस्ट) X वर ही पोस्ट केली. तथापि माईल्सची ही पोस्ट चेष्टेतून होती.माईल्सने लिहिले की, छोट्याशा चुकीसाठीही मी भारतासह अनेक देशांवर अणुहल्ला करेन, पण नंतर माईल्सने ती पोस्ट डिलीट केली. त्याच्या पोस्टनंतर इंटरनेटवर लोकांमध्ये संतापाची लाट उसळली, अनेकांनी माईल्सच्या पोस्टला विरोध करत कमेंट केल्या. अशाच एका कमेंटला उत्तर देताना माईल्सने लिहिले की, मला भारत आवडत नाही. याशिवाय त्याने वांशिक टिप्पणीही केली होती. माईल्सच्या पोस्टवर झालेल्या प्रतिक्रियांनंतर त्याने अनेक वर्णद्वेषी टिप्पण्या देखील केल्या. माईल्सने लिहिले- मी इंग्लंडचा पंतप्रधान झालो तर अण्वस्त्र हल्ले करेन दुसऱ्या पोस्टमध्ये माईल्सने लिहिले की, जेव्हा मी इंग्लंडचा पंतप्रधान होईन तेव्हा ब्रिटीशांच्या कारभारात हस्तक्षेप करणाऱ्या कोणत्याही देशाला इशारा देण्यासाठी मी अण्वस्त्र हल्ला करेन.



# सरकारने 156 फिक्स्ड डोस कॉम्बिनेशन औषधांवर बंदी घातली

## माणसांसाठी धोकादायक असणाऱ्या औषधांचे उत्पादन आणि वितरण त्वरित थांबवणार

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

सरकारने 156 फिक्स्ड डोस कॉम्बिनेशन (FDC) औषधांवर बंदी घातली आहे. ताप आणि सर्दी व्यतिरिक्त, हे सामान्यतः वेदनाशामक, मल्टी-व्हिटॅमिन आणि प्रतिजैविक म्हणून वापरले जात होते.

त्यांच्या वापरामुळे मानवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे सरकारने म्हटले आहे. त्यामुळे देशभरात या औषधांचे उत्पादन, सेवन आणि वितरण यावर बंदी घालण्यात येणार आहे.

औषध तांत्रिक सल्लागार मंडळाच्या शिफारशींवरून सरकारने



हा आदेश जारी केला आहे. बोर्डाने आपल्या अहवालात म्हटले आहे की या FDC औषधांमध्ये असलेल्या घटकांचे कोणतेही वैद्यकीय औचित्य नाही.

एकाच गोळीमध्ये एकापेक्षा जास्त औषधांचे मिश्रण करून तयार केलेल्या औषधांना फिक्स्ड डोस कॉम्बिनेशन ड्रग्स (FDC) म्हणतात, या औषधांना कॉकटेल ड्रग्स असेही म्हणतात.

केंद्र सरकारने जारी केलेल्या आदेशानुसार, अमायलेस, प्रोटीज, ग्लुकोअमायलेज, पेक्टिनेज, अल्फा गॅलॅक्टोसिडेस, लैक्टेज, बीटा-ग्लुकोनेज, सेल्युलेज, लिपेस, ब्रोमेलेन, झायलेनेज, हेमिसेल्युलेज, माल्ट डायस्टेस, इनव्हर्टेज आणि पॅपेन यांच्या वापरामुळे मानवांना धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

बंदी घातलेल्या औषधांच्या यादीमध्ये केसांच्या उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांचा समावेश आहे, अँटीपॅरासायटिक, स्किनकेअर, अँटी-एलर्जिक इ. या औषधांचे पर्याय बाजारात उपलब्ध असल्याचे सरकारने सांगितले. त्यांच्यावर कोणतेही बंधन राहणार नाही.

आरोग्य मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, प्रतिबंधित औषधांमध्ये 'असिक्लोफेनॅक 50mg + पॅरासिटामॉल 125mg टॅब्लेट' ला बंदी घालण्यात आली आहे. आणि पॅरासिटामॉल, ट्रामाडोल, टॉरिन आणि कॅफिनच्या मिश्रणावर देखील बंदी घालण्यात आली आहे. ट्रामाडोल हे ओपिओइड-आधारित वेदनाशामक आहे.

सरकारच्या या निर्णयाला इंडियन फार्मास्युटिकल अलायन्सने पाठिंबा दिला आहे. आयपीएचे सरचिटणीस सुदर्शन जैन म्हणाले की, हे अनेक वर्षांपासून सुरू आहे. रुग्णांच्या हितासाठी हे योग्य पाऊल असून सर्व बाबी विचारात घेण्यात आल्या आहेत.

या औषध निर्मात्यांना सरकारकडून त्यांची बाजू मांडण्याची संधीही देण्यात आल्याचे जैन म्हणाले. त्यामुळे योग्य उत्पादने प्रसिद्ध केली जातील आणि जेव्हा या औषधांचे समर्थन करण्यासाठी कोणताही डेटा नसेल तेव्हा कंपन्यांना ते मागे घ्यावे लागतील.

# केजरीवालांच्या जामिन अर्जावरील पुढील सुनावणी 5 सप्टेंबरला

वृत्तसंस्था
नवी दिल्ली



मद्य धोरण प्रकरणाशी संबंधित सीबीआय प्रकरणात मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने ५ सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलली आहे. 14 ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने तपास यंत्रणेकडून उत्तरे मागितली होती.

सीबीआयने शुक्रवारी न्यायालयात सांगितले की, एका प्रकरणात उत्तर दाखल केले आहे, तर दुसऱ्या प्रकरणात उत्तर देण्यासाठी आणखी वेळ लागेल.

केजरीवाल यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी म्हणाले- एका प्रकरणात सीबीआयचा जबाब बुधवारी रात्री ८ वाजता मिळाला आहे. एजन्सीच्या आवाहनावर न्यायालयाने सीबीआयला एका आठवड्याची मुदत दिली आहे.

14 ऑगस्ट रोजी सीबीआय प्रकरणी केजरीवाल यांच्या आणखी एका याचिकेवर सुनावणी झाली. ही याचिका सीबीआयच्या अटकेच्या विरोधात होती.

केजरीवाल यांच्यावर ईडी आणि सीबीआय खटला सुरू आहे. ईडीच्या खटल्यात त्यांना आधीच जामीन मिळाला आहे. सीबीआय प्रकरणात ते तुरुंगात आहेत.

मद्य धोरण प्रकरणात भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली सीबीआयने २६ जून रोजी केजरीवाल यांना अटक केली होती. ते सध्या तिहार तुरुंगात बंद आहेत.

केजरीवाल यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी न्यायालयाला सांगितले की, मनी लाँडरिंग कायद्याच्या (पीएमएलए) कलम ४५ मधील कठोर तरतुदी असूनही दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना तीनदा जामीन मंजूर करण्यात आला आहे. त्यांनी 10 मे आणि 12 जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेले अंतरिम जामीन आदेश आणि 20 जून रोजी पीएमएलए प्रकरणात ट्रायल कोर्टाने दिलेला नियमित जामीन यांचाही उल्लेख केला. सिंघवी म्हणाले- अशा परिस्थितीत केजरीवाल यांना जामीन मिळायला हवा.

सुप्रीम कोर्टाने 12 जुलै रोजी ईडी मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर केला होता. जामीन मंजूर करताना न्यायमूर्ती संजीव खन्ना म्हणाले होते की, केजरीवाल ९० दिवसांपासून तुरुंगात आहेत. त्यामुळे त्यांना सोडण्याच्या सूचना दिल्या आहेत. आम्हाला माहित आहे की ते निवडून आलेले नेते आहेत आणि त्यांना मुख्यमंत्री राहायचे की नाही हे त्यांनी ठरवायचे आहे.

न्यायमूर्ती खन्ना म्हणाले होते की, आम्ही हे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे वर्ग करत आहोत. अटकेचे धोरण काय, त्याचा आधार काय. यासाठी आम्ही असे 3 प्रश्नही तयार केले आहेत.

पान ९ वरुन

### महाविकास आघाडीचा महाराष्ट्र बंद मागे

राज्यात कोणत्याही पक्षाला बंद पुकारण्याची परवानगी नाही. त्यानंतरही कुणी बंद पुकारण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल, असा इशारा हायकोर्टाने या प्रकरणी दिला होता. कोर्टाच्या या आदेशानंतर महाविकास आघाडीच्या उद्याच्या बंदवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असताना शरद पवार यांनी महाविकास आघाडीतील आपल्या मित्रपक्षांना संविधानाचा मान राखत महाराष्ट्र बंद मागे घेण्याचे आवाहन केले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शरद पवारांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत बंद मागे घेण्याची घोषणा केली आहे. काँग्रेस न्यायालयाचा सन्मान करणारा पक्ष आहे. आम्ही उद्याचा बंद मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस बंदऐवजी उद्या सकाळी 11 ते 12 या कालावधीत तोंडाला काळ्या फिती लावून सरकार विरोधात शांततेत निदर्शने करेल, असे ते म्हणाले. शरद पवार यांचे आवाहन तथा काँग्रेसने बंद मागे घेण्याची घोषणा केल्यानंतर उद्धव ठाकरे यांनीही उद्याचा महाराष्ट्र बंद मागे घेण्याची घोषणा केली आहे. आज दुपारी मी उद्याच्या बंदविषयी काही सूचना केल्या होत्या. पण त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने आमच्या बंदला मनाई केली. त्यामुळे न्यायालयाचा मान ठेवून आम्ही आमचा बंद मागे घेतला आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

### कोरोनाकाळात ज्यांनी मृतांच्या टाळूवरचं लोणी खाल्लं, त्यांच्यापासून सावध राहा - मुख्यमंत्री

कोटी महिलांच्या खात्यात पैसे पोहचले. 2 कोटी अर्ज प्राप्त झाले आहेत. हे पाऊल मागे घेतलं जाणार नाही. योजना बंद होणार नाही. विरोधकांनी चांगल्या योजनांच्या आड येऊ नये. बदलापूरची घटना दुर्दैवी आहे. नराधमाला फाशी दिली पाहिजे", असं यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं. विरोधक राज्यात अराजकता पसरवत आहे : "महिलांसाठी अनेक योजना सरकारनं सुरू केल्या आहेत. विरोधक चुकीचे आरोप करत आहेत. तुम्हाला फक्त राजकारण करायचं आहे. एक ताई म्हणतात माझी सुरक्षा काढून महिलांना द्या. निर्भया पथकाच्या गाड्या तुमच्या ताफ्यात होत्या, त्याचं काय? असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी नाव न घेता खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर निशाणा साधला. "विरोधक राज्यात अराजकता पसरवत आहे. हे तुम्ही थांबवा. अन्यथा महाराष्ट्र तुम्हाला कधीच माफ करणार नाही," असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टीका केली.

### 'अंधा कानून'चे डोळे फोडण्याची वेळ आलीय

3 वर्षे झाली तरी कोर्टात न्याय मिळत नसेल तर सुप्रीम कोर्टालाच टाळे ठोकावे लागेल. महायुती सरकार घटनाबाह्य असल्याचे न्यायाधीश सांगत आहेत. पण निकाल देत नाहीत. त्यामुळे हा अंधा कानून आहे. संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, भाजपची लोकसभा निवडणुकीतील 400 पारची घोषणा प्रत्यक्षात आली असती तर यांनी घटना जाळून टाकली असती. पण महाराष्ट्राने त्यांच्या घोषणेला ब्रेक लावला. मराठी माणसाच्या नादी कुणीही लागू नये. तो पेटत नाही. पण पेटला तर तो विझतही नाही. आता ठिणगी पडली असून, त्याचा वणवा देशभर पसरला आहे. आम्हाला तुरुंगात डांबण्यात आले. पण मी वाकलो नाही. जे पळून गेले त्यांनी शिवाजी महाराजांचे नाव लावू नये. महाराष्ट्रावर सध्या भांडवलदारांचे संकट आले आहे. तरुणांच्या हाती काम नाही. मुंबईची अवस्था भिकाऱ्यासारखी झाली आहे. गुजरातमध्ये प्रतीमुंबई उभी केली जात आहे. नरेंद्र मोदी व अमित शहा हे व्यक्ती नेते नाहीत, तर क्रूर व्यापारी आहेत. सद्यस्थितीत राज्यात कुणीही सुखी नाही. शेतकरी आत्महत्या करत आहेत. विद्यार्थी रस्त्यावर आहेत. महिला सुरक्षित नाहीत. महागाई गगनाला भिडली आहे. 1500 रुपये तोंडावर फेकले म्हणून कुणी सुखी होणार नाही. राज्य केवळ लूट करण्यासाठी चालवले जात आहे, असेही संजय राऊत यावेळी बोलताना म्हणाले.

# नड्डांचा दौरा अचानक रद्द; फडणवीस गाठणार गोवा

## मंत्रिमंडळात होणार फेरबदल

वृत्तसंस्था
पणजी

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचा गोव्याचा दौरा अचानक रद्द झाल्याने त्यांच्या जागी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गोव्याला जाणार आहेत. फडणवीस शनिवारी एक दिवसीय गोवा दौरा करणार आहेत. त्यांच्या हस्ते गोव्यातील भाजप मुख्यालयाची पायाभरणी करण्यात येणार असल्याची माहिती गोवा भाजपचे प्रदेशाध्यक्ष सदानंद तानावडे यांनी दिली.

जे. पी. नड्डा हे गोव्यात आल्यानंतर राज्यातील मंत्रिमंडळ फेरबदलाबाबत चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, नड्डा हे येणार नसल्याने याबाबतच्या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे.

गोवा भाजपच्या वतीने फोंडा



पणजी बायपास मार्गावर चिंबल येथे भाजप मुख्यालयाची उभारणी केली जात आहे. या मुख्यालयाची पायाभरणी शनिवारी भाजप केंद्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या हस्ते केली जाणार होती. दरम्यान, नड्डा यांना दिल्लीत महत्वाची बैठक असल्याने कार्यक्रमात बदल करण्यात आला. नड्डा यांच्या ऐवजी आता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भाजप मुख्यालयाची पायाभरणी केली जाणार आहे, अशी माहिती तानावडे यांनी दिली. या कार्यक्रमासाठी फडणवीस शनिवारी गोव्यात येणार आहेत.

राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा गोव्यात आल्यानंतर राज्यातील मंत्रिमंडळ फेरबदलाबाबत चर्चा होईल, अशी माहिती समोर आली होती. नड्डा मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि प्रदेशाध्यक्ष तानावडे यांच्या चर्चा करणार होते. त्यानंतरच फेरबदलाबाबत निर्णय घेतला जाईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती.

दरम्यान, नड्डा यांच्या ऐवजी आता देवेंद्र फडणवीस गोव्यात येणार असल्याने आता फेरबदलांच्या चर्चांना तात्पुराता ब्रेक मिळाला आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी काही दिवसांपूर्वी फेरबदलाची आवश्यकता असल्याचे संकेत दिले होते. त्यानंतर मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांना उधाण आले होते. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेस गोव्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष सदानंद तानावडे यांच्यासह माजी खासदार नरेंद्र सावईकर, आमदार संकल्प आमोणकर, भाजप नेते दामू नाईक हे उपस्थित होते.

# कोलकाता रेप-हत्येच्या आरोपीला 14 दिवस न्यायालयीन कोठडी

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

कोलकाता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करून हत्या केल्याचा आरोप असलेल्या संजय रॉयला सियालदहच्या विशेष सीबीआय न्यायालयाने 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. संजयने पॉलीग्राफी चाचणी देण्याचे मान्य केले आहे. सीबीआयने त्याच्या पॉलिग्राफी चाचणीची मागणी केली होती.

9 ऑगस्ट रोजी आरजी कर मेडिकल कॉलेजमध्ये प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्येच्या निषेधार्थ कोलकाताचे डॉक्टर आज (23 ऑगस्ट) 15 व्या दिवशी संपावर आहेत. ते म्हणाले- आम्हाला न्याय मिळाला नाही. त्यामुळे कामावर परतणार नाही.

येथे, इतर संघटना युनायटेड डॉक्टर्स फ्रंट असोसिएशन (UDAF), निवासी डॉक्टर्स असोसिएशन (RDA), फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन (FAIMA) यांनी संप संपवला. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनंतर आरजी कर मेडिकल कॉलेजमध्ये सुरक्षेसाठी CISF तैनात करण्यात आले आहे.

# कमला हॅरिस यांनी डेमोक्रॅटिक पक्षाची उमेदवारी स्वीकारली

वृत्तसंस्था
शिकागो

कमला हॅरिस यांनी गुरुवारी शिकागो येथील डेमोक्रॅटिक नॅशनल कन्व्हेन्शनच्या शेवटच्या दिवशी अधिकृतपणे त्यांची उमेदवारी स्वीकारली. अतिशय विचित्र परिस्थितीत आपली उमेदवारी झाल्याचे त्यांनी आपल्या भाषणात मान्य केले. मात्र, आपण ट्रम्प यांच्यापेक्षा चांगले उमेदवार असल्याचे आश्वासन देण्याचा प्रयत्न केला.

उमेदवारी स्वीकारताना कमला यांनी आपली दूरदृष्टी सांगितली. त्या म्हणाल्या, 'देशाला पुढे नेण्यासाठी अमेरिकन जनता माझ्यावर विश्वास ठेवू शकते. देशाला जोडणारी राष्ट्राध्यक्ष मी होईन. एक राष्ट्राध्यक्ष जो वाचू शकतो आणि ऐकू शकतो. एक राष्ट्राध्यक्ष ज्याच्याकडे कॉमन सेन्स असेल.

कमला म्हणाल्या, 'या निवडणुकीमुळे आम्हाला जुनी कटुता, निराशा आणि फुटीरतावादी लढाईतून पुढे जाण्याची संधी आहे. ज्यांची कथा केवळ जगातील महान देशात लिहिली जाऊ शकते अशा सर्वांच्या वतीने, मी युनायटेड स्टेट्सच्या राष्ट्राध्यक्षपदासाठी तुमचे नामांकन स्वीकारते.'

### रशियाकडून तेल घेणे बंद करा, युद्ध लगेच थांबेल!

यावरुन समजते की, रशियन राष्ट्राध्यक्ष भारताचा आणि भारताच्या पंतप्रधानांचा आदर करत नाही. त्यांचे आपल्या देशाच्या सैन्यावरही नियंत्रण नाही. युद्ध संपवण्यासाठी भारताने रशियाकडून तेल विकत घेणे थांबवावे,' असे आवाहन झेलेन्स्की यांनी यावेळी केले. या भेटीदरम्यान पीएम मोदींनी रशिया-युक्रेन युद्धाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. 'युद्धाची भीषणता मन दुखावणारी असते. युद्ध लहान मुलांसाठी विनाशकारी आहे. युद्ध आणि हिंसाचार, हा समस्येवरचा उपाय नाही. संवाद आणि मुत्सद्दीपणा हाच या प्रदेशात स्थिरता सुनिश्चित करण्याचा एकमेव मार्ग आहे. शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांमध्ये भारत सक्रिय भूमिका बजावेल. आम्ही पहिल्या दिवसापासून शांततेच्या बाजूने आहोत. युक्रेनमध्ये शांतता नांदावी, अशी भारताची इच्छा आहे. भारत नेहमीच युक्रेनच्या पाठीशी उभा राहील. युद्धाबाबत भारताची भूमिका कधीच तटस्थ नव्हती, आम्ही नेहमीच शांततेच्या बाजूने आहोत,' असे पीएम मोदींनी स्पष्ट केले. भारत आणि युक्रेनने चार महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. दोन्ही देशांनी मानवतावादी मदत, कृषी, वैद्यकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढवण्यास सहमती दर्शवली आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींच्या युक्रेन दौऱ्यामुळे रशिया-युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध संपुष्टात आणण्यास मदत होईल, अशी आशा संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी व्यक्त केली आहे.

# जर्मन मंत्र्यांना शाहबाज शरीफ यांना भेटण्यापासून रोखले

## सिक्युरिटी चेकवर बॅग जमा करण्यावरून वाद

वृत्तसंस्था
इस्लामाबाद

पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना भेटण्यासाठी इस्लामाबादमध्ये आलेल्या जर्मनीच्या मंत्री नाराज झाल्या. वास्तविक, शाहबाज शरीफ जर्मनीच्या आर्थिक सहकार आणि विकास मंत्री स्वानिया शुल्झा यांना त्यांच्या अधिकृत निवासस्थानी भेटणार होते.

शाहबाज शरीफ यांच्या



निवासस्थानी जाण्यापूर्वी मंत्र्यांना पाकिस्तानी सुरक्षा अधिकाऱ्यांनी थांबवले आणि त्यांची बॅग तिथेच ठेवण्यास सांगितले जेणेकरून ती तपासता येईल. शुल्झांनी तसे करण्यास नकार दिला आणि परत जाऊ लागल्या. मात्र, त्यानंतर सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्यांना बॅग घेऊन आत जाऊ दिले.

यावेळी त्यांच्यासोबत जर्मनीचे राजदूत अल्फ्रेड ग्रॅनसही उपस्थित होते. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये पाकिस्तानी अधिकारी हा प्रोटोकॉल आहे असे म्हणताना ऐकू येत आहे.

# भिवाडीतील लष्करी भागाजवळ अल-कायदाचा दहशतवादी तळ

## 6 संशयित घेत होते शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षण

वृत्तसंस्था
राजस्थान

भिवाडीचा डोंगर जिथे दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने अल-कायदाच्या दहशतवादी प्रशिक्षण शिबिराचा ताबा घेतला आहे, तो अत्यंत संवेदनशील परिसर आहे. त्याच्या 5 ते 7 किलोमीटरच्या परिघात भारतीय हवाई दलाचा प्रतिबंधित क्षेत्र आहे. नुह येथे महादेव मंदिर आहे, जिथे 2023 मध्ये दंगल झाली होती.

ज्या ठिकाणाहून भाविकांवर गोळ्या झाडण्यात आल्या ते ठिकाणही अवघ्या 8 किलोमीटर अंतरावर आहे. देशाच्या राजधानीला लागून असलेल्या परिसरात दिल्ली पोलिसांनी कारवाई करत 6 संशयितांना अटक केली आहे.

दिल्ली पोलिसांचे पीआरओ आयपीएस सुमन नलवा यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात



आलेले सहा संशयित दहशतवादी शस्त्रे वापरण्याचे प्रशिक्षण घेत होते. नेटवर्क झारखंड आणि उत्तर प्रदेशपर्यंत पसरलेले आहे. एकूण 8 जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून शस्त्रे, दारूगोळा आणि दहशतवादी विचारसरणीची पुस्तके सापडली आहेत. उत्तर प्रदेशातील रांची आणि अलीगढमध्ये 15 ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत. या मॉड्यूलचा म्होरक्या रांचीचा डॉ. इश्तियाक होता, जो देशामध्ये खिलाफत घोषणेसह मोठ्या दहशतवादी घटनांची योजना आखत होता.

जुलै 2021 मध्ये अल-कायदा मॉड्युलची लिंकही उघड झाली होती. त्यानंतर तिजारा पोलिस ठाण्यातील बैंगनहेरी गावातील असरुद्दीन याला सोशल मीडियावर देशविरोधी कारवाया केल्याप्रकरणी जयपूर रेंज आयजीच्या पथकाने अटक केली. त्याच्याकडून देशविरोधी साहित्य सापडले. जिहादी आणि देशद्रोही मानसिकता असलेल्या अनेक गटांशी मोबाईलचा संबंध असल्याचे आढळून आले.

तो टेलिग्रामवर इस्लामिक मीडिया नावाचा ग्रुप 51 लोकांसह चालवत होता, ज्यामध्ये 9 काश्मिरी, 9 पाकिस्तानी आणि बाकीचे इराण, म्यानमार आणि मेवातचे होते. त्यानंतर अल-कायदाच्या मॉड्यूलनुसार असरुद्दीन दुसऱ्या टप्प्यात पोहोचल्याचे तपासात उघड झाले.

असरुद्दीन टेलिग्रामच्या 50 हून अधिक चॅनल्सशी संबंधित होते. #313 अल-कायदाशी संबंधित लोकांचा मुजाहिद, स्वातंत्र्य मिळवून देईल, शरियत-ए-शहीद, मौलानाच्या तकरीर गटात सक्रिय होता. त्याला वाहिद पुलवामा नावाच्या फुटीरतावादीसह इतरांसाठी चांगल्या कार्यकर्त्याचा दर्जा मिळाला होता आणि तो स्थानिक तरुणांशी संपर्क साधून ब्रेन वॉशिंगची जबाबदारी घेत होता. महाराष्ट्र-गुजरातमध्ये 2019 मध्येही पोलिसांच्या रडारवर आले होते. त्यानंतर त्याला इशारा देऊन सोडण्यात आले, पण तो स्लीपर सेल म्हणून सक्रिय राहिला.

राजस्थान आणि हरियाणाच्या मेवात भागात देशविरोधी कारवायांचे नेटवर्क सुरू आहे. दोन दशकांपूर्वी दोहा गावात आयएसआय एजंट पकडला गेला होता. यानंतर आयएसआयच्या संशयित एजंटला भरतपूर भागातील सिक्री येथे पकडण्यात आले. नगीना परिसरातील गुमत बिहारी गावातही कारवाई करण्यात आली. आता चौपंकी परिसरातील सर्व कलांमधून 6 संशयित पकडले गेले आहेत. हरियाणाला लागून असलेल्या डोंगराळ भागाचा वापर देशविरोधी मानसिकतेचे लोक प्रशिक्षण केंद्र म्हणून करतात.

# बांगलादेशातील पुरासाठी आम्ही जबाबदार नाही

## युनूस सरकारचा आरोप - इशारा न देता धरणातून पाणी सोडले

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

बांगलादेशातील पुराला भारत जबाबदार नसल्याचे भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी केले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, "त्रिपुरातील डांबूर धरण उघडल्यामुळे पूर आल्याची अफवा बांगलादेशात आहे. हे खरे नाही."

मंत्रालयाने सांगितले की, भारत आणि बांगलादेशमधून वाहणाऱ्या गोमती नदीच्या आसपासच्या भागात यावर्षी सर्वाधिक पाऊस झाला आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंनी



अडचणी निर्माण झाल्या आहेत. दोन्ही देशांमधील नद्यांना पूर येणे ही एक सामान्य समस्या आहे, ज्यासाठी दोन्ही देशातील लोकांना संघर्ष करावा लागतो. याला सामोरे जाण्यासाठी दोन्ही देशांचे सहकार्य आवश्यक आहे.

मंत्रालयाने असेही म्हटले आहे की बांगलादेश सीमेपासून डांबूर धरण 120 किलोमीटरहून अधिक अंतरावर आहे. हे कमी उंचीचे (सुमारे 30 मीटर) धरण आहे, जे वीज निर्माण करते आणि ती वीज ग्रीडमध्ये जाते जिथून बांगलादेशला त्रिपुरातून 40 मेगावॅट वीज मिळते.